
शनिवार । १६ जानेवारी १९८२ । एक रुपया

माणूस

# शेतकऱ्यांचा आसूड



सटाणा अधिवेशन वृत्तान्त ..पृष्ठ १०

चाकण, नासिक, निपाणी या ठिकाणी आजवर शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांची आंदोलने झाली. मराठवाडा, विदर्भ या भागातही या आंदोलनांचे सादपडसाद उमटले. शेतकरी नेत्यांच्या दौऱ्यांमुळेही महाराष्ट्रातील अनेक खेड्यापाड्यांतून जागृती घडून आली; परंतु ही जागृती, ही आंदोलने, हे सादपडसाद अलगअलग होते. एका भागातील जागृतीचा, आंदोलनांचा दुसऱ्या भागाशी सांधा जुळलेला नव्हता. नासिकचे 'ऊस' आंदोलन झाले तेव्हा चाकणच्या कांदा आंदोलनातील लोक त्यात सामील झाले नव्हते. निपाणी आंदोलनात नासिकचे शेतकरी दिसले नाहीत. सटाण्याला गेल्या १-२-३ जानेवारीला झालेल्या पहिल्या शेतकरी संघटना अधिवेशनाचे मुख्य फलित हे मानले पाहिजे की, शेतकऱ्यांची या निरनिराळ्या भागात विखुरलेली शक्ती प्रथमच एकत्र आली. नागपूरला निपाणी जोडले गेले आणि कांदा व ऊस आंदोलने परस्परांना कशी पूरक होती हे सर्वांच्या ध्यानात आले. याशिवाय कर्नाटक, मध्यप्रदेश आणि बिहार-ओरिसा या परप्रांतांतूनही या अधिवेशनासाठी प्रतिनिधी आले होते. आज नाही उद्या, या प्रतिनिधींच्या मार्फत, शेतकरी आंदोलनाचे लोण महाराष्ट्राबाहेर, इतर प्रांतांतही पोचू शकेल महाराष्ट्रातले विखुरलेले जागृत शेतकरी घटक सटाणा अधिवेशनामुळे जसे एकत्रित झाले तसे परप्रांतही जोडून घेण्याची प्रक्रिया या अधिवेशनामुळे सुरू झाली. याशिवाय आणखी एक जुळणी सटाण्याला झाली. किशोर पवारांसारखे कामगारनेते, ठाकुरदास बंग यांच्यासारखे सर्वोदयी या अधिवेशनाला उपस्थित

होते. कामगारशक्ती आणि ग्रामीण पुनर्घटनेचा विचार, ही दोन दालनेच जणू सटाण्याला उघडली गेली. नासिकच्या ऊस आंदोलनाचे वेळी किशोर पवारांचे साखर कामगार कुठे होते? हा दुरावा यापुढे कमी होण्याची शक्यता आहे–जर किशोर पवार म्हणाले त्याप्रमाणे, कामगारांचे आणि लहान शेतकऱ्यांचे हितसंबंध जर खरोखरच परस्परविरोधी नसतील. शेतकरी हा मालक. कामगार हा नोकर. मालक आणि नोकर याचे ऐक्य होणे तत्त्वतः तरी अशक्य; पण व्यवहारात अनेक ठिकाणी शेतकरी-शेतमजूर एकत्र आलेले आहेत व किसान-कामगार ऐक्याचे स्वप्न अनेकांनी आजवर रंगवलेले आहे. ग्रामीण भागात तरी मालक हा अर्धवेळचा मजूरच असतो आणि मजूरही १-२ एकरांचा धनी म्हणून मालकासारखाच वागत असतो. ज्यांना ग्रामीण भागात वर्गसंघर्ष पेटवायचा आहे त्यांच्या दृष्टीने ही परिस्थिती अडचणीची आहे; पण नेमक्या याच परिस्थितीमुळे किसान आणि कामगार, शेतमजूर आणि छोटा शेतमालक एकत्र येऊ शकतात. किशोर पवाराप्रमाणेच दत्ता सामंतही येणार असे जाहीर झाले होते. सामंत आले असते तर हा ऐक्य-विचार आणखी थोडा पुढे सरकला असता. निपाणीच्या सुभाष जोशीनीही याच विचाराला पुष्टी दिली. स्त्रीकामगाराचे साहाय्य नसते तर निपाणीतील तंबाखू-शेतकऱ्याचे आंदोलन उभेच राहू शकले नसते, असे त्यांनी स्वानुभवकथन केले. किसान-कामगार ऐक्याप्रमाणेच सर्वोदय-शेतकरी आंदोलन जवळिकेचेही म्हणता येईल. या अधिवेशनात ठाकुरदास बंग यांनी ग्रामीण पुनर्घटनेसंबंधी मांडलेले विचार अनेकांना आवडल्याचे दिसले. त्यांची कार्यवाही कितपत होईल हे आज काही सांगवत नाही. कारण सर्वोदय सध्या तरी नुसता एक विचार म्हणून उरलेला आहे व शेतकरी संघटना आज शेतमालाचे किफायतशीर भाव मिळवण्याच्या एककलमी आंदोलनावरून जराही लक्ष विचलित होऊ द्यायला तयार नाही. तरीपण सर्वोदय विचारांचा शेतकरी आंदोलनाशी जुळलेला हा सांधा स्वागतार्हच म्हटला पाहिजे.

अधिवेशनाला प्रतिनिधी म्हणून सुमारे पंचवीस हजार शेतकरी आले होते. शेवटच्या दिवशीचा मेळावा एक-दीड लाखाचा तरी असावा. यावरून या अधिवेशनाच्या भव्यतेची, यशस्वितेची कल्पना यावी. तरीही मुंबई-पुण्यातल्या वृत्तपत्रांनी शेतकरी संघटनेचा प्रभाव कमी होतो आहे, अधिवेशनाला लोक कमीच आले, असा सूर लावलाच. जेवढ्या अगोदर घोषणा केल्या गेल्या तेवढी उपस्थिती नव्हती, हे खरे आहे. चार लाख शेतकरी जमतील असा नेत्याचा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र ही संख्या निम्मीच होती; पण जमलेले सर्वजण स्वखर्चाने आलेले होते. जेवण्या-खाण्याची व्यवस्था ज्याची त्याने केलेली होती. निपाणी ते सटाणा एस. टी.चे जाऊन-येऊन भाडे आता शंभर रुपयांच्या आसपास आहे. एवढे भाडे खर्च करून निपाणीहून ५० जण सटाण्याला आले, हे कमी महत्त्वाचे नाही. हे ५० जण अल्पभूधारक होते. निपाणी आंदोलनामुळे यांचा काही फायदा झाला नसता, आंदोलन फसले असते, तर इतके लोक निपाणीहून सटाण्याला कसे आले असते? इतरही अनेक ठिकाणांहून आलेले शेतकरी निश्चितच 'बडे' नव्हते. सटाण्याला जमलेले बहुसंख्य शेतकरी मध्यम व गरीब थरातले होते. काही बडे असतीलही; पण त्यामुळे सटाणा अधिवेशन हे काही श्रीमंत शेतकऱ्याचे अधिवेशन ठरत नाही. संख्येच्या व सामील झालेल्या घटकाच्या दृष्टीने सटाणा अधिवेशन हे शेतकरी चळवळीने टाकलेले एक पुढचे व दमदार पाऊल होते, हे डोळ्यांना दिसणारे सत्य फक्त आंधळे विरोधकच नाकारू शकतील.

याच संदर्भात शरद जोशी यांनी या अधिवेशनात मांडलेला आणखी एक विचार महत्त्वाचा आहे. बडा आणि छोटा शेतकरी असा फरक करून शेतकरी आंदोलनाला विरोध करणाऱ्या डाव्या पुस्तकी पंडितांना उद्देशून जोशी यांनी सांगितले की, मूळ प्रश्न बडा किंवा छोटा शेतकरी असा नसून, सगळीच शेती तोट्यात चालते, हा आहे. शेतकरी बडा असला तर तोटा जास्त असतो. छोटा असला तर तोटा कमी. सगळ्याच कच्च्या मालाचे भाव कृत्रिमरीत्या पडते ठेवून उद्योगधंदे वाढविण्याचे वसाहतवादी धोरण बदलल्याशिवाय शेती किफायतशीर होणार नाही आणि आपला मुख्य धंदा शेती हाच असल्याने, शेती किफायतशीर झाल्याशिवाय आपला दारिद्र्याचा प्रश्नही सुटणार नाही. जमिनीचे पुनर्वाटप केले, बड्यांचे बडेपण कमी केले तरी जोवर ही शेतीमालाला किफायतशीर भाव न मिळण्याची, न मिळू देण्याची चौकट कायम आहे तोवर ग्रामीण भागाचे शोषण चालूच राहील. ग्रामीण भागातील दारिद्र्य


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : तेहतिसावा

१६ जानेवारी १९८२

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

घालवायचे असेल तर प्रथम हे शोषण थांबले पाहिजे. शोषण थांबवायचे म्हणजे बडा-छोटा, शेतमालक-मजूर अशी विभागणी न करता 'शेतकरी तितका एक' या व्यापक भूमिकेवरून शेतकरी संघटन उभे केले पाहिजे. शेतीचं भांडंच मुळात गळकं आहे. भांडं मोठं असेल तर भोकही मोठं आहे. प्रश्न हे भोक बुजवण्याचा, गळती थांबवण्याचा आहे. भाड्याच्या आकाराबद्दलचे वाद सद्यःस्थितीत तरी गैरलागू आहेत. प्रथम सर्व शेतीमालाला किफायतशीर भाव मिळू द्या. ज्या भागात कांदा-आंदोलन झाले त्या भागातील शेतमजुराचे वेतन वाढले की नाही, याची खात्री करून घ्या. ते निश्चित वाढलेले दिसेल. ग्रामीण स्तर असा उंचावत गेला की, शहरांवरचे ताणही कमी होत राहतील. खेड्यांसाठी सरकारने कुठलाही विकासकार्यक्रम राबवला नाही तरी चालेल. शाळा नकोत, दवाखाने नकोत. योग्य भाव मिळाले तर हा सर्व विकास शेतकरी स्वतःच्या पैशातून करू शकेल. कारखानदार कुठे सरकारकडे शाळा मागतो? दवाखाने मागतो? तो आपल्या नफ्यातून हे सगळे खर्च करीत असतो. शेतकऱ्याला नफा झाला तर तोही सरकारकडे दवाखान्याची, शाळांची भीक मागणार नाही; पण त्याला नफाच होत नाही. तो होऊ नये अशी व्यवस्थाच प्रथम गोऱ्या साहेबाने आणि नंतर त्याच्याजागी आलेल्या काळ्या साहेबाने करून ठेवलेली आहे. म्हणून प्रथम ही व्यवस्था बदला! दारिद्र्याचा प्रश्न त्याशिवाय सुटणार नाही. खेड्यातल्या झोपड्या शहरात आणणे म्हणजे दारिद्र्य हटवणे नव्हे. खेड्यातला मुख्य धंदा जो शेती तो किफायतशीर व्हायला हवा. त्यासाठी शेतकरी आदोलन आहे....'

मांडणी जरी वेगळी असली तरी यातील गांधी विचाराच्या छटा अगदी स्पष्ट आहेत. खेड्यांच्या शोषणावर आजची शहरे उभी आहेत असे गांधीजींचे मत होते; पण हे शोषण थांबवायचे कसे? चरखा हा फारच प्रतीकात्मक उपाय ठरला. जोशी शेतकऱ्यांच्या हातात आसूड देत आहेत!

—श्री. ग. मा.

मुंबई वार्ता

# भंपकनारायण....

शाळांना नाताळच्या सुट्टया होत्या, त्या अवधीमध्ये दादरच्या शारदाश्रम शाळेत स्वामी विज्ञानानंदप्रणीत १००८ सत्यनारायणांचा कार्यक्रम पार पडला. अनेक गोष्टीमुळं या कार्यक्रमानं लक्ष वेधून घेतलं होतं. एक तर साधू वाण्याची गोष्ट आणि शिऱ्याचा प्रसाद म्हणजे सत्यनारायण, हे आपल्याला परिचित आहे; पण मुलगा परदेशाहून आला म्हणून किंवा लग्नानिमित्त, प्रमोशननिमित्त किंवा नवीन दुकान थाटण्यानिमित्त घातलेला एखादा सत्यनारायण निराळा आणि एकगठ्ठा १००८ सत्यनारायण आणि तेही वैज्ञानिक कारणास्तव केलेले, यामध्ये पुष्कळच फरक आहे. त्यातच मुंबईतल्या काही विज्ञानप्रेमी संघटनानी या प्रकारावर बरीच टीकेची झोड उठवली, मोर्चा काढला (ज्याला रहदारीचे नियम मोडल्याबद्दल अटक झाली) आणि सर्व आठवडाभर आपल्या निषेध नोंदणीचं सत्र चालू ठेवलं!

भाविक, श्रद्धाळू, सामान्य, धार्मिक वृत्तीचे आणि विज्ञानप्रेमी अशा सर्वांना एकाच वेळी भिडणारा, डिवचणारा असा हा विषय. शारदाश्रम शाळेच्या वाटेतच विज्ञानाच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या सत्यनारायणांचा निषेध करणारं प्रदर्शन फुटपाथवर मांडलं होतं; पण मी ठरवलं की, आधी सत्यनारायणवाल्याचं काय म्हणणं आहे ते बघावं शाळेकडे बऱ्यापैकी गर्दी लगबगीनं लोटत होती. वृद्ध, प्रौढ, तरुण अशा सर्व वयाची आणि बहुताश सुखवस्तु दिसणारी ही माणसं होती. वातावरणात एकूण उत्सवीपणा. बऱ्याचशा दिव्यांची आरास केलेली. एका बाजूला चौकशी आणि सहाय्यासाठी एक टेबल मांडलेलं. मध्यभागी ठेवलेल्या फलकावर 'सत्यनारायणप्रकल्पाची' माहिती, काही भक्तगणांची दुवा देणारी पत्रं इत्यादी लावलेली. 'भावनाविकार शरीरविकार अभ्यासवर्ग' 'एक महिन्यात सत् शोध'; 'तौलनिक दृष्टीने प्रत्येक असत्य गती निर्माण करते. आणि म्हणून गतीनियमाप्रमाणे प्रतीगती अर्थात (म्हणजे आशेची प्रतीगती म्हणून आशा निर्माण होते?) इत्यादी पाट्या लावल्या होत्या. एवढ्यात एक कॅमेरावाला माणूस येऊन मला म्हणाला, तुम्हाला कळतंय का हे सगळं?

'नुसतं वाचून कळण्यासारखं आहे का हे?' मी विचारलं.

'नाही ना.' मग एका बाईंना हाक मारून, 'अहो XXX ताई, यांना बघा काय हवंय ते.' माझ्या हातातलं, पॅड आणि पेन पाहून बाईंनी विचारलं, 'तुम्ही पत्रकार आहात वाटतं? कोणत्या खास विचारसरणीच्या वगैरे?'

'विचारसरणी खास म्हणजे बुद्धीला पटेल ती. बाकी लेबल कसलंही नाही. मी 'माणूस' करता लिहिते', मी सांगितलं.

'पण 'माणूस' तर प्रागतिक विचारसरणीचं आहे ना?'

'मग तुम्ही हे सत्यनारायण वगैरे प्रागतिक मानत नाही का?' मी विचारलं.

'अर्थात, अर्थात' बाई सावरून घेत गडबडीनं म्हणाल्या, 'आम्ही हे अत्यंत वैज्ञानिक आणि प्रागतिक मानतो. तशा या एकूण थिअरीत काही त्रुटी असतील किंवा काही कच्चे दुवे असतील. पण तशा त्या प्रत्येक शास्त्रात असणारच. शिवाय स्वामीजीसारख्या ज्ञानी माणसाला ते पूर्णपणे कळतंय, म्हणजे आपल्याला कळेलच, नाही?'

तेवढ्यात 'प्रात्यक्षिक विवेचना'ची वेळ झाली, म्हणून बाई मला माहिती न देताच आत गेल्या. थोडं इकडे तिकडे पाहिलं, पण आशेची प्रतीगती वगैरे वस्तूची माहिती देईल असं कोणी दिसेना, तेव्हा आपण पण विवेचनाला जावं, असं मी ठरवलं. दरवाजावरच्या माणसानं मला अडवलं, 'तुम्ही पूजा करत असाल, तरच जाता येईल. कारण नाही तर जागा नाही!'

माझ्यामागे आणखी पाच-सहा जणांचा घोळका जमा झाला. सगळ्यांना आत जायचं होतं.

अखेर पत्रकार असल्याच्या भांडवलावर माझ्यापुरती कड्या-कुलपं झडली. आत बरीच जागा होती आणि सगळ्या बिचाऱ्या

भाविकांना घेतलं तरी चाललं असतं, असं मला वाटलं.

वातावरण खास सात्विक, निदर्शनं, विरोधांनी काही विचलितपणा जाणवत होता तो फक्त विज्ञानानंदांच्या बोलण्यात. 'मी फक्त विज्ञान बोलतो. माझं बोलणं खोटं ठरलं तर मला फाशी द्या. ' मला यात लाभ फायदा काही नाही. जेमतेम चतुर्थश्रेणी सरकारी नोकराएवढा पगार मिळतो ' इत्यादी आक्रमक तोंडवळयाची संरक्षक वाक्यं. हे १००८ सत्यनारायणं कशासाठी ? ती म्हणे सत्याची प्रतिकात्मक पूजा आहे. पण मग तिचं बाह्यस्वरूप अन्य पूजाहून वेगळं आहे का ? नाही, स्वरूप तसंच आहे. पण पूजा आणि मंत्र चालू असताना पूजकांवर त्यांचा कसा परिणाम होतो आहे, हे चाचणी मशिनच्या सहाय्यानं (ज्यामुळे गाडीचा वेग कळेल) स्पष्ट होईल. एकूण साऱ्याचं ध्येय अर्थातच दु:खनिवारण, मोक्षप्राप्ती इत्यादी. खेरीज समाजसेवा, दिवसाचा ६१/२% वेळ किंवा पगाराचा ६१/२% भाग समाजसेवेसाठी, रक्तदान इत्यादी पूजेचे मार्ग. सत्यनारायणानं एकदम पुण्यसंचय होतो आणि विश्वाच्या गतीचा ढळलेला तोल परत येतो. एकूण सगळीच शारीरिक, मानसिक दु:खं — ही आपल्या मानण्यावर असतात. दु:ख मानल्यामुळे निर्माण होतात. याला कोणीही मानवप्राणी अपवाद नाही— अगदी झोपडपट्टीतला माणूस किंवा ज्याला खायला मिळत नाही असा माणूस, अन्याय–अत्याचाराचा बळी ठरला आहे-असा माणूस या—साऱ्याचं दु:ख मानण्यामधूनच निर्माण झालेलं आहे आणि सत्यनारायण हा त्या दु:खावर आणि ढळलेला समतोल परत आणण्यावरचा उपाय आहे. ६१/२% समाजसेवा हाही मोक्षाचा मार्ग आहे. समाजसेवा हे साधन आहे, साध्य नाही.

मुंबई साहित्य समेलनातल्या दलित वक्त्यांची इथे अगदी प्रकर्षाने जाणीव झाली. त्यांनी ठामपणे म्हटलं होतं, आम्हाला फक्त सामूहिक दु:खं आणि सामाजिक जाणीवाच आहेत. वैयक्तिक मोक्ष किंवा सुख किंवा पापपुण्यात आम्हाला रस नाही. त्या पार्श्वभूमीवर समाजसेवेला साधन मानणारा आणि सत्यनारायणातून पुण्य, तेही वैज्ञानिक पद्धतीनं मिळवणारा हा अध्यात्माचा स्पेशल ब्रँड. झोपडपट्टीतली दु:खं सत्यनारायणानं दूर करणं म्हणजे तिथल्या बायकांना स्वेटर विणायला शिकवून त्याचा उद्धार करणं आहे. समाजसेवा पाप आणि पुण्य अशा भाषेत बोलणं, सत्यनारायणानं एकत्र पुण्य साठतं, असं म्हणणं आणि वर ते विज्ञानालाही धरून असल्याचा निर्वाळा देणं, याला दिशाभूल होण्याची कमाल मर्यादा म्हणता येईल !

क्रांतिबा फुले सांस्कृतिक मंच, समता युवा संघटना, लोकजीवन संघटना, यूथ रिबेलियन इत्यादी मंडळींनी बाहेर भरवलेल्या प्रदर्शनांमध्ये या साऱ्या प्रकारांवर कडाडून हल्ला चढवला होता. व्यंग, उपहास, टवाळी या साऱ्यांचाही त्यात भरपूर वापर केला होता. 'विज्ञानानंद म्हणजे घाऊक पुण्याचं दुकान, हा बुवा म्हणजे मोक्षाचा दलाल, स्वर्गाचा टेलिफोन ऑपरेटर आहे !' 'बिगॉन गॉडमेन–फ्रॉडमेन' मठ्ठपणा ? वैवाहिक असंतोष ? वांझपणा ? दारिद्र्य ? सामाजिक विषमता ? बेकारी ? रोगग्रस्तता ? सब समस्याओंका अक्सीर इलाज—सत्यनारायण !' वगैरे पोस्टरं लावली होती. फूटपाथच्या वळणावर, रस्त्यावरच्या दिव्याचा अंधार–उजेडात कंपाउंड-वॉलवरची ती पोस्टरं येणारे-जाणारे न्याहाळत होते. फारसे कष्ट न घेता सहजी जितकं जमेल तेवढं वाचत होते. कार्यकर्ते फिरून लोकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत होते. घोळका-घोळका जमवून आपलं म्हणणं स्पष्ट करत होते. त्यात मध्येच मागच्या दुकानाचा दुकानदार येऊन 'माझ्या दुकानाची वाट अडवू नका', म्हणून कुरकुरत होता.

सत्यनारायण किंवा 'एकूणच आपलं अध्यात्म हे विषय जरा स्फोटक, नाजूक आहेत. वाद-विवादांची प्रचंड वादळं निर्माण करण्याचं सामर्थ्य त्याच्यामध्ये आहे. भांडण्याच्याच तयारीनं आलेल्या आणि दुखावल्या गेलेल्या किती तरी जणांना या कार्यकर्त्यांना तोंड द्यावं लागत होतं. त्यातल्या काहींना पटत होतं, काही पटवून न घेण्याच्या आणि तमाशा करण्याच्याच तयारीने आले होते. हे सत्यनारायणवाल्यांचे हस्तक आहेत, असं या कार्यकर्त्यांचं म्हणणं होतं आणि ते खरं असावं. या माणसांनी चित्रांभोवती कडं केलं, गोणपाटं लावली असेही कार्यकर्त्यांचे आरोप होते. आमच्या प्रश्नांना आणि आरोपांना याच्याकडून उत्तरं मिळत नाहीत, कारण त्यांच्याकडे मुळी उत्तरंच नाहीत—कार्यकर्त्यांनी सांगितलं

आज आपण विसाव्या शतकात वावरतो आहोत. सुदैवानं म्हणा किंवा दुर्दैवानं म्हणा, आपल्याभोवतीच्या परिस्थितीचा, घटनांचा साधा-भोळा आणि परंपरेनं घालून दिलेल्या मार्गानं अर्थ शोधणं आज निरर्थक बनलं आहे. माणसाची दु:खं-सुखं ही पूर्वजन्मीच्या पाप-पुण्याचे परिणाम नाहीत, नसतात हे आज ठळकपणे बहुतांश वेळा खरं ठरत आहे. 'नरेचि केला हीन किती नर' हे पावलोपावली अनुभवाला येत आहे. सर्वसामान्य आणि समाजाच्या तळागाळातल्या लोकांना ज्या दु:खाच्या खाईत आज पिचत पडावं लागत आहे, ती दु:खं मानसिक नाहीत, मानीव नाहीत आणि समजुतीनं, लाडीगोडीनं, सत्यनारायणाच्या सायकोथेरपी किंवा जादूच्या कांडीनं ती दूर होणारी नाहीत. ती वास्तव आहेत, मटेरियल आहेत आणि त्यांना मटेरियलच उपाय हवेत. तुम्ही त्यांना माया म्हणा की आणखी काही नाव द्या, आम्हाला त्याच्याशी कर्तव्य नाही. या वास्तविक दु:खाच्या रोगानं आमचा सारा समाज एवढा पोखरला आहे की, १००८ सत्यनारायणांचा सात्विक सोहळा आणि ६१/२% समाजसेवेचं चमचाभर सायरप दिवसातून एक तास आणि हेच समाजाचं सर्वोत्कृष्ट कल्याण, अशा कविकल्पना सुसंपन्न परदेशीयाना परवडतील कदाचित; पण भीषण वास्तवाला दिनी–प्रतिदिनी सामोरं जाणाऱ्या आम्हा भारतीयाना नक्कीच परवडणार नाहीत !


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

# देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

वैज्ञानिक सत्यनारायणांच्या या अवैज्ञानिक भाकडकथा आपली, कल्पना आहे, त्याहूनही अधिक धोकादायक ठरणार आहेत. अध्यात्म, तत्त्वज्ञान, श्रद्धा या साऱ्यातून मोक्षासाठी केलेले प्रयत्न आम्हा भारतीयाना नवे नाहीत आमच्याकडे तत्त्वज्ञानी आणि संत-महंतांची भव्य-दिव्य परंपरा आहे. पण त्या साऱ्यांनी आम्हाला तत्त्वज्ञान हे तत्त्वज्ञान म्हणून शिकवलं. भक्ती, भक्ती म्हणून सांगितली. तिला विज्ञानाचा आधार देण्याचा किंवा तत्त्वज्ञानाची वास्तवाशी गल्लत करण्याचा प्रकार कुणी केला नाही (आणि जड तसा प्रयत्न कुणी केला असेल तर त्याची नोंद ठेवण्याची गरज इतिहासाला भासली नाही.) विज्ञान हे वास्तवाचा दृश्य, मटेरियल, जड वास्तवाचा वस्तुनिष्ठ दृष्टीनं शोध घेण्याचं शास्त्र आहे. त्याच्या भौतिक घडणीचा, नियमांचा अभ्यास करणारं शास्त्र आहे. तत्त्वज्ञान, अध्यात्म ही या दृश्य स्वरूपाहून भिन्न गोष्टीचा अभ्यास करणारी ज्ञानाची शाखा झाली. या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. दोन्हींचीही आवश्यकता माणसाला आहे; पण त्यातल्या कोणीही दुसऱ्याची जागा घेऊ शकत नाही आणि तशी घेऊही नये. त्यांनी स्वायत्त, स्वयंपूर्ण रहाण्यातच माणसाचं कल्याण आहे. तत्त्वज्ञान, चिंतनातून व्यक्तीनं मनःशांती मिळवणं, म्हणजे समाजाच्या दुःखाकडे डोळेझाक करणं नव्हे आणि ६४% समाजसेवा असल्या विचारसरणीतून, 'माझा समाजसेवेचा वाटा संपला, आता सारं काही ठीक आहे', अशी नशा चढण्यापलीकडे हाती काय लागणार? अशा गोष्टींना वैज्ञानिक म्हणून विज्ञानाची बदनामी का? खरं म्हणजे हे वस्तुस्थितीकडे पाठ फिरवण झालं. त्यातही सत्यनारायणासारख्या कर्मकांडाचा बडिवार माजवणं हे कोणत्या सामाजिक उत्पाताची सूचना देत आहे, हे आपल्या इतिहासानं आपल्याला चांगलं शिकवलं आहे.

नाही तरी गीता मेहतांनी म्हटल्याप्रमाणे आपल्या कर्मयोग तत्त्वज्ञानाचा 'कर्मकोला' झालाच आहे. हळूहळू आपल्या सगळ्याच अध्यात्मतत्त्वज्ञानाला पैसे फेकून मिळणाऱ्या कोकाकोलाचं स्वरूप आणलं जाणार, असं दिसतंय!

—ललिता बर्वे

# इंदिरा काँग्रेस

## निवडणुकीपूर्वीची सफाई

वा. दा. रानडे

इंदिरा काँग्रेसच्या कार्यकारिणीची ८ व ९ जानेवारीस दिल्लीला भरलेली बैठक नेहमीच्या बैठकांपेक्षा निराळी होती. ज्या राज्यात इंदिरा काँग्रेसची सरकारे आहेत त्या राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना आणि प्रदेश काँग्रेस अध्यक्षांना या बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले होते. एवढेच नव्हे तर बैठकीपूर्वी केरळ आणि कर्नाटकचा दौरा पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी केला होता.

इंदिरा राजवटीच्या दुसऱ्या पर्वाची दोन वर्षे संपली. इंदिरा गांधी व त्यांचे मंत्री उघडपणे काहीही म्हणोत गेल्या दोन वर्षातील आपली कामगिरी समाधानकारक नाही याची मनोमन जाणीव त्याना झालेली आहे. अशा पद्धतीनेच कारभार चालू राहिला तर पुढच्या निवडणुका जिंकणे कठीण आहे याचीही त्याना कल्पना आलेली आहे. याच वर्षात हरियाना, हिमाचल प्रदेश व पश्चिम बंगालच्या 'विधानसभा' निवडणुका व्हावयाच्या आहेत आणि कर्नाटक, केरळ व आंध्र प्रदेश या तीन राज्यातही मुदतपूर्व निवडणुका याच वेळी घेणे फायद्याचे होईल काय याचा विचार इंदिरा गांधी करीत आहेत. यासंबंधी निर्णय त्या लौकरच घेतील. कार्यकारिणीची बैठक म्हणजे निवडणुकांच्या तयारीचे दृष्टीने पहिले पाऊल होते.

इंदिरा गांधींच्या पक्षाला केंद्रात आणि राज्यांच्या विधानसभात १९८० च्या निवडणुकीत एवढे मोठे बहुमत मिळाले आहे की, त्याना आपला कार्यक्रम धडाडीने अंमलात आणण्याच्या मार्गात आता कोणतेच अडथळे राहिले नव्हते. 'जे सरकार चालवू शकतील त्यानाच निवडून द्या' अशी घोषणा देऊन इंदिरा गांधी पुनः सत्तेवर आल्या; पण कार्यक्षम सरकार आम्ही देशाला देऊ हे आश्वासन त्याना पुरे करता आलेले नाही. सरकारी कारभारात तसेच पक्षसंघटनेच्या कामातही शैथिल्य आलेले आहे. हे शैथिल्य असेच चालू राहिले तर पुढचे दिवस कठीण आहेत, याची जाणीव इंदिरा गांधींना झाली आणि म्हणून कार्यकारिणीच्या बैठकीसाठी त्यांनी राज्यांचे मुख्यमंत्री आणि प्रदेश काँग्रेस अध्यक्ष यांना बोलावून घेतले. सरकार आणि पक्ष या दोन्ही दृष्टींनी इंदिरा काँग्रेसची प्रतिमा सुधारली पाहिजे, दोन्ही आघाड्यावरील कार्याला अधिक गती आणली पाहिजे असे त्यांना सांगण्यात आले; पण असे नुसते आवाहन करून कामात वेग येणार आहे का? राज्याराज्यातील इंदिरा काँग्रेस सरकारांच्या कारभारातून अकार्यक्षमता, भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर याचेच रोज दर्शन घडत आहे. आपण घोषणा केली, राज्यपालानी वटहुकूम काढला की कार्यक्रम अंमलात आला. त्याबाबत आणखी काही काय करायचे? अशी जेथे वरिष्ठ पातळीपासून समजूत आहे तेथे कार्यक्रमाच्या अमलबजावणीत वेग येणार कसा? आणीबाणीतील वीस कलमी कार्यक्रमात वेठबिगारी नष्ट करण्याचे एक कलम होते. राष्ट्रपतींनी वेठबिगारी नष्ट केल्याचा वटहुकूम काढला, पण प्रत्यक्ष भरीव काही करण्यापेक्षा काही तरी केल्याचा देखावा व जाहिरातच त्यात जास्त होती. वेठबिगारी काही नष्ट झाली नाही. कोणत्या राज्यात ती किती प्रमाणात आहे याची माहिती सुद्धा सरकारजवळ नसतानाच हा वटहुकूम काढण्यात आला होता आणि परवाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत वेठबिगारीच्या प्रश्नाकडेही लक्ष द्यावयास हवे हे पंतप्रधानाना सांगावे लागले.

आर्थिक कार्यक्रमासंबंधी बोलताना पंतप्रधानानी जमीनसुधारणाचाही उल्लेख केला. निरनिराळ्या राज्यानी कमाल जमीन धारणा कायदे केले; पण त्यांची अंमलबजावणी फार सथगतीने चालू आहे. जमीनदारानी या कायद्यातील पळवाटाचा पुरेपूर फायदा घेतला. त्यामुळे मूळ अदाजापेक्षा फारच थोडी जमीन भूमिहीनाना वाटण्यासाठी उपलब्ध झाली. तिच्या वाटपासही विलंब झाला. शेतमजूर जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेऊ लागले तेव्हा जमीनदारानी अनेक ठिकाणी प्रतिबंध केला. कोर्टात प्रकरणे गेली. उत्तरप्रदेशात तर यातून वर्गसंघर्ष निर्माण झाला. भूमिहीन हरिजनानी कोर्टात जमीनदाराविरुद्ध साक्षी दिल्या. त्याचा सूड म्हणून जमीनदारानी दरोडेखोर हस्तकांकरवी हरिजनाची कत्तल केली असे देवळी प्रकरणात दिसून आले आहे. देवळीला चोवीस तर साधुपूर येथे दहा हरिजनांची हत्या झाली; पण हे सत्र एवढ्यावर न थांबता एरवा येथेही पाच हरिजनांची हत्या झाल्याची बातमी त्यानंतर आली आहे आणि तरीही पंतप्रधान म्हणत आहेत की, गटागटातल्या खासगी वैमनस्यांतून या हत्या झालेल्या

आहेत व उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री व्ही. पी. सिंग आरोप करीत आहेत की, सरकारला बदनाम करण्यासाठी, विरोधी पक्षांनीच या हत्या घडवून आणण्याचा कट केला. वस्तुस्थिती अशी आहे की, जमीनदारवर्ग, बडा शेतकरीवर्ग इंदिरा कॉंग्रेस राजवटीचा मुख्य आधारस्तंभ आहे. त्याला सरकार दुखवू इच्छीत नाही आणि त्याच्या हितसंबंधांना बाधक असे उपाय ते योजणार नाही; पण भूमिहीन हरिजनांची मते मिळविण्यासाठी कमाल जमीनधारणा कायदा त्यांच्या हितासाठी केल्याचा डांगोरा मात्र पिटण्यात येत आहे. अशा स्थितीत जमीनसुधारणेच्या अंमलबजावणीचा वेग वाढणार कसा? आणि जे जमीनसुधारणांचे तेच थोड्याफार फरकाने इतर कार्यक्रमाचे आहे.

राज्यांच्या मुख्यमंत्र्यांविरुद्ध पक्षांतर्गत बंडखोरी चालू दिली जाणार नाही, त्याबाबत कडक कारवाई केली जाईल असा इशारा कार्यकारिणीने दिला. आंध्रप्रदेश विधान परिषदेच्या निवडणुकीत बंडखोरी केली म्हणून पाच मंत्री व सहा खासदारांना कारणे दाखवा नोटिसा लागलीच बजावण्यात आल्या. महाराष्ट्रात अंतुले यांच्या विरुद्ध बंडखोरी करणाऱ्या खासदाराविरुद्ध अशीच कारवाई होण्याचा संभव आहे. कदाचित हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत त्यासंबंधी बातमी आलेलीही असेल! अंतुले, गुंडूराव यांच्या विरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप असताना पंतप्रधानांनी दोघांनाही अभय दिले आहे. अंतुले यांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णय आपण मानू एवढे पंतप्रधानांनी सांगितले आहे. अन्तुले प्रकरणी लोकसभेत चर्चा झाली तेव्हा सार्वजनिक चारित्र्याचे उच्च आदर्श आपण पाळू असे आश्वासन इंदिरा गांधींनी दिले होते. कोर्टाचा निर्णय काय लागायचा तो लागेल पण आपल्या मंत्र्यांचा व सरकारचा कारभार स्वच्छ राखण्यासाठी पक्षपातळीवर काही उपाय योजण्याची आवश्यकताच पंतप्रधानांस वाटत नाही. कारण त्यांच्या मते तो भ्रष्टाचार नाहीच! कोणाच्याही संशयास जागा राहणार नाही अशा पद्धतीने वास्तविक या प्रकरणांची चौकशी पंतप्रधानांनी करायला हवी. आपल्याला हे पसंत आहे का याचा कौल आता लोकांनीच द्यावयास हवा.

□

## उत्तरमीमांसा : ३५

स. शि. भावे

# मृत्यूची निमंत्रणे

तशा मरणाच्या बातम्या आपण वाचतो. वाचतो आणि आपल्या उद्योगाला लागतो. विमान पडले. दोनशे ठार. आगगाड्याची टक्कर झाली. चारशे ठार. कुतुबमिनारमधले दिवे गेले. एकमेकांवर गडगडत प्रेते खाली आली. जमावावर गोळीबार झाला. आठ जण ठार झाले. अशा संख्या वाचायची आता सवय झाली आहे. आपण त्या वाचतो, विसरतो. कामाला लागतो.

आपले मन तयार झालेले असते. भावनात्मक तीव्रता समंजस झालेली असते. कुणाकुणासाठी आणि किती वेळा दु:ख करायचे? एक सुस्कारा सोडायचा, त्यांचे नशीब म्हणायचे आणि नित्यकर्म धरायचे. ते थोडेच टाळता येते?

काही—काहींना तर दु:खाने वैताग आलेला असतो. ते म्हणतात, 'आम्हाला आमचे दु.ख नाही का? आमचेही कोणी मागे गेले आहे. त्या वेळी कोण आले होते आमच्याबरोबर रडायला? जे कोणी मोजके आले होते, त्यांच्यासाठी आम्ही रडू. इतरांसाठी काय म्हणून रडायचे?'

आणखी काही म्हणतात, 'एक माणूस गेले म्हणजे कमी दु ख आणि शंभर माणसे गेली तर जास्त दु ख, असे गणित थोडेच मांडता येते?'

दुसरे काही म्हणतात, 'दु:ख काय असे ठरवून करता येते? आतडे तुटले म्हणजे वेगळे रडू आणायला लागत नाही आणि आतडे केव्हा तुटते म्हणाल, तर म्हणच आहे सख्खं ते सख्खं आणि चिकटवलेलं ते चिकटवलेलं!'

कोणी काही, कोणी काही असे बोलून प्रत्येकजण आपल्या दु:खाची धार कमी करीत असतो. आपले मन वातड नव्हे, तर शहाणे होत आहे, अशी स्वत.चीच समजूत घालत असतो. मनाची ही गरजच असते. अशी समजूत घातली नाही तर ताणाने ते तुटून जाईल. म्हणून भोवती पडलेल्या मरणाच्या वेढ्याकडे जाणून दुर्लक्ष करायचे आणि स्वत:चेही मरण नक्की असले तरी जीवनाच्या उत्साहात सामील व्हायचे.

बुद्धीने पाहू लागले म्हणजे अपघातापेक्षा घात अधिक गंभीर म्हणावे लागतात. खुनांच्या बातम्याही रोजच्या रोज वाचाव्या लागतात. या बातम्यांचे घाव रोज मनावर बसत असतात. घावाबरोबर मनात भीती शिरत असते आणि आपण जसे घावांकडे तसे भीतीकडे दुर्लक्ष करतो.

अपघातांबद्दल आपण म्हणतो आपण थोडेच अपघातात सापडणार आहोत!' खुनांबाबत आपण म्हणतो, 'आपला कुणी उगाचच खून कशाला करील? आपण कुणाचे काय वाकडे केले आहे?'

आणि आतल्या आत आपल्याला माहीत असते की, अपघात कुणाला केव्हाही होऊ शकतो आणि खून खुन्याच्या मर्जीने होत असतो, बळीच्या मर्जीने नव्हे. तरीही ही जाणीव आपण आत ढकलतो. ती विसरण्याचा प्रयत्न करतो.

कारण ही जाणीव जागी ठेवणे परवडत नाही. ही जाणीव जर जागी असेल तर आपले सारे जीवनच कडू होते. प्रत्येक क्षणाचा आनंद संपतो. प्रत्येक क्षणाचे महत्त्व गळून पडते. स्वत:चेच महत्त्व ओघळून जाते. म्हणून ही जाणीव आपण सारेच मनाबाहेर ढकलतो. मीही तसेच करीत असतो.

□

पण आज मात्र ही कडवट, गिळगिळीत, हिरवी-काळी जाणीव माझे मन वेटाळून बसली आहे. ती दूर व्हायला तयार नाही!

कारण गोष्ट अपघाताची नाही, घाताचीही नाही, तर आत्मघाताची आहे. आज आत्मघाताच्या दोन वार्ता आल्या आहेत आणि मी अतिशय अस्वस्थ झालो आहे.

पहिली घटना आहे कोल्हापूरची. एक मेटॅडोर पाच जणांच्या अंगावरून गेली. पाची जण जखमी झाले. थोड्याच वेळात शेजारच्या एका झोपडीतून धूर येऊ लागला. पाहतात तो मेटॅडोरचा चालक भाजला आहे. त्याने अंगावर रॉकेल ओतून घेतले होते.

भाजण्यात तो दगावला!

तो मेटॅडोरचा चालक होता. म्हणजे त्याने अपघात केल्यानंतर खरे तर पळून जायचे. शक्य तर वाहन घेऊन पळून जायचे. हल्लीची रीत अशीच आहे हा आपला चालकही पळून गेला; पण जगाबाहेरच पळून गेला. चालक पळून गेला नाही किंवा जाऊ शकला नाही तर लोक त्याला साधारणपणे पकडून चोपतात. इथे हा चालक लोकांच्या चोपण्यात सापडला नाही. त्यातून तो निसटला. नंतर मात्र स्वतःच्या कृतीत अडकला.

अडकला? की सुटला? काय म्हणावे?

त्याच्या मनात त्या थोडक्या वेळात काय काय आले असेल? पाच माणसे आपण मारली असेच त्याला शेवटपर्यंत वाटले का? कारण ज्यांच्यावरून गाडी गेली ती माणसे जागच्या जागी ठार झाली आहेत, की जखमी झाली आहेत, ते त्याने पाहिलेच नाही. तेवढा तो थांबलाच नाही. तो तत्काळ जो पळाला तो मरणाकडेच!

ती पाची माणसे जागीच थंड झाली, असेच त्याला खात्रीने वाटले असणार. मनाची ही खात्री झाल्यावरच त्याला काय वाटले असेल? भीती? की अपराधीपणाची टोचणी? भीती म्हणावी तर नंतर रॉकेल ओतून पेटवून घेताना भीती कशी वाटली नाही? आणि आधी गाडी जोरात चालवतानाही भीती कशी वाटली नाही?

म्हणजे ही भीती नसणार. आधीही गाडी चालवताना तो बहुधा सावधच असला पाहिजे. झाला अपघात हा खरोखरी अपघात म्हणजे योगायोग असला पाहिजे आणि आपल्या हातून हे व्हावे या खंतीने तो व्याकुळ झाला असेल.

पापभीरू मनाने असे व्याकुळ होणे हे आज किती दुर्मिळ आहे. तो चालक तरुण होता. तारुण्यातही त्याने बेदरकार होऊ नये, सरळच रहावे, याला काय काय कारण झाले असेल? त्याचे आईवडील? इस्लामपूर हे गाव? नेमक्या कोणत्या योगाने त्याचे मन असे पापभीरु बनले आणि तसेच राहिले हे कळले तर किती बरे होईल! ते कळले पाहिजे. म्हणजे अशी मने निर्माण व्हावी म्हणून तशी परिस्थिती तयार करण्याचा प्रयत्न करता येईल.

आणि त्याच्या कोवळ्या, पापभीरु मनात त्या वेळी कोणते विचार आले असतील? रॉकेल ओतून घेताना, विस्तव लावताना कोणकोणत्या आठवणी त्याच्या मनात जाग्या झाल्या असतील? इस्लामपूरच्या घराची आठवण झाली असेल? आईवडील आपल्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत हे आठवले असेल? आपण नुकतीच मिळवायला सुरुवात केली आहे. आपल्यानंतर घरचे कोण बघणार अशी काळजी वाटली असेल?

की त्याचे मन त्या पंधरावीस मिनिटात बधिर झाले असेल? मेटॅडोरखाली आलेल्या बायकांच्या किंकाळ्या आणि आजूबाजूने धावत आलेल्या लोकांचा गलका एवढाच आवाज त्याच्या कानात भरून राहिला असेल? अकस्मात चहूबाजूनी उडालेल्या रक्ताच्या चिळकांड्याच फक्त त्याच्या नजरेसमोर असतील? बाकी सारे मनाआड झाले असेल? 'हे काय हातून झाले?' एवढाच प्रश्न मनात दुमदुमत असेल?

नक्की काय झाले असेल? एका वार्ताहराने तर खात्रीपूर्वक लिहिले आहे की, रागावलेल्या जमावाच्या भीतीने जीव वाचविण्यासाठी तो पळाला आणि समोरच्या झोपडीत लपून बसला. मग जीव वाचविण्यासाठी तो आणखी कुठे का पळाला नाही? जमावाला शरण का आला नाही? पोलिसचौकीकडे संरक्षणासाठी कसा गेला नाही?

त्याला भीतीच वाटली तर अंगाला विस्तव लावताना कशी भीती वाटली नाही? बेदम मार बसेल या भीतीपेक्षा उफाळत्या अग्नीच्या चटक्यांच्या यातना कमी तीव्र वाटल्या असतील? छे छे! जमावाची भीती हे कारण पुरेसे वाटू शकत नाही.

ज्वालाचे चटके बसल्यावर त्याने 'वाचवा' असा आक्रोश केल्याचे आढळत नाही. झोपडीचे दार फोडून लोकांनी आत जाऊन पाहिले तर अशोक पवार हा मेलेलाच आढळला. अग्नीचा वेग आणि आटोप झपाट्याचा असणार. दहा मिनिटात सारे आटोपले असणार!

या आत्मघाताने काय साधले? अशोकने स्वतःच्या अपराधाचे क्षालन केले असे आपण म्हणू, नेहमी म्हणतो; पण अपराधाचे क्षालन होणे म्हणजे तरी काय? ज्यांना जखमा झाल्या त्यांच्या जखमा या आत्मघाताने थोड्याच भरून येणार आहेत? अशोकच्या आत्मघाताने इतर वाहनचालक अंतर्मुख होतील, आत्मपरीक्षण करतील, त्यांची जबाबदारीची जाणीव वाढेल, असेही एक समर्थन देता येईल; पण दुसऱ्याच्या आत्मक्लेशाचा असा परिणाम होतो असा सर्वसाधारण अनुभव नाही.

पश्चात्तापाचे असे काही क्षण उत्स्फूर्त असतात. ज्याला असे क्षण अनुभवायला येतात, त्याच्याही जीवनात समान परिस्थितीत ते पुन्हा येतात असे नव्हे. मग दुसऱ्याच्या पश्चात्तापाची आणि प्रायश्चित्ताची कथा थोडा वेळ जरी मन तापवून गेली तरी तिने कायमचा परिणाम झाला आहे असे दिसत नाही.

मग अशोकच्या आत्मघाताने नेमके काय साधले? त्या शेवटच्या क्षणीची ऊर्मी पुरी केल्याचे त्याचे स्वतःचे समाधान? ते समाधान तरी किती क्षणांचे मिळाले असेल? काडी पेटवून अंगावर टाकण्याचा क्षण हा त्या उद्दाम समाधानाचा शेवटचा क्षण असेल आणि पहिला जीवघेणा चटका बसण्याचा क्षण हा ते समाधान संपण्याचा पहिला क्षण असेल. नंतर कदाचित् अगतिकताच फक्त उरली असेल! मूक, गुदमरलेली अगतिकता.

मी हुरतऱ्हेची कल्पना करण्याचा प्रयत्न करती आहे.

त्या शेवटच्या अनुभवाचे नेमके स्वरूप समजावे अशी माझी तीव्र इच्छा आहे; पण माझ्या हाती नक्की काहीच लागत नाहीय. माझे प्रश्न कायम आहेत. माझी अस्वस्थता कायम आहे. आत्मघातासारखी निर्णायक कृतीही निरर्थकच ठरू पाहावी, याने माझ्या मनाची तगमग होते आहे.

◻

दुसरी वार्ता अधिक अकल्पित आहे. नेहमीच्या वास्तवापलीकडची आहे.

दोघी मैत्रिणी : सुनंदा गोरे आणि ज्योति वोरा. दोघी लगतच्या शेजारणी! एकाच कारखान्यात कामाला गेलेल्या. एकजण संध्याकाळी घरी सांगते, मैत्रिणीकडे जाऊन येते. तिच्याकडे जाऊन, 'आत्ता येतो' असे सांगून तिच्याबरोबर बाहेर पडते मग कोणीच आपापल्या घरी परत येत नाही! दुसऱ्या दिवशी सकाळी नव्या पुलाखाली दोघी सापडतात. एकमेकीला घट्ट धरून. डावा व उजवा असे दोघींचे हात रिबिनीने बांधून, मृत!

बस. बाहेर आलेले वृत्त एवढेच. बाकी सारे गप्प. आदल्या रात्री धप्प असा आवाज ऐकूनही सकाळपर्यंत त्यांच्यावरून, भोवतालून, वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे, गप्प राहणाऱ्या त्या भोयाप्रमाणे.

यानंतरही सारे गप्पच राहिले. दोन दिवस वार्ता आली. थोडी अस्वस्थता. थोडे भय. थोडी थरथर. पुन्हा सारे गप्प! 'एवीतेवी आता गेल्याच आहेत. मग बाकीचं सगळं आता कशाला बोलायचं?' असे आईवडील, नातेवाईक स्वतःशी म्हणणार, एकमेकांना सांगणार, 'ए! तो विषय काढू नको हं!' असे एक मैत्रीण दुसरीला किंवा मैत्रीण आपल्या मित्राला बजावणार. असे सारे गप्प होणार. ही घटनाच मग हळूहळू विसरली जाणार!

जशी ती वीस वर्षांमागची विसरली होती, तशी. सुमारे वीस वर्षांपूर्वी लकडी-पुलाखाली (सध्याच्या संभाजी पुलाखाली) अशीच एक जोडी पडली होती. हाताशी हात व पायाशी पाय बांधलेले. तरुण स्त्री-पुरुषाची जोडी! भर पावसाळ्यातली गोष्ट. वर कुठे तरी त्यांनी उडी घेतली होती. त्या उडी घेण्यावेळी त्यांची काय स्थिती होती याची कल्पना करणारी सुदर, केवळ संवादमय कथा ज्येष्ठ पत्रकार मित्र (आता कै.) श्रीकृष्ण हवालदार यांनी लिहिली होती. इतक्या वर्षांपूर्वीची ती घटना पाहून जे प्रश्न मनात उद्भवले होते त्याचे समाधान अजूनही झालेले नाही. सवयीने ते प्रश्न झोपी गेले होते. कालपरवाच्या घटनेने ते प्रश्न पुन्हा जागे झाले!

या मैत्रिणीना जोडआत्मघात करावा असे का वाटले असेल? स्त्रीपुरुषानी जोड-आत्महत्या केली तर त्याचे ढोबळ उत्तर आपण अंदाजू शकतो. आईवडिलांचा, कुटुंबाचा, समाजाचा विरोध असेल. एकत्र येण्यात काही अडचणी असतील. रोमिओ-ज्यूलिएटसारख्या जोडया आपल्याला माहीत झालेल्या असतात. त्यामुळे स्त्री-पुरुषाच्या जोडआत्मघाताचे तसे आश्चर्य वाटत नाही. समाजाने अव्हेरलेल्या त्यांच्या उत्कटतेची हीच अखेर होणार असे आपल्याला सवयीने वाटत असते.

दोन मैत्रिणीचा एकत्र आत्मघात मात्र अजून नवा आहे. म्हणजे अगदी आजचाच नव्हे. वर्ष-दोन वर्षांखाली कऱ्हाडला दोघी मैत्रिणीनी महाराष्ट्र-एक्सप्रेसखाली एकत्रपणे जीवन संपविले होते. त्यातली एक नुकत्या झालेल्या लग्नानंतर प्रथमच माहेरी आली होती. त्याही आधी, दहा-पंधरा वर्षांखाली नाईक-मडकईकर या जोडीने जीवन संपवले होते!

या मुलीना असे मरावेसे का वाटते?

वय असते सतरा-वीस-बावीसच्या आसपास. हसण्या-खेळण्याचे आणि गोड स्वप्ने बघण्याचे हे वय! घरची परिस्थितीही तशी ठीक असते. आईवडिलांशी बिनसले म्हणावे तर तसेही दिसत नाही. ज्यावर बोट ठेवावे असे ठसठशीत कारण काही आढळत नाही. समाजशास्त्रीय किंवा मानसशास्त्रीय असे काही आडाखेवजा उत्तर असेलही; पण ते पुरे पडत नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर या आडाख्यांनी मिळू शकत नाही. प्रश्न मनात तसेच ठसठसत राहतात.

आत्मघाताचे ढोबळ कारण काय? तर सर्व बाजूंनी माणसाचा निरुपाय होतो; पण मला काय वाटते की, आपलाही असा निरुपाय अनेकदा होतो; पण आपण काही लगेच मरत नाही. आपण दुसरा काही उपाय करतो असेही नाही. आपण काही न करता असतो. आपण टिकून राहतो. जे सवयीचे झालेले असते ते उरकत राहतो. 'मरावे एकदाचे' असे वैतागाने उद्गारतोही; पण मरत मात्र नाही!

कारण मरणे हे एक विधायक कृत्य असते. असा विधायक कृतीचा आपला निर्णय होऊ शकत नाही. म्हणून तर मला प्रश्न पडतात, या पटकन मरणाऱ्यांना ही मृत्यूची निमंत्रणे कशी मिळतात?

आपण आता मरावे हे याना नेमके कसे जाणवते? आपण आताच मरायचे हे यांचे कसे ठरते? ही माणसे मरण्याच्या निरनिराळ्या पद्धतीचा शांतपणाने विचार करून मग आपली पद्धत ठरवतात काय? एकाची आत्महत्या क्षणाच्या प्रेरणेने एक वेळ घडू शकेल; पण जोडआत्मघात असा होणे कठीण. त्यातही शेजारच्या; पण वेगळ्या घरात राहणाऱ्या मैत्रिणीचा होणे फारच कठीण!

असे तर काही होत नाही की, एकजण दुसरीकडे गेली. म्हणाली, 'चल ग, आपण पुलावरून उडी टाकू.' आणि दुसरी म्हणाली, 'थांब. आलेच!'

असे इतके साधे, सरळ कसे होईल? पण लगेच असेही वाटते की, असेही का होणार नाही? एखाद्याच्या बाबतीत मुळी असेच ठरले असेल की, एकीने बोलावले की दुसरीने निघायचे. एकमेकांबरोबर जगण्याचे जसे करार होतात तसे एकमेकांबरोबर मरण्याचे करारही होत असतील!

मुख्य प्रश्न उरतोच. जगता जगता, आता मरावे असे वाटते तरी कसे? या दोघींपैकी कुणाला असे प्रथम वाटले असेल? ती दुसरीला बोलवायला गेली तेव्हा दुसरीने एकदम 'येते' म्हटले असेल? की पहिलीचा बेत बदलण्याचा प्रयत्न केला असेल?

नंतरचे मृत्यूपर्यंतचे क्षण कसे गेले असतील? त्या चांगले जेवल्या असतील का? त्यांनी एखादा सिनेमा पाहिला असेल का? मरण अनुभवण्याआधी काही हौस केली असेल? की कोठे तरी जाऊन त्यांनी शेवटच्या गप्पा केल्या असतील? लहानपणापासूनच्या आठवणी काढल्या असतील? मरणानंतर कुणा नातेवाइकाला काय वाटेल अशा कल्पना केल्या असतील? बेत फसला नि मरण टळले तर काय सांगायचे याचे बेत केले असतील?

नव्या पुलावर नेमके कुठे उभे राहून त्यांनी रिबिनीने आपले हात बांधले असतील? कठड्यापासून पाय सुटल्यावर पाण्यात पडताक्षणी, नाकातोंडात पाणी जाताना त्या एकमेकींशी काय बोलल्या असतील? त्यांना काही बोलणे जमले तरी असेल का? आधी कुणाचा प्राण गेला असेल? नंतरच्या काही जिवंत क्षणात दुसरीला काय वाटले असेल?

मरणसोहळ्याचे हे सारे तपशील कळावे अशी माझी उत्कंठा आहे. हे सारे तपशील समजले तर जीवन आणि मरण याचे नाते अधिक स्पष्ट होईल. हे नाते किती जवळचे आहे, हे स्पष्ट होईल.

आज मात्र हे प्रश्न तसेच आहेत. उत्कंठा-तगमग तशीच आहे. मृत्यूच्या निमंत्रणांचे गूढ तसेच आहे!

□

अवतीभवती । शरद कृष्णन्

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

गेले काही महिने सर्वोच्च न्यायालयामध्ये अनेक वादग्रस्त प्रश्न निर्णयासाठी पडून होते. या प्रश्नांमध्ये, उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या बदल्या, केंद्र सरकारने आयुर्विमा महामंडळाबाबत संसदेमध्ये मंजूर करून घेतलेले विधेयक, राष्ट्रीय सुरक्षा कायद्याच्या विरोधात दाखल झालेले अर्ज, अशा महत्त्वपूर्ण प्रश्नांचा समावेश होता. गेल्या आठ-पंधरा दिवसांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही सर्व प्रकरणे निकालात काढली असून या प्रश्नांबाबतचे निर्णय केंद्र सरकारच्या भूमिकेला अनुकूल असेच असल्याने, केंद्र सरकारला, विशेषत: न्यायमूर्तींच्या बदल्याबाबत आग्रही भूमिका घेणाऱ्या केंद्रीय कायदेमंत्र्यांना, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे दिलासा मिळाला असून, 'नव वर्षाची भेट', अशा शब्दात केंद्रीय कायदे मंत्री श्री. शिवशंकर यानी या निर्णयाचे स्वागत केले आहे. या विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींमध्ये तीव्र मतभेद असले तरी मताधिक्याने दिलेले निर्णय केंद्र शासनाच्या भूमिकेचा पाठपुरावा करणारेच आहेत.

न्यायमूर्तींच्या बदल्या करण्याबाबत कायदेमंत्रालयाने जी भूमिका घेतली होती ती वैध ठरवण्यात आली असून या बदल्यांबाबत संबंधित न्यायमूर्तींनी केलेले अर्ज फेटाळून लावण्यात आले आहेत. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या बदल्या कराव्यात की नाही, हा वादविषय असून, त्याबाबत १९६५ पासून चर्चा चालू आहे. उच्च न्यायालयामधील मुख्य न्यायमूर्तींची एक बैठक १९६५ साली झाली होती. या बैठकीमध्ये, अशा बदल्याच्या विरोधात मत नोंदण्यात आले होते. आणीबाणीच्या कालखंडामध्ये उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या मोठ्या पगारावर बदल्या करण्यात आल्या. सरकारच्या विरोधात निर्णय देणाऱ्या न्यायमूर्तींना त्रास देण्याच्या हेतूने या बदल्या करण्यात आल्या, असे आक्षेप घेतले गेले. त्या वेळी ज्यांची गुजरायमधून आंध्र प्रदेश उच्च न्यायालयामध्ये बदली करण्यात आली होती ते न्यायमूर्ती सखळचंद शेठ यांनी बदलीबाबतच्या निर्णयाला आव्हान दिले. उच्च न्यायालयाने सेठ यांच्या बाजूने निर्णय दिला व त्यांची बदली रद्दबातल ठरवली. शासनाने या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने तीन विरुद्ध दोन अशा मतानी शासनाच्या बाजूने निर्णय देऊन ही बदली वैध ठरवली. मात्र अशा बदल्या सरसहा करण्यात येऊ नयेत व बदली करताना सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींबरोबर विचारविनिमय करून मगच निर्णय घ्यावा, असेही मत नोंदवले. पुढे जनता सरकारच्या राजवटीमध्ये बदल्याचा प्रश्नच निर्माण झाला नाही; परंतु इंदिराजी पुन्हा सत्तेवर येताच त्यांच्या कायदा मंत्रालयाने पुन्हा एकदा या प्रश्नाला तोंड फोडले. उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींच्या बदल्या करण्यात याव्यात आणि किमान १/३ प्रमाणामध्ये या न्यायालयामधील मुख्य न्यायमूर्ती हे बाहेरच्या राज्यामधील असावेत, अशा सूचना आपल्याकडे वकिलांच्या संघटनेकडून, तसेच अन्य जबाबदार संस्थांकडून आल्याचे सांगून त्यानी या प्रश्नाला वाचा फोडली. राज्यपुनर्रचना मंडळानेही राष्ट्रीय एकात्मता साधण्याच्या दृष्टीने अशा बदल्या करण्यात याव्यात अशी शिफारस केली होती, त्याचीही आठवण देण्यात आली. राज्यपुनर्रचना मंडळाने असेही सुचवले होते की, प्रत्येक राज्याच्या उच्च न्यायालयामधील न्यायमूर्तींपैकी किमान १/३ न्यायमूर्ती हे बाहेरच्या राज्यामधील असावेत. त्यामुळे स्थानिक दबावाला प्रतिबंध बसेल. असे जुने संदर्भ देऊन विषय पुन्हा निघाल्यावर, उच्च न्यायालयामधील अतिरिक्त न्यायमूर्तींना कायम करण्यापूर्वी, आपण बदली स्वीकारण्यास तयार असल्याचे संमतीपत्र त्यांच्याकडून घ्यावे, तसेच नवीन अतिरिक्त न्यायमूर्ती नेमताना अशी बदली स्वीकारण्यास त्यांची पूर्वसंमती घ्यावी, असे सुचवणारे एक पत्र केंद्रीय कायदामंत्र्यांनी सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्याना लिहिले. या पत्रावरून बरेच वादळ उठले होते. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. वाय्. व्ही. चंद्रचूड यानीही या पत्राबाबत तिखट प्रतिक्रिया व्यक्त केली होती. परंतु असे पत्र लिहून कायदामंत्र्यांनी आपल्या मर्यादा उल्लंघल्या नाहीत, असे मत आता सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केल्याने या पत्रप्रकरणावरही पडदा पडला आहे. दिल्ली उच्च न्यायालयामधील अतिरिक्त न्यायमूर्ती एस्. एन. कुमार याना मुदतवाढ देण्यास नकार दिल्यावर त्यानी रिट अर्ज केला होता. पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. के. बी. एन्. सिंग यानी आपल्या मद्रास येथील उच्च न्यायालयामध्ये केलेल्या बदलीविरुद्धही अशाच स्वरूपाचा अर्ज केला होता. हे दोन्ही अर्ज फेटाळून लावून सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय शासनाचे याबाबतचे निर्णय उचलून धरले आहेत. तथापि, या निर्णयाबाबत न्यायमूर्तींमध्ये तीव्र मतभेद असून ४ विरुद्ध ३ अशा मताधिक्याने शासनाच्या बाजूने निर्णय लागलेला असल्याने, शासनाला याबाबतचे निर्णय घेताना विशेष दक्षता घ्यावी लागेल. शासन व न्यायसंस्था याच्यामधील या महत्त्वपूर्ण प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे त्यामुळे न्यायमूर्तींच्या नेमणुका, बदल्या व मुदतवाढ यासारख्या महत्त्वपूर्ण बाबी या संपूर्णपणे शासनाच्या अखत्यारीमधील आहेत, ही भूमिका सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली असून, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींचा या बाबतचा सल्ला शासनावर बंधनकारक राहू शकणार नाही, हे पण या निर्णयाने स्पष्ट झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या काही दिवसांमध्ये विविध महत्त्वपूर्ण प्रश्नाबाबत जे निर्णय दिले आहेत ते सातत्याने शासकीय निर्णयाची तळी उचलून धरणारे असल्याने केंद्रीय कायदा-मंत्रालय सध्या चांगलेच सुखावले आहे. आपणच दिलेल्या विविध निर्णयांतून न्यायसंस्थेच्या मर्यादा स्पष्ट होत असून वाढत्या शासकीय वर्चस्वाला ती कायदेशीररीत्या मान्यता देत आहे. राष्ट्रीय सुरक्षाविषयक वटहुकूम आणि नंतर त्याचे कायद्यात करण्यात आलेले रूपांतर यांनाही सर्वोच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला असून पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने तीन विरुद्ध दोन अशा मताधिक्याने या कायद्याच्या वैधतेला अनुकूलता दाखवली आहे. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी शासनाने जे निनावी रोखे विक्रीस काढले होते त्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली

होती. तथापि सर्वोच्च न्यायालयाने शासनाच्या बाजूने निर्णय दिल्याने सरकारला या रोख्यांची बिनधास्तपणे विक्री करता आली.

## □ आयुर्विमा : महत्त्वपूर्ण निर्णय

केंद्र सरकारने अलीकडेच आयुर्विमा महामंडळाबाबतचा नवीन कायदा व भत्ता व बोनस याबाबतचे नवे नियम संसदेमध्ये मंजूर करून घेतले होते. महामंडळाच्या तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांनी या कायद्यामुळे आपल्या मूलभूत हक्कावर गदा येते, असा दावा केला. तथापी तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हा दावा मान्य केला नाही. मात्र त्याचबरोबर हा कायदा व नवे नियम यांची अंमलबजावणी या वर्षीच्या २ फेब्रुवारीपासून करण्यात यावी, असाही आदेश दिला. त्याचा लाभ महामंडळाच्या ४५ हजार कर्मचाऱ्याना जरूर मिळेल. ही तारीख दोन वर्षे पुढे गेल्याने, शासनाला ७८ ते ८० या दोन वर्षांसाठी, १९७४ च्या कराराप्रमाणे भत्ते व बोनस द्यावा लागेल. ही रक्कम ३० कोटी रुपयाहून अधिक आहे. ही रक्कम कर्मचाऱ्यांना देऊन झाली आहे; परंतु ही स्वीकारताना कर्मचाऱ्याच्या वतीने संबंधित संघटनांनी असे आश्वासन दिले होते की, न्यायालयाचा निर्णय जर कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध गेला तर जादा दिली गेलेली रक्कम नंतरच्या हिशेबात लक्षात घेतली जाईल व ही रक्कम कापून बोनस देण्यात येईल; परंतु सर्वोच्च न्यायालयाने ज्या दिवशी लोकसभेत कायदा मंजूर झाला त्या दिवसापासून नवीन कायद्याची व भत्तेविषयक नियमाची अंमलबजावणी करावी, असा आदेश दिला असल्याने, निदान २ फेब्रुवारी ८१ पर्यंतच्या कालखंडासाठी १५ टक्के बोनस आणि त्यावर १२ टक्के व्याज अशी रक्कम कर्मचाऱ्यांच्या हातात पडली आहे. आयुर्विमा महामंडळ आणि बँक कर्मचारी याचे तसे अवाजवी लाड आजवर झाले. या कर्मचाऱ्यांबद्दल जनतेमध्ये जराही सहानुभूती नाही. अर्थात हे सारे प्रकरण न्यायालयात नेणाऱ्या कर्मचाऱ्याच्या संघटनांना हे निर्णय मानवणार नाहीत. आयुर्विमा महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या संघटनेने या निर्णयाबाबत आधीच नापसंती नोंदवली आहे; पण नापसंती व्यक्त करण्यापलीकडे या संघटनेने जाऊ नये. बोनस व भत्ते यावर सरकार लादू इच्छित असलेल्या बंधनांना सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली असून, सरकार अशा बंधनाद्वारे मूलभूत हक्कांना धक्का लावण्याचा प्रयत्न करत आहे, हा कर्मचारी संघटनांचा युक्तिवाद फेटाळून लावण्यात आलेला आहे. जीवित आणि स्वातंत्र्याच्या कल्पनेमध्ये रोजगाराबाबतच्या नियमांचा समावेश होत नाही, अशी भूमिका याबाबत न्यायालयाने घेतलेली आहे. २४ जानेवारी १९७४ रोजी आयुर्विमा महामंडळ व कर्मचारी याच्यामध्ये वेतन, बोनस, भत्ते याताबत ज्या तरतुदी करण्यात आल्या होत्या, त्या तरतुदीमध्ये शासन काळसुसंगत बदल करू शकते, अशी भूमिका न्यायालयाने घेतली असल्याने या वादावर अखेरचा पडदा पडला आहे, असे समजण्यास हरकत नाही. बोनस, वेतन व भत्ते याबाबत दिसून येणारी तफावत कमी करण्याच्या शासकीय प्रयत्नाला या निर्णयामुळे हातभार लागेल.

## □ पंचतारांकित हॉटेलचा सूत्रधार

'संडे मिड् डे'च्या प्रत्येक अंकामध्ये कॉंट्रॅक्टरने घेतलेली नामवंत व्यक्तीची मुलाखत असते. गेल्या रविवारच्या अंकामध्ये ओबेरॉय मालिकेच्या पंचतारांकित हॉटेल्सचे सूत्रधार एम. एस. ओबेरॉय यांची मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. ओबेरॉय हे पंचतारांकित हॉटेल्सच्या जगतामधील एक महत्त्वपूर्ण नाव. त्यानी अक्षरशः शून्यातून आपले भविष्य घडवले व जो व्यवसाय पत्करला, त्या व्यवसायामध्ये त्यांनी असाधारण यश संपादन करून, ओबेरॉय हॉटेल्सची मालिका उभी केली. आज ओबेरॉय साखळीमध्ये ज्या महत्त्वपूर्ण हॉटेल्सचा समावेश होतो त्यामध्ये दार्जिलिंग, गोवा, श्रीनगर, काठमांडू, सिंगापूर, झांझिबार अशा किती तरी ठिकाणी असलेल्या हॉटेल्सचा समावेश आहे. ओबेरॉय हे नाव ज्या हॉटेलशी संबंधित आहे त्या हॉटेलने सहसा अपयश पाहिलेले नाही. कारण या व्यवसायाचा उदंड अनुभव पाठीशी असलेले ओबेरॉय आपले सारे व्यवसायीकृत कौशल्य पणाला लावून या साखळीमधील हॉटेल्सचे नियंत्रण करत असतात. अगदी अलीकडे ऑबेरॉय मालिकेमधील ओबेरॉय 'शांभाला' हे हॉटेल लडाखमध्ये सुरू झाले. नवीन हॉटेलला जातीने भेट द्यायची, असा ओबेरॉय याचा दंडक असल्याने त्यानी लडाखला जाण्याचे ठरवले. लडाखमधील हवामान त्रासदायक असल्याने कंपनीचे संचालक एम. एस. ओबेरॉय यांनी तेथे जाऊ नये, अशी इच्छा कंपनीच्या व्यवस्थापनाने व्यक्त केली. स्वतः ओबेरॉय मात्र जाण्यास उत्सुक होते. व्यवस्थापनाच्या इच्छेमागे सदिच्छा होत्या; पण त्या वेळी ८१ वर्षांचे वय असलेल्या ओबेरॉय यांना राहवले नाही. त्यांनी व्यवस्थापनाचा सल्ला मानला नाही. कुटुंबियांचा विरोध जुमानला नाही आणि ते लडाखमध्ये गेले! तेथील हवामानाचा त्याच्यावर विपरीत परिणाम होईल असे त्याच्या हितचिंतकाना वाटत होते; पण तसे झाले नाही. आपल्या अल्पकालीन मुक्कामामध्ये त्यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. लडाखचे हवामान तसे त्रासदायक असल्याने आणि विशेषतः श्री. ओबेरॉय वयस्क असल्याने त्यांना त्रास झाला. रात्री श्वासोच्छ्वास करणे जड गेले; परंतु त्यापेक्षा विशेष काही घडले नाही. त्यांनी व्यवस्थितपणे आपले काम केले व मगच ते दिल्लीला परतले. आता पुन्हा मात्र लडाखला जाण्याची त्यांची इच्छा नाही आणि तशी आवश्यकताही नाही. लडाखमधील हवामान त्रासदायक असल्याने, दर सहा महिन्यांनी ते तेथील कर्मचारी बदलतात. आपली कंपनी कर्मचाऱ्यांच्या सुखसोयीबाबत विशेष दक्ष असल्याचे ते अभिमानाने बोलून दाखवतात. प्रथम कंपनीचा कर्मचारीवर्ग आणि नंतर ग्राहक, असा आपला दृष्टिकोन असल्याने व्यवस्थापन व कर्मचारी यांचे संबंध जिव्हाळ्याचे आहेत. उतारवयातही ओबेरॉय गरजेप्रमाणे आपल्या साखळीमधील विविध हॉटेल्सना भेटी देतात. व्यवस्थापनाची सूत्रे त्यांच्याकडे असली तरी स्वतःच्या सुखसोयीबाबत ते फारशा अपेक्षा ठेवून नसल्याने त्यांच्यासाठी म्हणून कधीही सूट राखीव ठेवला जात नाही. ते येतात, उपलब्ध असलेल्या सूटमध्ये राहतात आणि काम संपले की आपला मुक्काम हलवतात. ते म्हणतात— उत्तम बेड आणि लिहायला चांगले

टेबल असले की माझे काम भागते. त्यांचे कायम वास्तव्य दिल्लीला असते. वर्षामधील तीनएक महिने ते दिल्लीमधील आपल्या शेतावरील घरात असतात. अन्य वेळी अर्थातच भ्रमंती चालू असते. आज मुंबई तर उद्या काठमांडू. तेथून पुढे दार्जिलिंग. मग कधी श्रीनगर तर कधी सिंगापूर. त्यांच्या स्वतःच्या कार्यक्रमाची त्यांना स्वतःलाही पुरेशी कल्पना नसते. जेथे आणि जसे काम निघेल, तेथे हजर रहायचे, असा त्यांचा खाक्या असतो.

ओबेरॉय यांनी हॉटेल व्यवसायामध्ये जे मोठे यश मिळवले आहे ते अपार परिश्रम करून मिळवले आहे. त्यांच्या कारकीर्दीला सुरुवात कदाचित नशिबाने साथ दिल्याने झाली असेल; परंतु त्यापुढील वाटचाल ही अपार परिश्रम आणि योग्य वेळी योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता, यामुळेच शक्य झाली आहे. १९२२ साली ओबेरॉय आपल्या पत्नीसह ज्या वेळी सिमल्यामध्ये येऊन दाखल झाले, त्या वेळी त्यांच्या खिशात फक्त २५ रुपये होते; पण नशिबाने साथ दिली आणि ते हॉटेल व्यवसायात ओढले गेले. सेसिल हॉटेलमध्ये त्यांना बिलिंग क्लार्क म्हणून नोकरी मिळाली आणि त्यांचा हॉटेल व्यवसायात प्रवेश झाला. त्यांनी मन लावून काम केले आणि त्याचे फळही त्यांना मिळाले. केवळ दोन वर्षांत त्याच हॉटेलमध्ये त्यांना सहाय्यक व्यवस्थापक म्हणून बढती मिळाली. हॉटेल व्यवसायामध्ये जे काही शिकण्याची गरज असते ते त्यांनी तिथे शिकून घेतले. हा व्यवसाय आपण उत्तम प्रकारे करू शकू, अशी त्यांना खात्री होती; पण स्वतंत्रपणे व्यवसाय करण्याची संधी मिळत नव्हती. अखेरीस तोही योग आला. सिमला येथील क्लार्क्स् हॉटेल विक्रीसाठी काढण्यात आले होते. ओबेरॉय यांनी ते विकत घेण्याचे ठरवले. दरम्यान त्यांच्या नोकरीची दहा वर्षे पूर्ण झाली होती. जवळ थोडा पैसाही जमा झाला होता; पण तरीही हॉटेल विकत घेण्याची ताकद काही त्यांच्यामध्ये नव्हती. आलेली संधी गमवण्याचीही त्यांची इच्छा नव्हती. अखेरीस त्यांनी पत्नीचे दागिने विकले. स्वत:ची इतर मालमत्ता गहाण टाकली व पैसा उभा करून ते हॉटेल विकत घेतले. ओबेरॉय साखळी हॉटेल्सची मुहूर्त मेढ रोवली गेली. जेवढे प्रचंड यश त्यांच्या वाट्याला आले तेवढे यश आपण मिळवू शकू असे त्यांना वाटले होते का? या प्रश्नाला उत्तर देताना ओबेरॉय म्हणतात–अपयश मिळणार नाही याची खात्री होती; परंतु आज जे ओबेरॉयचे हॉटेल–साम्राज्य उभे आहे ते अपार परिश्रमातून उभे राहिले आहे! केवळ सिमल्यामधील एक हॉटेल चालवून थांबायचे नाही, असे मी सुरुवातीसच ठरवले असल्याने मी सतत व्यवसायवृद्धीच्या प्रयत्नात राहिलो. एक हॉटेल सुस्थिर झाले की, त्याचा सारा व्यवहार मार्गी लावून मी पुढे नवीन हॉटेल सुरू करण्याची योजना हाती घेत असे. ओबेरॉय साखळी मालिकेमध्ये जी हॉटेल्स आहेत त्यापैकी त्यांचे सर्वांत आवडते हॉटेल कोणते, असा प्रश्न विचारल्यावर ओबेरॉय म्हणतात, आमची सर्व हॉटेल्स मला प्रिय आहेत. पालकांना त्यांची मुले जशी प्रिय असतात तसे माझे या हॉटेल्सबाबत आहे. हॉटेल्सच्या जागेबाबत आम्ही विशेष जागरूक असतो. मुंबईच्या ओबेरॉय टॉवर्सवरून समुद्राचा आणि मरीन ड्राइव्हचा उत्कृष्ट देखावा दिसतो. दिल्लीच्या इंटरकॉंटिनेंटलमधून गोल्फ मैदानाचा परिसर नजरेला सुखावतो. काश्मिरमधील पॅलेस हॉटेलमधून दाल सरोवर नजरेच्या टप्प्यात येते; पण कलकत्त्याचे ग्रॅंड हॉटेल हे ओबेरॉय यांचे विशेष आवडते हॉटेल! सिमल्यामधून बाहेर पडल्यावर त्यांनी घेतलेले हे दुसरे हॉटेल! मोठे ऐश्वर्य असलेली ही मालमत्ता त्यांनी घेतली त्या वेळी पोहण्याचा तलाव, उंच लाकडी तक्तपोशी असलेल्या जुन्या पद्धतीच्या खोल्या त्यांना आवडल्या. त्यांनी हॉटेल घेतल्यावर ते विलक्षण स्वच्छ राहील याची दक्षता घेतली. हॉटेलच्या मूळ स्वरूपात फारसा बदल केला नाही. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर त्यांची उत्तम बडदास्त ठेवली. रायबहादूर असा किताब देऊन त्या वेळच्या ब्रिटिश शासनाने त्यांच्या कामगिरीचा गौरव केला!

दिल्लीमध्ये वर्षामधील दोन–तीन महिन्यांचा जो मुक्काम असतो तोच काहीसा आराम! त्यांचे शेतावरील घर संसदभवनापासून मोटारने केवळ दहा मिनिटांच्या रस्त्यावर आहे. शेतावरील घरी असल्यावर ओबेरॉय बाग–बगिचामध्ये जातीने लक्ष घालतात. आज प्रत्येक व्यवसायामध्ये कामगार प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले असले तरी ओबेरॉयच्या बाबतीत हा प्रश्न नाही. जास्तीत जास्त लोकांना नोकऱ्या देऊन त्यांच्याकडून उत्तम काम करवून घेण्याबद्दल ओबेरॉय यांचा हातखंडा आहे. ते म्हणतात, मोठी लोकसंख्या असलेल्या देशामध्ये आमची हॉटेल्स जास्तीत जास्त लोकांना नोकऱ्या देण्याचा प्रयत्न करतात. व्यवस्थापन व कर्मचारी यांचे संबंध उत्कृष्ट आहेत. अनेक कर्मचाऱ्यांना मी व्यक्तिशः ओळखतो. त्यांच्या कुटुंबियाबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल आम्हाला चांगली जाणीव असते. आम्ही त्यांच्यासाठी शक्य ते सर्व करत असल्याने त्यांच्याकडून आमच्या ज्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करण्याचा ते झटून प्रयत्न करतात. त्यांचे पूर्ण सहकार्य असल्याने ओबेरॉय साखळी हॉटेल्सचे साम्राज्य आज निर्विघ्नपणे उभे असलेले दिसते.

## □ विश्वचषक हॉकीमध्ये मोठा पराभव!

विश्वचषक हॉकी स्पर्धेमध्ये भारतीय हॉकी संघ साखळी मालिकाही भेदू शकला नाही, याची खंत क्रीडाशौकिनांना वाटल्यावाचून रहाणार नाही. जागतिक पातळीवरील स्पर्धेमध्ये ज्या थोड्या खेळामध्ये भारतीय खेळाडूंनी लक्षणीय कामगिरी बजावली आहे, अशा मोजक्या खेळापैकी हॉकी हा एक खेळ. त्यात विश्वचषक, स्पर्धा मुंबईत होत असल्याने क्रीडा–शौकिनामध्ये दांडगा उत्साह होता; परंतु ऑस्ट्रेलियाबरोबर झालेल्या अखेरच्या साखळी सामन्यामध्ये भारतीय संघ पराभूत झाल्याने भारत खेळत असलेल्या 'ब' गटातून ऑस्ट्रेलिया व हॉलंड यांनी साखळी स्पर्धा भेदून उपांत्य फेरीत प्रवेश करून भारताला मागे टाकले! भारत साखळी मालिकेमध्ये दोन सामने हरला! भारताला पराभूत करणाऱ्या हॉलंडबरोबर रशियाने बरोबरीची झुंज दिल्याने भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात बरोबरी केली असती तरी हा संघ उपांत्य फेरीत प्रवेश करू शकला असता. त्यातल्या त्यात समाधानाची बाब एवढीच की, भारतीय संघाचा खेळ तसा काही अगदीच वाईट झाला नाही; परंतु गोलक्षेत्राजवळ गेल्यावर ज्या चपळाईची आवश्यकता असते ती दाखवता न आल्याने भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्ध यश नोंदवता आले नाही. भारतीय संघावर दडपण होते परंतु खेळाडू मोकळेपणाने खेळत, होते ही पण विशेष बाब मानली पाहिजे. भारतीय संघाचा सेंटर फॉरवर्ड सुरिन्दर याने जर अपेक्षित कामगिरी बजावली असती तर चित्र वेगळे दिसले असते. अर्थात हा झाला 'जर तर' चा भाग. या सामन्यात भारतीय गोलरक्षक नेगीने उत्तम कामगिरी बजावल्याने भारताच्या वाट्याला २–१ असा माफक पराभव आला. आता उपांत्य फेरीमध्ये 'अ' गटामध्ये ५ ही सामने जिंकणारा पाकिस्तान व दुसऱ्या क्रमांकावर असलेले जर्मनी यांनी प्रवेश केला असून भारताला माती चारून मुसंडी मारणाऱ्या ऑस्ट्रेलिया व हॉलंड यांनी 'ब' गटातून साखळी–स्पर्धा भेदली आहे. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत विश्वचषकाचा सन्मान करून पाकिस्तानी संघ परत गेला असेल! हॉकीचे हे असे हसे होत असताना इंग्लंडविरुद्धची क्रिकेट-आघाडी बरी लढवली जात आहे, हे त्यातल्या त्यात समाधान म्हणायचे □

# शेतकरी संघटनेचे सटाणा अधिवेशन

## एका कार्यकर्त्याच्या दृष्टिकोनातून

शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन सटाण्याला (जि. नाशिक) दि. १, २ व ३ जानेवारी ८२ ला भरले होते. या अधिवेशनाला शेतकऱ्यांचा म्हणावा तसा प्रतिसाद लाभला नाही, असे समजून, वृत्तपत्रांनी त्यावर बरीच टीकाही केली. वस्तुस्थिती काय होती ? जमलेल्या शेतकऱ्यांना हे अधिवेशन कसे वाटले ? कार्यकर्ते कुठली प्रेरणा घेऊन गावोगावी परतले ?

मराठवाड्यातून आलेल्या एका तरुण कार्यकर्त्याचे हे निवेदन. त्याच्याच भाषेत....शब्दात....

कार्यकर्त्याचे नाव....देवीदास पवार

सटाणा गावात लोकांच्या येण्याचा वेग दिवसागणिक वाढतच होता. दुपारी बाराच्या सुमारापासून शिवाजीपुतळ्याजवळ लोक आजूबाजूला जमत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक वेगळं चित्र दिसत होते. एका नव्या स्वप्नाचे डोहाळे लागलेली माणसं तिथं वेडावून आल्याचे पावलोपावली जाणवत होते. आज आमच्या जीवनातील आनंदाचा परमोच्च बिंदू सापडतोय, इतका आत्मविश्वास या असंख्य चेहऱ्यांवर जाणवत होता.

शिवाजीपुतळ्याजवळ वाद्य वाजण्याचा गलबलाट सुरू झाला. आकाशात आवाज घुमत होता. या आवाजात एक प्रकारचा आक्रोश होता– ज्यात पिढ्यान्‌पिढ्या झालेल्या पिळवणुकीची चीड होती, नव्या जीवनमूल्याच्या आकांक्षेचा ध्वनी होता.

या सर्व दुमदुमत्या आवाजाच्या गर्जनात सुशोभित केलेल्या गाडीवर या सर्वांच्या चैतन्याचे प्रतीक उभे होते.

महाराष्ट्रातील दऱ्या-खोऱ्यात राहणाऱ्या, गुलामगिरीत पिचत पडलेल्या माणसाला, मावळ्यांना एकत्र करून, त्याना स्वराज्याची स्वप्नं साकार करण्याची प्रेरणा देणाऱ्या शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून या दऱ्या-खोऱ्यांतील शेतकऱ्यांच्या मिरवणुकीला सुरुवात झाली.

शिवाजीमहाराजांची प्रेरणा घेऊन जगणारे मावळे आपल्या ताकदीचे प्रचंड लोट घेऊन 'क्रांति मैदाना'कडे जात होते. असंख्य शेतकरी आपले देहभान विसरून या मुक्तीच्या मिरवणुकीत नाचत होते. काही लोक या मिरवणुकीच्या अगोदर पुढे जाऊन आपली ऐतिहासिक साक्ष नोंदण्यासाठी 'क्रांति मैदानावर' दाखलही झाले होते !

या मिरवणुकीच्या मध्यभागी या चळवळीचा आत्मा-प्राण होता. शरद जोशी, माधवराव मोरे हे तिथे व्यक्तिरूपात दिसतच नव्हते. त्यांच्या रूपाने एक विचार या मिरवणुकीत मध्यभागी तळपत होता. आम्ही वयाने थकलो तरी लढण्यात तुमच्या बरोबरीने शेवटपर्यंत राहू याची साक्ष देणारे भाई धारियाही होते ! या सर्वच गोष्टीचा एकत्रितपणे संयोग पाहण्याची संधी ज्यांना आली त्यांना जीवनातील महान आनंदाचा क्षण लाभला.आपल्या मुक्तीच्या लढ्यातील सैनिकांची मिरवणूक तब्बल एक-दीड तासाने क्रांतिमैदानावर येऊन पोहोचली.

आता शेतकरी कोणत्या मागण्यांसाठी आंदोलन करतोय हे नव्याने सांगण्याची गरज वाटत नाही. 'आम्ही आमच्या घामाला योग्य दाम मागतोय !' ही एक कलमी मागणी घेऊन अवघ्या दोन वर्षांच्या आत सबंध हिंदुस्थानातील शेतकरी या देशातल्या प्रस्थापितांच्या विरोधात लढण्यासाठी रस्त्यावर येत आहे; पण या व्यवस्थेचे रखवालदार मात्र ही शक्ती वेळोवेळी चिरडून टाकण्याचे प्रयत्न जागृतपणे करत असल्याचेही दिसत आहे.

परवाच झालेल्या १० नोव्हेंबरच्या 'रस्ता-रोको' आंदोलनात महाराष्ट्रात असंख्य ठिकाणी लाठीमार झाला. निर्घृणपणे गोळ्या चालवल्या गेल्या. एवढेच नाही तर परप्रांतातील राखीव दलाल पाचारण करून दहशत निर्माण करण्याचे कामही आमच्या म्हणवून घेणाऱ्या सरकारानी केले !

इथल्या व्यवस्थेची भाटकी करणारी जी वृत्तपत्रे आहेत त्यांनीही यावर कुचाळकी करण्याचा प्रयत्न केला; पण महाराष्ट्रभर झालेल्या जागोजागीच्या आंदोलकांनी सरकार व त्याच्या पाठीराख्यांची झोप उडवली हे सत्य आहे.

या एक दिवसाच्या आंदोलनाने इथल्या शेतकऱ्यांत निश्चित आत्मविश्वास वाढला होता. यानंतर आपल्या संघटनेचे अधिवेशन घेण्याची कल्पना शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी ठरवली व १, २, ३ जानेवारी ८२ रोजी, नवीन वर्षाच्या नव्या दिवशी, या देशातल्या नवीन इतिहास घडवणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनाचे पहिले अधिवेशन घेण्याचे जाहीर झाले.

आजपर्यंत इथे झालेल्या अधिवेशनांपेक्षा वेगळ्या पद्धतीचे अधिवेशन घेण्याचीच कल्पना संघटनेने आखली होती.

शेतकरी संघटनेने केवळ वृत्तपत्रांतूनच या अधिवेशनासंबंधी महाराष्ट्रभर निरोप पोहोचवला होता; पण प्रत्येक हालचालीकडे लक्ष ठेवून बसलेला शेतकरी या तारखा समजताच इथे येण्याचा निर्णय करत असावा, असे इथे पाहिल्यानंतर वाटते.

सटाणा तसे फार लहान गाव आहे. इथे येणाऱ्या प्रतिनिधींची व्यवस्था कशी होईल असा प्रश्न मनात उभा ठाकत होता. महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात असलेल्या या गावाला येण्यासाठी लागणारा खर्च, इथे प्रतिनिधी म्हणून १५ रु. वर्गणी भरण्यासाठी लागणारे पैसे, तीन दिवस सतत करावा लागणारा खर्च, आदी बाबी आर्थिक स्वरूपाच्या असल्यामुळे इथे जास्त लोक येणारच नाहीत असे माझ्यासारख्या–पैसे देऊन लोक घेऊन जाणारी अधिवेशने पाहिलेल्यांना–वाटत होते.

९ जानेवारीच्या सकाळी सटाणा बस-स्थानकावर उतरताच प्रथम स्वागताचे वेगवेगळे फलक दिसू लागले. सहा वाजता गावात चहूकडे एखाद्या सणाची गडबड चालू असावी असे चित्र होते. प्रत्येक घरापुढे सडा-सारवण करून रांगोळीचे सुशोभित चित्र पावलापावलाला दिसत होते. कार्यकर्ते बाहेरून बसस्थानकावर उतरणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीला अधिवेशनाच्या ठिकाणाकडे घेऊन जात होते.

अधिवेशनाच्या प्रवेशदाराजवळ पोहोचताच थोडसं थांबावे वाटले, कारण या दाराच्या वरच्या बाजूला 'हुतात्मानगर' असे नाव दिसले, मतात तसा हा शब्द सगळ्या आठवणीचे काहूर माजवून गेला.

आत प्रवेश केल्यानंतर मंडपात काही छायाचित्रे दिसली. ती छायाचित्रे कुठल्या महान समजल्या जाणाऱ्या पुढाऱ्यांची नव्हती वा समाजसुधारकांची नव्हती. या आंदोलनात ज्यांनी आपल्या नवीन इतिहासाची सुरवात आपल्या रक्तानी लिहून केली त्यांची ही छायाचित्रे होती.

नेहमी अनुभवल्याप्रमाणे हे अधिवेशन सकाळी ठीक ९ वाजता सुरु होणार नाही असा अंदाज वाटत होता. सकाळी लोकाची येण्याची गर्दी वाढत होती. प्रत्येक शेतकरी तिथे पोहोचताच प्रतिनिधी–शुल्क भरून, छातीवर आपल्या स्वातंत्र्याचा बिल्ला लावून व्यासपीठापुढे येऊन बसत होता. पूर्वी ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे कार्यक्रमाला वेळेवर सुरवात होत असल्याचे संयोजकाने जाहीर केले व या ऐतिहासिक अधिवेशनास सुरवात झाली.

या शेतकरी संघटनेच्या पहिल्या अधिवेशनांना भव्य असं व्यासपीठ व मंडप चकित होण्यासारखेच होते.

व्यासपीठावर कुठली मंडळी येणार ही उत्सुकता होती. तितक्यात काही नावांची यादी वाचून समुदायात बसलेल्या कार्यकर्त्यांनी व्यासपीठावर बोलावण्यात आले. ज्यात शेतकरी संघटनेचे सूत्रधार असलेले शरद जोशी, माधवराव मोरे, प्रल्हाद पाटील कऱ्हाड हे तर होतेच, पण मराठवाडा, विदर्भ, कोकण, आदी भागातील प्रमुख कार्यकर्तेही होते. याशिवाय निपाणीचे धारिया चौगुले, मध्यप्रदेशचे मुनिबजी, आंध्रचे हरिश्चंद्र रेड्डी, ओरिसाहून आलेले रॉय, रमाकांत चौधरी (बिहार) आदी इतर राज्यातील शेतकरी प्रतिनिधीही उपस्थित होते. अधिवेशनाचे अध्यक्ष, संघटनेचे लढवय्ये नेते माधवराव खंडेराव मोरे होते व उद्घाटक श्री. शरद जोशी.

हुतात्मानगरीत लावण्यात आलेल्या शेतकरी हुतात्म्यांच्या प्रतिमेला हार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

अधिवेशन सावरकरांच्या 'जयोस्तुते जयोस्तुते' या स्वातंत्र्य–गीताने सुरू झाले. आश्रमशाळेतील मुलांनी गायत्री मंत्र, पसायदान आदी संस्कृत मंत्र म्हटले.

शेतकरी आंदोलनात धारातीर्थी पडलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहून स्वागताध्यक्ष श्री. रामचंद्र बापू पाटील यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली.

शरद जोशी यांनी व्यासपीठावर ठेवलेली समई प्रज्वलित करून या अधिवेशनाचे उद्घाटन केले.

## जिवंत माणसांचे अधिवेशन

स्वागताध्यक्षांनी श्री. शरद जोशी, माधवराव मोरे व प्रल्हाद पाटील कऱ्हाड यांचे भारतीय पद्धतीने फेटे बांधून स्वागत केले व आपले स्वागतपर भाषण केले. बागलाण भागाची ऐतिहासिक व लढाऊपणाची परंपरा सांगितली व उपस्थिताचे संयोजक या नात्याने अभिनंदन केले.

शेतकरी आंदोलनात ज्यांनी महाराष्ट्रातील सर्वच शेतकऱ्यांचे हृदय हलवून सोडले असे नेते माधवराव मोरे अध्यक्षीय भाषणाला टाळ्यांच्या गडगडाटात उठले.

या अधिवेशनासंबंधी बोलताना श्री. मोरे म्हणाले, 'हिंदुस्थानात आजपर्यंत असंख्य राजकीय पक्षांची अधिवेशने झाली व यापुढेही होतील, पण ती अधिवेशने मुडद्याचीच होती व हे अधिवेशन जिवंत माणसांचे आहे. असे जिवंत माणसांचे अधिवेशन इतिहासात पहिलेच ठरणार आहे.' आपल्या खास शैलीत माधवराव मोरे पुढे म्हणाले की, 'शरद जोशींनी आपल्याला लढावयास शिकवले आहे, आपण आपले प्रश्न सुटेपर्यंत यापुढेही सतत लढणार आहोत.

'आपले शत्रू किती मोठे आहेत यावर आपले मोठेपण ठरणार आहे, कारण आता येणाऱ्या इतिहासाच्या संकल्पना बदलत आहेत. सरकारचे नियंत्रण वाढत आहे. त्याना गर्जून सांगा. त्यांच्या झोपा उडाल्या पाहिजेत!'

माधवराव मोरेंच्या भाषणाने मंडपातील लोकात एक प्रेरणा दिसून येत होती. त्यांच्या एकएका शब्दाने मनाला डिवचणे चालू होते. याच वेळेस संघटनेचा आत्मा श्री. शरद जोशी व्यासपीठावर उद्घाटक म्हणून बोलण्यास उभे राहिले.

श्री. शरद जोशी यानी आपल्या बोलण्याची सुरवात या आंदोलनात कामी आलेल्या हुतात्म्यांच्या आठवणीपासून केली. ते म्हणाले, 'गेल्या दोन वर्षांत २२ जण या आंदोलनात हुतात्मे झाले आहेत. त्याच्या नातेवाईकांच्या आपल्याकडून काही अपेक्षा आहेत. या अपेक्षांची बाधिलकी कायम ठेवून हे आदोलन आपल्याला कायम ठेवायचे आहे. हे डोंगर चढण्याइतके अवघड आहे. त्यासाठी सूक्ष्म विचार करावा लागणार आहे!'

ते पुढे म्हणाले, 'मी शेतकऱ्याकडून खूप शिकलो आहे. जे काही शिकण्यासारखे शिल्लक आहे ते फक्त भारतातच आहे. 'इंडिया'त नाही.

'वेळ आणीबाणीची आहे. तेव्हा वेळेचे भान ठेवून भाग घ्या. मात्र ज्या पुढारीपणाच्या गुणानी पक्षांचे, संघटनाचे वाटोळे केले ते जर शेतकरी संघटनेला लागत असतील तर अशा पुढाऱ्यांना उचलून फेकून द्या!'

गेल्या वर्षी झालेल्या महाराष्ट्रातील आंदोलनाची प्रेरणा घेऊन देशभराचा शेतकरी बेचैन झाला होता. या आंदोलनानंतर कर्नाटक,

मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आदी राज्यांत चळवळी सुरू झाल्या. या आंदोलनातील प्रतिनिधी अधिवेशनात होते. त्यातले मध्यप्रदेशचे मुनीमजी यांनी आपल्या येथील आंदोलनाचा अनुभव सांगितला. त्यांनी नवीन इतिहासाची सुरवात करण्याचे काम नाशिक जिल्ह्याने केले, याबद्दल अभिनंदन केले. मध्यप्रदेशात गेल्या काही दिवसांत तिथल्या शेतकऱ्यांनी विजेचे बिल देण्याचे नाकारले. तहसील, रस्ता बंद आदी कार्यक्रम घेतले होते. थोड्याच भागात झालेले हे आंदोलन कसे प्रभावी स्वरूपाचे झाले हे त्यांनी मांडले.

गेल्या वर्षी महाराष्ट्रातील आंदोलनानंतर कर्नाटकात, निपाणी इथे तंबाखू उत्पादकांनी जे आंदोलन घडवून आणले त्या आंदोलनातील प्रमुख नेते भाई धारिया कर्नाटक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून उभे राहिले. ते म्हणाले, 'मी व्यक्तीचे कधीच दर्शन घेत नाही; पण विचारांचे घेतो. ज्या विचारात मानवी मुक्तीचे सामर्थ्य आहे त्याला मी वंदन करतो. म्हणून इथल्या नेत्याचे व्यक्ती म्हणून दर्शन घेत नाही, तर विचार म्हणून घेतोय !'

ते पुढे म्हणाले की, 'हा मानवमुक्तीचा विचार केवळ महाराष्ट्रापुरताच मर्यादित राहू शकत नाही. तो जगाचाच विचार ठरतो. त्याला मर्यादा नकोत. आम्ही केवळ भाव मिळावे म्हणून आंदोलन करत नाही. कारण स्वातंत्र्य-आंदोलनातील आमचे स्वप्न धुळीस मिळाले ! आता पुन्हा ती वेळ आली आहे. म्हणून इथून जाणाऱ्या प्रत्येक माणसाने इथे पेटवलेल्या ज्योतीचा प्रकाश घेऊन जायचे आहे व आपल्या मुक्तीच्या लढ्यातील असंख्य मशाली पेटवायच्या आहेत हे ध्यानात ठेवावे !'

यानंतर आंध्रचे शंकर रेड्डी यांनी आपल्या भागातील आंदोलनाचे अनुभव सांगितले.

उद्घाटनाच्या या कार्यक्रमानंतर लगेच अधिवेशनातील विषयाच्या चर्चेला सुरुवात झाली. दरम्यान दूरवरचे आणखी प्रतिनिधी जथ्याजथ्याने येतच होते.

आजपर्यंत झालेल्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनात, संघटनेचा विचार काय आहे तो फक्त जाहीर सभांतून मांडला जात असे. इतर संघटनांप्रमाणे संघटनेचे स्वरूप नव्हते, घटना नव्हती. यामुळे बऱ्याच हितसंबंधी लोकांनी टीका करणे सुरू केले होते.

या अधिवेशनात या सर्व गोष्टींवर चर्चा होऊन निर्णय होणार असल्यामुळे सर्वांनाच चर्चेची ओढ लागली होती.

¤

शेतकरी संघटनेच्या अधिवेशनातील चर्चेला पहिला विषय होता 'राजकीय परिस्थितीचा आढावा !' या विषयावर बोलताना श्री. शरद जोशी यांनी असे स्पष्ट केले की, 'आम्ही राजकारण करतो ते माणसांचे; पण बाकीचे मात्र खुर्चीचे राजकारण करतात. आमचे तसे नाही. आपण आजपर्यंत मांडलेल्या विचाराने सारा शेतकरी कावरा-बावरा झाला आहे. तो विचार आपल्याला तपासला पाहिजे !' शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेच्या संदर्भात त्यांनी ब्रिटिश साम्राज्यात या देशातील शेतकऱ्यांचे झालेले शोषण व स्वातंत्र्यानंतर इथल्या आमच्याच म्हणवणाऱ्या 'इंडिया'वाल्यांनी केलेले शोषण कसे सारखेच आहे, हे तुलनात्मकपणे मांडले.

'स्वातंत्र्यानंतर आलेल्या शासनाने दोन मोठ्या चुका केल्या. त्यातील एक म्हणजे शेतकऱ्यांचे शोषण पूर्ववत कायम चालू ठेवले व दुसरी कुवतीपलीकडचे निर्णय घेतले. या गोष्टीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू ते इंदिरा गांधी हे सर्वच सारखे जबाबदार आहेत !'

कुठल्याही पक्षाचे शासन सत्तेत आले तरी चालू व्यवस्थेत आम्हाला ते सारखेच आहे याचे उदाहरण देऊन जनता-काँग्रेस यांचे शेतकरीविरोधी धोरण श्री. जोशींनी स्पष्टपणे मांडले.

निवडणुकीच्या संदर्भात बोलताना श्री. जोशी म्हणाले की, मूळ प्रश्नावरून लक्ष विचलित करण्यासाठी हे निवडणुकांचे खेळ चालू असतात, यातून काहीही निघत नाही.

शरद जोशी यांनी श्री. सी. सुब्रह्मण्यम व राव बिरेंद्रसिंग या सत्तेतील पुढाऱ्यांच्या बोलण्याचा पुरावा देताना सांगितले की, 'शेतीव्यवसाय आज परवडत नाही. त्याला उत्पादनखर्चावर योग्य आधारित भाव मिळाला तरच शेती जगू शकते, असे हे सत्तेतीलच लोक कबूल करतात. याचा अर्थ, त्यांना सर्व कळूनही जाणूनबुजून शोषण सुरू ठेवण्याचा त्यांचा डाव आहे.'

राजकीय पक्षांचे विश्लेषण करताना ते म्हणाले की, 'राजकीय पक्षांचा गेल्या दोन वर्षांत अधःपात झाला आहे. राजकीय पक्ष बहुमताचा दावा सांगून आम्हीच लोकांचे प्रतिनिधित्व करतो असा दावा करतात ते साफ खोटे आहे. कारण खरी सत्ता निवडणुकीच्या राजकारणात नसतेच. ती जनतेच्या शक्तीत असते, हे यांना समजलेले दिसत नाही.'

नाणेनिधीबाबत ते म्हणाले की, 'परदेशी कर्ज काढण्याचे कारण शेतकऱ्याच्या मालाला वाढवून भाव द्यावयाचा नाही. यासाठी बाहेरून गहू, साखर आदी आयात-उद्योग सरकारने सुरू केले आहेत. इथल्या मालाच्या किंमती पाडाव्यात ही कुटिल नीती यामागे आहे. एकीकडे भाव पाडणे व दुसरीकडे दडपशाही करून चळवळ संपवणे हे शासनाचे आमच्या बाबतीत स्पष्ट धोरण दिसते.'

'अलीकडे लाचारी दाखविण्याची परिसीमा ओलांडली आहे. ४२ पूर्वीचीच परिस्थिती आज दिसते. तेव्हा या सगळ्या मग्रूर मनोऱ्यांना इतिहासाची धडक बसली की, हे कोसळणार आहेत !'

## शेतकरी संघटना आणि राजकारण

यानंतर या विषयावर जवळपास ३४ लोकांनी आपले विचार मांडले. त्यात सामान्यतः दोन प्रवाह प्रमुखपणे दिसत होते.

निपाणीच्या चौगुलेंनी आपण सत्तेचे राजकारण करावे. कारण आज आपले विचार तिथे कोणी सांगत नाहीत, असे बोलून या विषयाला सुरुवात केली. याच पद्धतीने आणखीन दोन-तीन वक्त्यांनी आपण सत्तेत जावे, संघटनेने निवडणुका लढवाव्यात, हे मत आग्रहाने मांडले.

पण बहुतांशी कार्यकर्त्यांचा या विचाराला तीव्र विरोध होता.

धुळ्याचे अनिल गोरे यांनी सगळ्याच पक्षांचे जाहीरनामे, कार्यक्रम यावर चर्चा करून सत्तेच्या मर्यादा स्पष्ट केल्या.

अर्जुन अहिरे यांनी लोकशाहीतील अधिकार काय आहेत हे स्पष्ट केले, व ते छिनून घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांना उचलून सत्तेबाहेर फेकले पाहिजे असे प्रतिपादन केले.

दौलतराव देवरे यानी इतर संघटित कामगार व शेतकरी यांच्या मागण्यांची तुलना करून आमच्यावरच अन्याय का होतो, हा प्रश्न विचारला. सत्तेतील मंडळी जात, पैसा आदीचे अस्त्र वापरून आंदोलने फोडण्याचे कारस्थान कसे रचतात हेही त्यांनी सांगितले. शेतकरी संघटनेच्या नेतृत्वामुळे जातीयवादी नेतृत्व संपुष्टात येणार आहे असे त्यानी उदाहरणे देऊन पटवले. आजपर्यंतच्या सत्तेचे स्वरूप काय राहिले याचे सुरेख विश्लेषण मांडले. तसेच या चर्चासत्राचा समारोप करताना शरद जोशी यांनी 'मी गांधीचा अनुयायी नाही; पण त्यांचा आदर ठेवणारा कार्यकर्ता आहे, असे सांगितले. ग्रामीण भागाचे शोषण शहरी भागातील लोक करतात हे तत्त्व मी गांधीकडून शिकलो ! पण गांधींच्या काही शिष्यांनीच त्यांच्या विचाराचा पूर्ण अर्थ न समजल्यामुळे पराभव केला !' असंही ते म्हणाले.

आजच्या सत्तेतील माणसाला किती मर्यादा आहेत हे स्पष्ट करताना ते म्हणाले, 'सत्तेत गेलेला माणूस बाहुलीसारखा इथल्या भांडवलदारांच्या इशाऱ्यांवर नाचत असतो. खरी सत्ता खुर्चीत नाही, तर ती शेतकरी संघटना जिथे जाऊ इच्छिते तिथे आहे. निवडणुकीचा खेळ अवघड आहे. लोकाचे अनुकरण करून आम्ही तो खेळण्याचा प्रयत्न केला तर फसून जाण्याची शक्यता आहे. तेव्हा आम्हाला परवडणारा खेळ आम्ही खेळू. दुसऱ्याला त्याप्रमाणे खेळवू! तिकिटांचे राजकारणी पुन्हा आपल्या व्यासपीठावर दिसतील. तेव्हा या जनशक्तीचा रेटा वाढला तर तीन वर्षांत हे भ्रष्ट नेतृत्व संपून जाईल यात शंका नाही. कारण खरे निर्णय रस्त्यावर होणार आहेत. संसदेत जाऊन होऊ शकत नाहीत!'

शेतीमालाचे भाव ठरवून देणारे कृषी मूल्य आयोग कुठल्या निकषावर भाव ठरवते व ते निकष कसे चुकीचे आहेत हे शरद जोशींनी या विषयावर मांडणी करताना सांगितले.

या संदर्भात बोलताना त्यांनी शासनाच्या दुहेरी धोरणाचा उल्लेख केला.

'गेल्या वर्षी केंद्रीय कर्मचाऱ्यांचे चार महागाईभत्ते वाढले. महागाई फक्त कर्मचाऱ्यांनाच वाढली का? कारण शेतकऱ्यांच्या मालाच्या किमती मात्र गेल्या वर्षीइतक्याच ठरवण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारने तर राज्य सरकारला भाव वाढवू नका ! म्हणून आदेश दिले आहेत. कोणत्याही वस्तूचा तुटवडा झाला की, आंदोलने होतात. म्हणून परदेशांतून जास्त पैसे देऊन मालाची आयात करून इथल्या शेतकऱ्यांच्या मालाचे भाव पाडण्याचे शासनाचे धोरण आहे.

'शेतीमालाचे उत्पादनखर्च कसे चुकीचे धरतात याची कबुली अन्नमंत्री राव बिरेंद्रसिंग देतात. सध्याचे कृषी मूल्य आयोग कारकुनी पद्धतीचे आहे. ते शेतकऱ्याला अत्यंत घातक आहे. तेव्हा हे कृषीमूल्य आयोग रद्द करावे व शेतीमालाचे भाव ठरवताना नवीन निकष ठेवून उत्पादन खर्चावर आधारित योग्य किमत मिळावी, अशी मागणी श्री. शरद जोशी यानी केली.

अंबाजोगाईचे श्री. श्रीरंगराव मोरे यांनी कृषी मूल्य आयोगाच्या चुकीच्या धोरणावर सडेतोड टीका केली.

या चर्चेत विजय जावंधिया, प्रा. अरविंद कुलकर्णी, शेषराव मोहिते, अशोक जैन आदी कार्यकर्त्यांनीही आपले विचार मांडले.

पहिल्या दिवशीच्या संध्याकाळचे चर्चासत्र संपण्यापूर्वी १५ हजार प्रतिनिधींची नोंद झालेली होती. आणखीन लोक सतत येत होते.

## शेतकऱ्याला नफा झाला तर ?

शेतकरी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत २७ हजार प्रतिनिधींची नोंद झाली होती. या दिवशीच्या पहिल्या सत्रात ब्रिजप्रसाद रॉय (ओरिसा), रमाकांत चौधरी (बिहार) यांची देशातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अभ्यासपूर्ण भाषणे झाली.

शेतकरी आंदोलनावर केल्या जाणाऱ्या टीकेत ही एक प्रमुख टीका होती की, जर शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव योग्य मिळाला तर त्या पैशाचा विनियोग हे अडाणी शेतकरी वाईट मार्गानेच करतील. त्यांना त्यांचा विनियोग करता येणार नाही. (असले आरोप भाव मिळण्याअगोदरच सुरू झाले होते.) शेतीमालाला भाव मिळाल्यानंतर सगळेच प्रश्न सुटणार आहेत का? पैसा जास्त आल्यानंतर चैनीच्या गोष्टी खरेदी करून इथल्या भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे शेतकरी पोषण करतील का? असे अनेक प्रश्न या भांडवलदारी चौकटीत सुख उपभोगत बसलेले विचारवंत विचारत असतात.

तेव्हा हे आरोप कसे बिनबुडाचे आहेत, हे या अधिवेशनात मांडण्यात आले. यावर बोलताना शरद जोशी म्हणाले की, गेल्या वर्षी उसाला व कांद्याला भाव मिळाल्यानंतर त्या त्या भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांनी आपल्या गहाण पडलेल्या सावकाराकडील जमिनी सोडवून घेतल्या.

दुसरे काम म्हणजे, शेतीवरील भांडवली खर्च म्हणजे विहिरी खोदणे, पंप वा इंजिन बसवणे, इतर अवजारे खरेदी करणं, खते खरेदी करणे इत्यादी. ह्या योजना आजपर्यंत जितक्या कधीच झाल्या नव्हत्या त्या या वर्षी पूर्ण झाल्या.

बँकांचे कर्ज, सोसायट्यांचे कर्ज, खाजगी सावकारी आदी कर्ज शेतकऱ्यांनी त्वरित परत केली.

जन्मभरात आपल्या आया-बहिणींना तीस-चाळीस रुपयांच्यावरचे धडूत घेतले नव्हते ते या वर्षी जरा व्यवस्थित घेण्यात खर्च केले. पोरा-पोरींची लग्ने केली.

याचा अर्थ स्पष्ट होतो की, शेतकरी वेडा आहे असे कोणी मानू नये. ग्रामीण भागात नवीन रोजगार निर्माण करण्यासाठी नेमके किती प्रयत्न झाले हे अजून सांगता येत नाही; पण त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत हे निश्चित.

या विषयावर पुढे बोलताना श्री. जोशी यांनी चुकीच्या आर्थिक धोरणांवर कडाडून टीका केली. ते म्हणाले, 'स्वातंत्र्यापूर्वी इथे सावकारशाही शेतकऱ्याचे शोषण करत होती हे सत्य आहे; पण किमान ते या शोषणाचे पैसे काही प्रमाणात गावातच खर्च करत होते; पण आज सावकारशाहीसारख्याच निर्माण झालेल्या सहकारशाहीने, व्याजापोटी शेतकऱ्याचे शोषण करून तो पैसा शहरांच्या विकासात खर्च करून, ही नवीन वेठबिगारी सुरू केली आहे. शेतकरी मात्र शहाणपणाने पैसा खर्च करतो हे सर्वांनी ध्यानात ठेवावे !

या विषयावर बोलताना माधवराव मोरे यांनी सांगितले की, आजपर्यंत कर्जाच्या बोजाखाली सह्या करता करता हाताला घट्टे पडले;

पण गेल्या वर्षी निफाड भागातील शेतकऱ्यांनी आपल्या कर्जाची पूर्णपणे परतफेड केली, यातच आमची नैतिकता व प्रामाणिकपणा दिसून येतो !'

आपल्या देशात ब्रिटीश वसाहतवाद्यानी रुजवलेली मूल्ये कायम स्वरूपात जपण्याचा वारसा सत्तेतल्या मंडळींनी घेतला आहे, हे अनेक उदाहरणे देऊन, पहाडी आवाजात प्रल्हाद पाटलानी श्रोत्यांना पटवले.

ते म्हणाले 'सटाणा इथे भरलेल्या शेतकरी अधिवेशनाला तसे ऐतिहासिक महत्त्व आहे. कारण जगातील शोषणमुक्त अर्थव्यवस्थेच्या समाजव्यवस्थेची सुरुवात या अधिवेशनापासून होणार आहे. म्हणून हे साल ऐतिहासिक साल ठरणार आहे.

'या देशात इंग्रजाच्या परंपरेने, इथल्या व्यवस्थेचा गुलाम बनलेल्या शेतकऱ्याला, छोटा–मोठा किंवा कोरडवाहू, बागायतदार असा भेदभाव दर्शवून, एकमेकात झुजवत ठेवण्याचे काम 'इंडिया'-वाल्यांनी केले. लहान–मोठा हा पिढ्यातील फरक आहे. आजचा बडा समजला जाणारा शेतकरी उद्या अल्पभूधारक, परवा शेतमजूर असा फरक होत गेला आहे. शेतकरी आंदोलनावर टीका करणारे, कधीकधी या आंदोलनात परकीय हात आहे, असे म्हणतात. या टीकेचा त्यानी इन्कार केला. त्यानी एक गोष्ट बागायतदार शेतीसंबंधी सांगितली की, 'शेतीला पाणी मिळाले तर ती पिकते; पण ती परवडते असे मानण्याचे कारण नाही.'

या अधिवेशनात गांधीवादी विचारांचे श्री. ठाकूरदास बंग यांनी हे आंदोलन व्यवस्था–परिवर्तनाचे कसे आहे याची तुलनात्मक मांडणी केली. ते म्हणाले, 'गांधीनी सांगितले होते की, आमची गावे बेचिराग झाली आहेत. कारण आम्हाला खरे अर्थशास्त्र व समाजशास्त्र समजलेच नाही !' सर्वांनी राष्ट्रोपयोगी गोष्टींचे उत्पादन करणे हेच इथले अर्थशास्त्र आहे.'

'या आंदोलनातील इंडिया विरुद्ध भारत ही मांडणी आकर्षक आहे. संघटनेचे सदस्यत्व पाठीवरच्या लाठीमारावर अवलंबून आहे, हे पटले म्हणून मी इथे स्वत: होऊन आलो. यापुढे ग्रामीण भागातील पैसा इंडियात जाऊ नये. तो खेड्यातच गुतवून ठेवला तर ही व्यवस्था निश्चित बदलेल.'

समाजवादी चळवळीतील कामगारनेते श्री. किशोर पवार यांनी स्पष्ट सांगितले की, राजकीय पक्ष ज्या चळवळी, वळवळी करतात त्या स्वार्थी स्वरूपाच्या असतात. राजकीय पक्ष प्रश्न सोडवूच शकत नाहीत. म्हणून माझ्या पक्षाच्या कार्यक्रमात सहभागी न होता पक्षाचा झेंडा खाली ठेवून मी या शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमात सहभागी झालो आहे. शेतकरी व कामगार यापुढे हातात हात घालून काम करतील.

## शेतमजुरांचे वेतन

छोटा शेतकरी, मोठा शेतकरी, कोरडवाहू-बागायतदार असा भेद निर्माण करण्याचा सतत प्रयत्न होतो. सत्तेच्या राजकारणासाठी हे टिकवून ठेवले जाते. शेती जर किफायतशीर नसेल तर मोठ्या शेतकऱ्याला जास्त तोटा व लहान शेतकऱ्याला कमी तोटा बसत असतो, हे श्री. जोशी यांनी उदाहरण देऊन सांगितले.

अधिवेशनात सर्वांत मोठे वादळ शेतमजुराच्या वेतनाबाबत उठते. शेतकऱ्याकडे जर पैसा आला तर, तो शेतमजुराला मिळण्याची शक्यता काय, या प्रश्नाला उत्तर देताना श्री. जोशी म्हणाले की, गेल्या वर्षापेक्षा या वर्षी शेतमजुरीत निश्चित प्रमाणात वाढ झाली आहे; पण ती कमी आहे. शास्त्रोक्त पद्धतीने ११ रु. ४५ पैसे मजुरी धरण्यात यावी अशी मागणी आहे. सरकारने शेतीमालाच्या किंमती ठरवताना जर १२ रुपये किमान वेतन धरून ठरवले तर शेतकरी संघटना १५ रुपये मजुरी देण्याचे जाहीर करते. जर शेतकऱ्याला पैसे मिळूनही शेतमजुराला योग्य दाम मिळत नसेल तर शेतमजुराच्या बाजूने मी सर्वप्रथम उभा राहीन !

'कामगाराची परंपरा कोरडवाहू शेतकऱ्यांची आहे. तेव्हा शेतकरी, शेतमजूर, कामगार यांची एकच फळी करून संघटितपणे पुढे लढायचे आहे.

'कामगार जर आमच्या आंदोलनात सहभागी होतच असतील तर त्यांच्या १९ जानेवारीच्या आंदोलनाला शेतकरी संघटना पाठिंबा जाहीर करते, हे श्री. जोशी यानी सांगितले.'

गेल्या चार वर्षांपासून काम करणाऱ्या शेतकरी संघटनेचा आजपर्यंत घटना, सदस्य नोंदणी हा संघटनात्मक काही प्रकारच नव्हता. या अधिवेशनात यावर सविस्तर चर्चा होऊन घटना तयार होईल असा अंदाज होता. तसे इथे बऱ्याच कार्यकर्त्यांनी ग्रामपातळीपासून ते राज्यापर्यंत स्वरूप कसे असावे, सभासद कोण राहील यावर मते मांडली; पण शरद जोशी यांनी या सर्व गोष्टी बादच ठरवल्या. त्यांनी सांगितले की, इतर ज्या घटना व पदाधिकाऱ्यांच्या संघटना आहेत त्यांची कशी दुर्दशा होत आहे, हे ध्यानात घ्यावे. या सर्व गोष्टी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करावी लागेल. तेव्हा जो कोणी या आंदोलनाचा सैनिक राहील तो इथला कार्यकर्ता, नेता बनेल. हे आंदोलन केवळ एकच मागणी घेऊन पुढे जात आहे. घटना वगैरे करून जनआंदोलने उभी करणे अत्यंत अवघड आहे.

'संघटनात्मक बांधणी' या विषयावर बोलताना 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक श्री. माजगावकर यांनी कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊन सुसंस्कारित, शिस्तबद्ध बनवले तरच चळवळ व्यवस्थित पुढे जाऊ शकते, असे सांगितले.

संघटनात्मक बाबींवर चर्चा करताना, मागील आंदोलनात अनुभव आल्यावरून, काही वेगवेगळ्या आघाड्यांवर काम करणारे, त्या त्या क्षेत्रातले लोक एकत्र करून एखादा गट निर्माण करावा असा विचार चर्चेच्या ओघात व्यक्त झाला.

याव्यतिरिक्त अधिवेशनात पुढील महत्त्वाचे निर्णय झाले.

लोकांनी त्रासून जावे म्हणून सरकारने खोटे खटले दाखल केले आहेत. कायद्याची माहिती नसल्यामुळे लोक घाबरत असतात. तेव्हा आपले ज्या ज्या ठिकाणी सहानुभूतीदार वकील आहेत त्याना एकत्र आणून याबाबत लोकांना मार्गदर्शन व मदत करण्याची व्यवस्था करावी !

आंदोलनात जखमी झालेल्या कार्यकर्त्यांपर्यंत तातडीने वैद्यकीय मदत पोहचवण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

वेगवेगळ्या भागांतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करण्यासाठी शिबिरांची मालिका ठरवून प्रशिक्षण करणे अत्यंत जरुरीचे आहे.

वृत्तपत्राच्या माध्यमाचा सध्या फार उपयोग होतो असे नाही. कारण त्यांचे हितसंबंध वेगळ्या स्वरूपाचे असतात. तेव्हा त्यांच्यावर राग काढण्यापेक्षा तालुका, जिल्हा पातळीवर लहान लहान वृत्तपत्रे काढून, ती साखळीपद्धतीने चालवून, लोकांच्यापर्यंत विचार पोचवता कार्यक्रमाबाबतची माहिती येते.

या आंदोलनात हौतात्म्य पत्करलेल्यांच्या नातेवाइकांना शेतकरी संघटना काही जास्त मदत करू शकली नाही. त्यासाठी एक 'विश्वस्त निधी' उभा करून त्या कामी जमलेल्या पैशाचा विनियोग करावा.

कार्यक्रमाच्या संदर्भात मार्च–एप्रिलपर्यंत महाराष्ट्रभर प्रचार-सभा, शिबिरे घेऊन जागृती निर्माण करण्याचे काम संघटना करणार आहे व यानंतर दूध-आंदोलन सुरू करण्याचा निर्णय झाला.

## सुभाष जोशींचे आवाहन

निपाणी तंबाखू व विडी कामगार महिला संघटनेचे नेते प्रा. सुभाष जोशी यांनी निपाणीतील अत्याचाराच्या घटना सांगितल्या. तिथल्या मजुरांचे व शेतकऱ्यांचे शोषण करणारे दलाल एकच होते. त्यांच्या विरोधात निपाणीच्या विडी कामगार महिलांनी रस्त्यावर येऊन इतिहास घडवला, हे सत्य आहे. तेव्हा या समाजाचा अर्धा समाज दूर ठेवून इथे काहीही करता येत नाही, तेव्हा घरातील स्त्रियांना तुमच्या सोबत कार्यक्रमात घेऊन या, असे प्रा. जोशींनी आवाहन केले.

स्त्री-जीवनातील शोषणाचा कसा क्रम आहे व तो कुठल्या कुठल्या मार्गाने होतो याची करुण कहाणी लीलाताई जोशी यांनी मांडली. या अधिवेशनात स्त्री म्हणून बोलणाऱ्या त्या एकट्याच होत्या.

स्त्रियांच्या प्रश्नावर बोलताना श्री. जोशी यांनी सांगितले की, 'शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या शक्तींचा आपण निषेध करतो, तुमच्या लढवय्यापणाबाबत अभिनंदनही करतो; पण शेतकऱ्याच्या शोषकांचा जसा जाहीर निषेध करतो तसाच, जो शेतकरी आपल्या घरच्या बायको, मायबहिणी यांचे शोषण करतो त्यांचाही मी जाहीर निषेध करतो ! शेतकरी संघटनेच्या कुठल्याही कार्यक्रमात बहुसंख्य आया–बहिणी येत नाहीत. शेतकरी पुरुषाने 'शेतकरी संघटना म्हणजे कारभाऱ्यांची संघटना नाही!' हे ध्यानात ठेवावे. पिढ्यान्‌पिढ्या पिचत पडलेल्या या आया–बहिणींनाही या व्यवस्थेतून मुक्त होऊ द्या ! '

समारोपाच्या भाषणात त्यांनी पुन्हा एकदा परिस्थितीचा आढावा घेऊन आंदोलनाची दिशा दाखवून दिली.

गेल्या दोन–तीन दिवसांपासून चालत असलेल्या या ऐतिहासिक अधिवेशनाचा समारोप करताना झुंजार नेते व कार्यक्रमाचे अध्यक्ष माधवराव मोरे म्हणाले की, 'हे अधिवेशन हिंदुस्थानच्या इतिहासातील मानव-मुक्तीचे पहिले अधिवेशन ठरणार आहे. तेव्हा इथून परत जाताना आपापल्या मनाच्या मशाली पेटवून गावोगाव जा ! ही आग लागली तर कुठलीच शक्ती या निखाऱ्याला हात लावू शकणार नाही !'

## खुले अधिवेशन

प्रतिनिधींचे अधिवेशन दि. ३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता संपणार होते. सकाळपासून लोकांची संख्या वाढत होती. क्रांतिमैदानावर खुल्या अधिवेशनाची सुरुवात दुपारी दोन वाजता होणार होती. त्या खुल्या अधिवेशनास दोन-सव्वादोन लाख शेतकरी उपस्थित होता. मिरवणुकीनंतर त्या ऐतिहासिक खुल्या अधिवेशनाला सुरुवात झाली.

सुरवातीला प्रल्हाद पाटील कऱ्हाड यांनी अधिवेशनात सात ठराव मांडून टाळ्यांच्या गजरात ते संमत करून घेतले.

या जाहीर सभेत मुनीमजी, (म. प्र.), हरिश्चंद्र रेड्डी (आंध्र) व रामचंद्र पाटील यांचीही भाषणे झाली.

आंदोलनांमध्ये हुतात्मे झालेल्यांच्या व जखमी कार्यकर्त्यांच्या नातेवाइकांना 'हुतात्मा निधी' देण्यात आला.

खुल्या अधिवेशनात बोलताना श्री. जोशी यांनी शेतकरी संघटनेचे कार्यक्रम व ठराव यावर विचार मांडले.

बुद्धिवादाचा दावा करणाऱ्या मंडळींचाही त्यांनी काही उदाहरणे


# दमामिंचा हंगामा !

द. मा. मिरासदार
कथा सांगायला लागले की,
चहूबाजूनी नुसते
हास्याचे लोट उठतात...
गमतशीर प्रसंग
तऱ्हेवाओक माणसं
अिरसाल गप्पा
हयांचा नुसता हंगामा सुरु होतो...
द. मा. मिरासदारांच्या,
" शाळेतील समारंभ,
धोक्याचे वळण
आणि माझी पहिली चोरी "
या कथा आता कॅसेटवर—
दमामिंचा हा हंगामा
अेकायलाच हवा !



PROGRAF

अलूरकर म्युझिक हाउस
४, स्वप्ननगरी, कर्वे रोड, पुणे-४११००४. फोन ३०६६२, ३२९१०,
सर्व प्रमुख पुस्तक व रेकॉर्डस् विक्रेत्यांकडे उपलब्ध

'सर्व प्रमुख रेकॉर्डस् व पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध'

देऊन धिक्कार केला. शिकलेलाच विद्वान असतो असे मानू नये. कारण अडाणी समजल्या जाणाऱ्या आदिवासी, शेतकरी यांना त्यांच्या क्षेत्रातले पूर्ण ज्ञान आहे, असे सांगून ते म्हणाले,

'हे खुले अधिवेशन क्रांतिकारी पाऊल आहे.

'आम्हाला कसलीच धर्मदाय भीक नको ! आम्हाला आमच्या घामाचा योग्य मोबदलाच द्या ! ही एक कलमी आमची मागणी आहे.

'आजपर्यंत चुकीच्या धोरणाने शेतकऱ्याचे नरडे दाबले गेले. आमच्या मालाला योग्य भाव देऊ नये म्हणून धान्य आयात करून किंमती पाडण्याचे धोरण सरकारचे आहे. जेव्हा आमच्याकडे धान्य नव्हते तेव्हा जबरदस्तीने लेव्ही वसूल करण्याचेही सरकारने उद्योग केले आहेतच. तेव्हा आता यापुढे सरकारने हिम्मत असेल तर लेव्ही पुन्हा वसूल करून दाखवावी !

'गरिबी हटाव' या घोषणा देणाऱ्यानी फक्त गरिबी हटू नये यासाठी केले जाणारे प्रयत्न थांबवावेत.

'शेतकऱ्यांवर गोळीबार करून सरकार भीती निर्माण करत आहे; पण जेव्हा गोळ्या चालतात तेव्हा साम्राज्य संपुष्टात आल्याची उदाहरणे आहेत.

'यापुढे शेतकरी संघटनेचे कार्यक्रम ४८ तास अगोदर जाहीर केले जातील. त्याची कार्यकर्त्यांनी दक्षता घ्यावी.

'या वर्षी मार्च-एप्रिलमध्ये दुधाचे-आंदोलन निश्चित होणार आहे. ते इतर मालांचे भाव घोषित होईपर्यंत सतत चालू राहील. मात्र यापुढे कुठल्याही सत्ताधाऱ्याच्या कार्यक्रमाला, शेतकऱ्यानी त्यांचे प्रश्न सुटेपर्यंत उपस्थित राहू नये. 'भक्ती, युक्ती, शक्ती' हा मंत्र कायम ध्यानात ठेवला तर तीन वर्षांत मुक्ती झाल्याशिवाय रहाणार नाही !'

निवडणुकांबाबतचा निर्णय मात्र तीन प्रमुख कार्यकर्त्यांनी विचार करून घ्यावा असे ठरले आहे.

या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. माधवराव मोरे, यांनी या प्रचंड जनसमुदायाला अॅटलांटिक महासागराची उपमा देऊन सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले व राजकीय पक्षाच्या वा पुढाऱ्यांच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले आणि या विराट अधिवेशनाचा समारोप झाला. अवघ्या दीड-दोन तासांत इथले सर्वच प्रतिनिधी परत जाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

एकंदरीत या शेतकरी संघटनेच्या पहिल्या अधिवेशनाने या देशातल्या क्रांतिकारी परिवर्तनाचा पाया तयार केला आहे.

या अधिवेशनात विचारांची मांडणी काय आहे हे ध्यानात आले.

पिढ्यानपिढ्या पिचत पडलेल्या या शेतकरी बाधवाला हालवून वेळीच जागे करण्याचे काम शरद जोशी यानी केले आहे. केवळ शेतीमालाचे भाव बांधूनच थांबावयाचे या विचाराला जोडूनच त्यांनी शेतकऱ्याची वेगळी संस्कृती, वेगळी मूल्ये या नव्या मूल्यांवर आधारित नवी समाजव्यवस्था, सामाजिक प्रश्नाबाबत स्त्रीविषयीची स्पष्ट कल्पना मांडून, तिच्या स्वातंत्र्याची लढाई याच लढाईत सुरू करण्याचे सामर्थ्य, शेतमजुराचे अमानवीय स्वरूपाचे जीवन नवा इतिहास बनवण्याचा आत्मविश्वास इथल्या अधिवेशनातून परत जाणाऱ्या शेतकऱ्यामध्ये दिसून येत होता. शेतकऱ्यांच्या पेटलेल्या या महासागरास शांत करणे कुठल्याही शक्तीला परवडण्यासारखे दिसत नाही !

शोषणविरहित अर्थव्यवस्थेचा एक नवा सदेश जगालाच या आगळ्या वेगळ्या अधिवेशनाने दिला आहे. पहाट झालीय. अरुणोदयाचे किरण थोड्याच वेळात आपणाला पाहावयास मिळणार आहेत.

सटाणा येथील अधिवेशनाबाबत मुंबई-पुण्याच्या वृत्तपत्रांनी बरीच उलटसुलट चर्चा सुरू केली आहे. हे अधिवेशन कशा पद्धतीने पार पडले, इथली व्यवस्था कशी झाली, जेवण्याची-राहाण्याची सोय कशी झाली याचे अंदाज अधिवेशन पाहिल्याशिवाय येऊच शकत नाहीत !

काही लोकांचा हे अधिवेशन बड्या बागायतदार मंडळींनी देणग्या देऊन केले असावे, असा अंदाज आहे; पण या अधिवेशनात एक वेगळेपण दिसून येते. इथे जमलेल्या २७ हजार प्रतिनिधी प्रत्येकी १५ रु. प्रवेशशुल्क भरून या अधिवेशनात सहभागी झाले होते. या प्रतिनिधींनीच प्रवेशशुल्क भरलेली रक्कम ४ लाखांच्यावर जाते. इथे जेवण्याची सोय प्रत्येकाने व्यक्तिगत करायची होती. इथल्या स्टॉलवर दोन रुपयाला जेवणपुडा मिळे..

इथल्या संयोजनसमितीच्या कार्यकर्त्यांच्या रात्रंदिवस केलेल्या कष्टामुळे या अधिवेशनाची व्यवस्था होऊ शकली. प्रत्येक जण हे अधिवेशन माझेच आहे या भावनेतून वावरत असल्यामुळे इथे कुणाला तक्रार करण्याची गरजच दिसत नव्हती.

असो. या अधिवेशनाबाबत बरेच विचारवंत वा वृत्तपत्रे चर्चाही करतील. त्यांनी खुशाल ती करत राहावी. लोकांच्या पुढे वस्तुस्थिती येऊ देऊ नये असे प्रयत्नही काही वृत्तपत्रे करीत असताना दिसली. त्यांनी काय लिहावे हे आम्ही सांगत नाही; पण सत्य नाकारू नये असे वाटते. सत्य टाळणाऱ्यांनी पुन्हा आम्ही सत्याचे पाठीराखे आहोत, असा दावा करू नये.

या अधिवेशनाची दखल वृत्तपत्रांनी किती घेतली, कशी घेतली हा विषय तसा विचार करण्याइतका गंभीर वाटत नाही. कारण इथल्या अधिवेशनाला येणारे वा उत्सुकता असणारे खेड्या-पाड्यातील शेतकरी होते. ते शिक्षित आहेतच असे नाही. त्यामुळे बुद्धिवादी मंडळींनी काहीही चर्चा करावी व लिहावे. या बाबत आमची काही हरकत नाही, अशी प्रतिक्रियाही या अधिवेशनात उमटत होती.

या अधिवेशनात एक गोष्ट मात्र आदरणीय वाटली. इथे वावरताना कोणी आपण पुढारी आहोत वा अन्य कोणी आहोत या थाटात दिसत नव्हता. प्रत्येक शेतकरी शरद जोशी असो वा अन्य कोणी सारख्याच आदराने, आपुलकीने बोलत होता. इथे उपस्थित असलेले संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते मिसळूनच वागत होते. यामुळे व्यक्तिगत पातळीवर प्रत्येकाला या अधिवेशनातून मित्र मिळत गेले.

या अधिवेशनाबाबत वा शेतकरी आंदोलनाबाबत इतर मंडळींनी काय अंदाज बांधलेले असतील कुणास ठाऊक; पण इथून निघणारा प्रत्येक शेतकरी स्वतःच्या मनातील शोषणविरोधी आगपेट वून गावाकडे परतलाय. या एका मशालीने आणखी गावच्या-गावे पेटतील यात शंका वाटत नाही. या अधिवेशनाने जे विचार रुजवले ते व शेतकरी आंदोलनामागची प्रेरणा आता कायम असेल. वैचारिक आधारवर देखील आता लोक निश्चितपणे चर्चापटू मंडळींबरोबर बोलू लागतील.

या अधिवेशनाचे फलित काय आहे हे आज सांगण्यात अर्थ नाही; पण येणारा काळ ते निश्चित दाखवेल. त्या वेळेस मात्र आजची आठवण असू द्यावी.

□

# रोगट प्रेम—लक्षणे व उपाय

कि. मो. फडके, एम. ए.
डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई.

शेक्सपियरच्या 'रोमिओ अँण्ड ज्युलिएट' आणि 'अँण्टनी अँण्ड क्लिओपॅट्रा' या अजरामर कलाकृती प्रणयपंढरीचे वारकरी डोक्यावर घेऊन हर्षोन्मादाने नाचतील तर त्यात काय नवल ? कारण प्रणयपंढरीचे वारकरी नसलेले परंतु साहित्याचा समतोल दृष्टि-कोणातून तटस्थपणे अभ्यास करणारे मर्मज्ञ समीक्षकही या दोन्ही नाटकाचे वाङ्मयीन श्रेष्ठत्व पुन्हा पुन्हा आवर्जून विषद करून सांगताना दिसतात. त्यामुळे या दोन्ही नाटकांतून प्रत्ययाला येणाऱ्या शेक्सपियरच्या प्रतिभासंपन्न कल्पकतेचे यथोचित कौतुक करून जर कोणी असे म्हणेल की, ही दोन्ही नाटके जरी निर्विवादपणे अत्युत्कृष्ट साहित्याचा नमुना असली तरी त्यातून दृष्टोत्पत्तीस येणारे रोमिओचे ज्युलिएटवरील व अँन्टनीचे क्लिओपॅट्रावरील प्रेम मात्र रोगट प्रेमाचे प्रतीक आहे, तर त्याच्या या मताला बहुसंख्य लोक चटकन दुजोरा देतीलच असे नाही.

परंतु अगदी नेमके हेच मत डॉ. अल्बर्ट एलिस नावाच्या प्रख्यात अमेरिकी मानसोपचारतज्ज्ञाने मोठ्या नेटाने वारवार व्यक्त केले आहे. कामवासना, लैंगिक समस्या, प्रेम इत्यादी विषयांवरील डॉ. एलिस यांची अनेक पुस्तके व व्याख्याने खूपच गाजली आहेत. अँन्टनीचे क्लिओपॅट्रावरील प्रेम रोगट आहे, हे आपले मत त्यानी प्रथम १९६१ सालच्या मे महिन्यात काही विद्यार्थ्यांपुढे दिलेल्या व्याख्यानात व्यक्त केले. तसेच, रोमिओच्या ज्युलिएटवरील प्रेमाबद्दलचे आपले हे लाडके मत त्यांनी दूरदर्शनवरून दिलेल्या एका व्याख्यानातही ठासून सांगितले होते आणि अखेर, रोगट प्रेमाची लक्षणे व त्यावर उपाय सागणारा एक निबंध त्यानी आपल्या IF This Be Sexual Heresy नावाच्या पुस्तकात प्रसिद्ध केला. सध्या आपल्याकडे चालू असलेला 'एक दुजे के लिये' या नावाचा चित्रपट पाहून एका प्रणयी युगुलाने आत्महत्या केली, ही घटना चर्चेचा विषय बनली हे सर्वश्रुतच आहे. या पार्श्वभूमीवर एक मानसोपचारतज्ज्ञ प्रेम करण्याच्या रोगट पद्धतीकडे कोणत्या दृष्टीने पाहातात, हे समजावून घेणे उद्‌बोधक ठरेल असे वाटल्यामुळे मी डॉ. एलिस याच्या वरील निबंधाचा गोषवारा प्रस्तुत लेखात देण्याचा प्रयत्न केला आहे.

रोमिओची कथा पाहा. त्याच्या बोलण्यातून व वागण्यातून ज्याप्रमाणे त्याचे ज्युलिएटवरील उत्कट प्रेम व्यक्त होते त्याचप्रमाणे त्याचे स्वत.वर किती कमी प्रेम होते, हेही प्रत्ययास येते. आपली प्रेयसी जग सोडून गेली असे वाटल्यावर तो काय म्हणतो ? 'अरेरे! ज्युलिएट गेली ... किती दुर्दैवाची गोष्ट आहे ही ! परंतु मी अजून जिवंत आहे ! या विशाल जगात आणखी दुसरी कोणी मुलगी गाठून तिच्यावर प्रेम करणे का म्हणून अशक्य आहे ?' अशा तऱ्हेचे विचार करण्याऐवजी तो स्वत.ला जणू काही सांगू लागतो, 'बिचारी ज्युलिएट परलोकवासी झाली...म्हणजे आता माझ्यावर प्रेम करावयास ती येथे नाही..माझ्या जीवनात तिने प्रवेश करण्यापूर्वी मी एक नालायक, कवडीमोल माणूस होतो. ती माझ्या जीवनात आली व तिने माझ्यावर मनापासून प्रेम केले, त्यामुळे मी जीवन जगण्यास लायक झालो होतो...परंतु आता ती नाही...तेव्हा मी परत माझ्या पूर्वपदावर म्हणजे नालायक, क्षुद्र व कवडीमोल माणसाच्या पातळीवर फेकला गेलो आहे...तेव्हा माझ्या या लाजिरवाण्या व केविलवाण्या जीवनाचा आता अंत करावा हेच उत्तम...!' परिणाम असा होतो की, खरोखरच हा प्रेमवीर आपली जीवनयात्रा स्वतःच संपवतो ! आणि त्याच्या या कृत्यावरून असे सिद्ध होते की, मुळात रोमिओचे स्वतःवर प्रेम नव्हतेच; तो ज्युलिएटच्या प्रेमात पडला. कारण तिच्याकडून कौतुक व प्रेम मिळविण्याचा त्याचा खटाटोप म्हणजे आपल्यावर कोणी प्रेम करावे अशी लायकी आपल्यात आहे हे सिद्ध करण्याचा शर्थीचा प्रयत्न होता, त्यामुळे रोमिओच्या दृष्टीने ज्युलिएटच्या मृत्यूचा अर्थ काय झाला ? प्रेयसीचा कायमचा वियोग म्हणजे एक अतिशय खेदजनक व दुर्दैवी घटना येवढाच अर्थ रोमिओला अभिप्रेत नव्हता. रोमिओच्या दृष्टीने ज्युलिएटचा मृत्यू म्हणजे एका नालायक व कवडीमोल माणसाची काळजी वाहणारी, त्याच्यावर निरतिशय प्रेम करून त्याला काही लायकी प्राप्त करून देणारी मुलगी नाहीशी झाल्यामुळे मुळातच कुचकामी असलेल्या या प्रियकराला आता आपल्या स्वत.च्या पायावर उभे राहणे अशक्य करणारी महाभयंकर घटना !

अँन्टनीचे त्याच्या प्रेयसीवरील प्रेमही याच प्रकारचे होते असे म्हणता येईल. म्हणजे, मुळात त्याला स्वत.बद्दल इतके कमी प्रेम वाटत होते की, क्लिओपॅट्राच्या प्रेमाशिवाय या जगात राहणे ही कल्पनाच त्याला असह्य वाटली. क्लिओपॅट्राने स्वतःचा अंत केल्यानंतर अँन्टनीही तिच्यावरील गाढ प्रीतीखातर आत्मबलिदान करतो ही गोष्ट वरकरणी पाहता त्याच्या मनातील आपल्या प्रेयसीवरील अलौकिक व अमर प्रेमाची साक्ष आहे, असे वाटले तरी वस्तुतः त्याच्या आत्मबलिदानातून येवढेच दिसून येते की, त्याचे स्वतःवर किती नगण्य प्रेम होते ! कारण खरोखरच कोणी एखादा माणूस झपाटल्याप्रमाणे जर फक्त दुसऱ्या कोणा एकाच व्यक्तीवर प्रेम करीत असेल तर त्यावरून असा तर्क करता येईल की, तो माणूस बहुधा कोणावरही प्रेम करीत नसतो—आणि मुख्य म्हणजे अगदी स्वत.वरही !

सारांश, रोमिओ काय किंवा अँन्टनी काय, दोघेही थोडे भ्रमिष्टच होते. कारण त्याच्या वर्तनावरून असे कळून चुकते की, अगदी प्रथम स्वतःवर प्रेम करून नंतर आपल्या प्रियतमेवर प्रेम करण्याऐवजी ते आपल्या प्रेयसीच्या मदतीशिवाय किंवा आधाराशिवाय स्वत.च्या पायावर या जगात खंबीरपणे उभे राहण्यास असमर्थ असल्यामुळे मरण पत्करण्यास तयार झाले ! अर्थात त्या दोघानी खरोखरच आत्महत्या केली ही गोष्ट फार दुर्दैवाची असली तरी अशा खुळचटाशिवाय जगाचे काही विशेष नुकसान होईल असे वाटत नाही !

या सर्व विवेचनाचा अर्थ असा नाही की अद्भुत व काव्यमय प्रेम हे नेहमी रोगट व आत्मघातकीच असते. उलट असे म्हणता येईल की, व्यक्ती-व्यक्तीमधील कोणतेही संबंध–अगदी मनाला क्षणिक चटका लावणाऱ्या सहवासापासून ते आमरण टिकणाऱ्या वैवाहिक संबंधांपर्यंत–रोगट असू शकतात; आणि निखळ काव्यमय, अद्भुत किंवा रोमांचकारी प्रणयापासून ते अगदी व्यवहारी आकर्षणापर्यंतचे सर्व संबंध जीवनातील इतर किती तरी गोष्टीप्रमाणेच अतिशय सुजाण व आनंददायक असू शकतात. म्हणजे कोणत्या एखाद्या प्रेमाचा प्रकार रोगट नसतो; प्रेम अनुभवण्याची माणसाची रीत रोगट असू शकते.

शेक्सपियरने शब्दांकित केल्याप्रमाणे अँन्टनीचे क्लिओपॅट्रावरील प्रेम उत्कट होते तसेच अतिरंजितही होते. असा भावनाविवश प्रेमिक आपल्या प्रेयसीपायी वेडापिसा होतो; तिच्या वियोगाची कल्पनाच सहन करू शकत नाही. किंवा कधीकधी तर तिच्या सहवासात असतानाही दु.खी-कष्टी होतो. बहुतेक वेळा तो तिच्याविषयी सतत चिंतन करण्यात मश्गूल झालेला दिसतो. आणि प्रेमिकाची ही अवस्था पाहून काही तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ व लेखक असे म्हणतात की, प्रेमात पडणे, म्हणजे निदान काही काळ का होईना, वेड लागण्यासारखेच आहे. अशा तत्त्वज्ञांनी, लेखकांनी व मानसशास्त्रज्ञांनी कित्येक प्रेमवीरांच्या व्यक्तित्त्वाचे काही गुणविशेष बरोबर जाणले आहेत हे जरी खरे असले तरी, स्वप्नील प्रेमात निमग्न राहून जीवन जगणारे सर्वच प्रेमिक वेडसर असतात व त्यांचे प्रेम रोगट असते असे म्हणणे अतिशयोक्तीचे होईल. कारण अशा प्रकारे आपल्या प्रेयसीवर नि.सीम प्रेम करणाऱ्या प्रणयपंढरीच्या निष्ठावंत वारकऱ्यांच्या प्रेमाची तऱ्हा निरोगी असू शकते. परंतु निरोगी प्रेम व रोगट प्रेम यांच्यामधील भेदाकडे सामान्यतः क्वचितच काळजीपूर्वक लक्ष दिले जाते ,ही वस्तुस्थिती खेदजनक आहे.

आपल्या प्रेयसीवर अगदी भावनाशीलपणे प्रेम करणारा निरोगी प्रियकर कशा प्रकारे वागताना दिसतो ? असंख्य सुदृढ प्रेमिकाचे निरीक्षण केल्यास असे दिसून येते की आपल्या प्रियतमेवर निरोगी प्रेमाचा वर्षाव करणारा वल्लभ तिच्याशी अतीव भावनाविवशतेने वागतो तरी त्याला तिच्याबद्दल अनिश्चित काळपर्यंत टिकून राहील अशी दीर्घकालीन सर्वव्यापी लालसा वाटतेच असे नाही. त्याला आपल्या प्रियेच्या संगतीत वारंवार राहावे असे जरूर वाटते, परंतु तिचा वियोग आपण सहनच करू शकणार नाही, असे त्याला वाटत नाही. आणि वियोगाचा प्रसग आलाच तर तो अगदी दीनवाणा होत नाही.आपल्या प्रेयसीबद्दल विचार करण्यात तो किती तरी वेळ आनंदाने गुग होतो; परंतु जीवनातील इतर सर्वच गोष्टी विसरून जाऊन तो फक्त आपल्या प्रेयसीबद्दलच्याच विचारानी झपाटला जात नाही. त्याला आपल्या प्रेयसीमधील अवगुण अवश्य दिसतात; परंतु तिच्या अवगुणांकडे तो क्षमाशील उदारतेने पाहतो. मात्र कल्पनाविलासात दंग राहून आंधळेपणाने तो आपल्या प्रेयसीमधील दुर्गुणांबद्दल अज्ञानात राहत नसतो. तो आपल्या सखीकडे आकृष्ट झालेला असतो; परंतु प्रेम करण्यासाठी तिच्यामागे फरफटत धावत सुटलेला नसतो.

शिवाय असेही म्हणता येईल की, आपल्या प्रेयसीची निवड करण्याच्या बाबतीत तो बराच चोखंदळपणा दाखवतो तरी तो असे मात्र समजत नाही की, या अफाट विश्वात त्याला अनुरुप ठरेल अशी कोणी एकमेव मुलगी आहे. तसेच, एकदा त्याने निवडलेल्या प्रेयसीने फक्त त्याच्यावरच प्रेम करावे असे त्याला वाटत असले तरी तिने केवळ दुसऱ्या पुरुषाकडे पाहिले म्हणून तो वेडपटपणे मत्सराच्या आधीन जात नाही. तो जेव्हा प्रेमात पडलेला नसतो तेव्हा प्रेमात पडण्यासाठी सक्रियपणे व थोडे अधिक धाडस करून एखाद्या मुलीवर प्रेम करण्याचा तो प्रयत्न करतो; परंतु म्हणून काही, दिसेल त्या पहिल्या मुलीवर तो जान कुर्बान करून टाकीत नाही. थोडक्यात म्हणजे, तो प्रेम या कल्पनेवरील प्रेमामुळे झपाटला जात नाही. त्याने निवडलेली प्रेयसी त्याला अर्थातच इतकी विलोभनीय वाटते की तिच्यासाठी तो स्वखुशीने काही विशिष्ट मर्यादेपर्यन्त स्वार्थत्याग करण्यास सदैव तयार असतो. परंतु आपल्या प्रेयसीबद्दल वाटणाऱ्या तीव्र आकर्षणापायी जगातील सर्वच गोष्टीचा त्याग करून स्वतःला तिचा गुलाम करून घेण्यात त्याला काही हशील वाटत नाही. आपण निवडलेल्या प्रेयसीच्या मनाचा कौल निश्चितपणे कळण्यापूर्वीच धीर करून आपले तिच्यावरील प्रेम सूचित करण्यास तो एका पायावर तयार असतो; परतु कोणत्याच प्रकारे प्रतिसाद न देणाऱ्या मुलीवर निष्कामपणे फळाची अपेक्षा न धरता एकतर्फी प्रेम करीत राहण्याइतका त्याचा स्वतःवरचा ताबा सुटलेला नसतो !

थोडक्यात असे म्हणता येईल की, निरोगी प्रेमिकाला नक्कीच प्रेम करावयास हवे असते आणि इतर सर्वांच्या तुलनेने त्याला आपली सखीच अधिक प्रिय असते. परंतु प्रेम करणे किंवा प्रेम मिळविणे ही काही त्याची अत्यावश्यक गरज नसते. आपल्या प्रेयसीबद्दल त्याला विलक्षण प्रेम वाटत असले तरी तो वेडापिसा होऊन तिच्या प्रेमात गुरफटलेला नसतो. तो आपल्या प्रेयसीच्या प्रेमात पडलेला असतो, तरी स्वहितदक्षही असतो. त्याचे प्रेयसीवरील प्रेम स्वत.ला विनाशकारक ठरेल असे नसते किंवा स्वतःला तुच्छ लेखणारेही नसते. परिणामी, त्याचे प्रणयाराधन मुख्यतः आनंददायक असते; रडवे किंवा दीन-दुबळे नसते.

## माणसासारखे प्रेम हवे !

आश्चर्याची गोष्ट अशी की, आपल्या प्रेयसीवर निरोगीपणे प्रेम करणाऱ्या प्रेमिकाचे वरील तऱ्हेचे वागणे व जो कोणी माणूस आपल्या मित्रावर म्हणा, मुलावर म्हणा किंवा कुत्र्यावर म्हणा, सहृदयतेने प्रेम करतो त्याचे वागणे, यांत बरेच साधर्म्य दिसून येते. कारण जो कोणी समंजस माणूस भावनाविवश होऊन प्रेमात ' पडण्या ऐवजी दुसऱ्यावर अढळपणे प्रेम करतो त्याच्यामध्ये पुढील गुणविशेष आढळून येतात. असा माणूस दुसऱ्याच्या प्रमादांकडे अतिशय समजूतदारपणे पाहून दुसऱ्याचा पूर्णतः स्वीकार करतो. परंतु तो दुसऱ्याला आपल्या सर्व हक्कांची पायमल्ली करण्यास परवानगी देत नाही. त्याला दुसऱ्याचा सहवास हवा असतो, परंतु दुसऱ्याच्या वियोगाने तो अगदी मर्मभेदकपणे दीनवाणा व एकलकोंडा होत नाही. दुसऱ्यासाठी काही तडजोडी व त्याग करावयाची त्याची तयारी असते. परंतु प्रेमापायी तो दुसऱ्याचा गुलाम होत नाही किंवा आपले स्वतंत्र व्यक्तित्वही गमावून बसत नाही. दुसऱ्याने प्रतिसाद दिला नाही किंवा उलट अयोग्य वर्तन केले तर त्याला खचितच वाईट वाटते; परंतु दुस-

त्याच्या अशा न रुचणाऱ्या वर्तनाचा आपल्या स्वत:च्या लायकीशी अकारण संबंध जोडून तो स्वत:ला नामोहरम करून घेत नाही. तो दुसऱ्याशी गंभीरपणे बांधलेला असतो, तरी त्याला दुसऱ्याबरोबर हास्य-विनोद, चेष्टामस्करी व मौजमजा करण्यातही आनंद वाटतो. दुसऱ्याच्या वियोगाने किंवा निधनाने त्याला दु:ख वाटले तरी त्यामुळे तो दारुण विमनस्कतेत दीर्घकाल स्वत:ला बुडवून घेत नाही. त्याचे दुसऱ्याबरोबरचे नाते परस्परावलंबी असते; म्हणजे तो पूर्णत: स्वतंत्र नसतो किंवा संपूर्णत: दुसऱ्यावरच अवलंबूनही नसतो. त्यामुळे त्याला हवे असते तसे प्रेम दुसऱ्याकडून मिळाले नाही किंवा मिळाले व कालांतराने लुप्त झाले तरी तो कण्हत, कुंथत बसत नाही किंवा अतिशय दु:खी व क्रोधग्रस्त होत नाही. एकूण, तो माणसाप्रमाणे प्रेम करतो–उंदराप्रमाणे किंवा पोराप्रमाणे प्रेम करीत नाही !

तात्पर्य असे की, प्रेमात पडण्याचा किंवा प्रेम करण्याचा कोणता एखादा प्रकार रोगट असतो असे नाही, तर प्रेमात पडणाऱ्या किंवा प्रेम करणाऱ्या एखाद्या माणसाची मन:स्थिती रोगट असते असे म्हणावे लागेल. गटे, शेले किंवा बायरन यांच्याप्रमाणे स्वप्नील किंवा काव्यमय रीतीने आपल्या प्रियेची आराधना करताना स्वत:चे व्यक्ती म्हणून अवमूल्यन करून स्वत:ला पागल बनवून घेणारे प्रेमिक इतिहासात काही कमी नाहीत ! तसेच सॅम्युअल जॉन्सन किंवा हेन्रिच् हाइन यांच्यासारखे स्वत:च्या अर्धांगीवर अगदी रोमांचकारी किंवा स्वप्नदर्शीपणे नाही तरी भक्तिभावाने प्रेम करणारे, परंतु त्या प्रेमापायी स्वत:ची अवहेलना करून स्वत:चा छळ करणारे रोगट प्रेमिकही जगाच्या इतिहासात दुर्मिळ नाहीत !

प्रेम करण्याच्या एखाद्या प्रकारात नाही, तर एखाद्या विशिष्ट प्रेमिकाच्या मन:स्थितीत रोगटपणा असतो, हे ध्यानात घेऊन माणसाच्या वर्तणुकीचे अवलोकन केले तर असे आढळून येते की, रोगटपणा किंवा भावनिक प्रक्षुब्धता काही फक्त प्रेमात पडणाऱ्या विशिष्ट व्यक्तींच्यातच दिसून येते असे नाही, तर तशा प्रकारचा रोगटपणा प्रेमात न पडणाऱ्या व्यक्तींच्यातही असू शकतो. फक्त इतकेच की, प्रेमात पडून मूर्खपणे वागणाऱ्या माणसाची भावनिक प्रक्षुब्धता चटकन लक्षात येऊ शकते; परंतु कोणताच धोका पत्करावयास तयार नसल्यामुळे कधीच कोणाच्या प्रेमात पडू न शकणाऱ्या माणसाचे काय ? कधी कधी असा माणूस चिंतेने किंवा इतरांबद्दल वाटणाऱ्या तिरस्काराने इतका झपाटलेला असतो की, प्रेमात पडण्याची किंवा संसार करण्याची त्याची हिंमतच होत नाही !

अर्थात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती ही की, जी माणसे काव्यमय किंवा स्वप्नील प्रेम करीत नाहीत किंवा वैवाहिक जीवनही जगू इच्छित नाहीत ती, सर्वच माणसे भावनिकदृष्ट्या रोगट असतात, असा निष्कर्ष वरील विवेचनावरून काढणे योग्य ठरणार नाही. कारण सखोल विचार केला तर असे दिसून येईल की, प्रेम करण्याच्या प्रक्रियेतील मुख्य गाभा म्हणजे सर्जनशील कृती आणि आग्रही स्वरूपाची अभिव्यक्ती व आत्माविष्कार. प्रेम करणे म्हणजे स्वत:बाहेरील कोणत्या तरी गोष्टीत महत्त्वपूर्णपणे तल्लीन होणे व त्या गोष्टीसंबंधी निश्चितपणे व आग्रहीपणे क्रियाशील राहणे; परंतु स्वत:बाहेरील अशी गोष्ट म्हणजे कोणी व्यक्ती किंवा माणसेच असली पाहिजेत असे समजण्याचे काहीच कारण नाही. माणूस जसा इतर माणसांवर प्रेम करू शकतो तसाच तो एखाद्या संकल्पनेवर किंवा वस्तूवरही प्रेम करू शकतो. किंबहुना, जगाच्या इतिहासातील किती तरी थोर शास्त्रज्ञ, संशोधक, मुत्सद्दी व कलावंत त्यांच्या सभोवतालच्या इतर माणसांशी तल्लीन होण्याऐवजी इतर काही संकल्पनांत किंवा प्रकल्पांत अधिक रममाण झालेले होते आणि त्यांची ही विशिष्ट निवड रोगट होती, असे म्हणावयाचे काहीच कारण नाही. कदाचित फार तर असे म्हणता येईल की, जो माणूस काही संकल्पनावर, वस्तूंवर, प्रकल्पावर व शिवाय माणसांवरही प्रेम करू शकतो त्याचे व्यक्तित्व अधिकांशाने परिपूर्ण असते; परंतु तरीही त्यावरून ज्या माणसाला इतर माणसांवर प्रेम करण्यात विशेष रस वाटत नाही तरी जो माणूस एखाद्या विषयात किंवा एखाद्या प्रकल्पाच्या सिद्धीसाठी सर्जनशीलपणे तल्लीन झालेला असतो तो भावनिकदृष्ट्या काही उणा असतो, असे मात्र सिद्ध होत नाही.

परंतु आपण पाहिलेच आहे की, भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध असलेला माणूस रोमांचकारी, स्वप्नील प्रेमही रोगटपणे करू शकतो किंवा वैवाहिक जीवनातही आपल्या सहचारिणीवर रोगट प्रेम करू शकतो. इतकेच काय, पण त्याच्या भावनिक अपरिपक्वतेमुळे भयभीत होऊन तो प्रेमापासून सदैव चार हात दूरही राहू शकतो. असे असेल तर मग साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, त्याच्या या भावनिक अस्वस्थतेचे स्वरूप नेमके काय असते ? किंवा त्याच्या या भावनिक अपरिपक्वतेच्या मुळाशी नेमका कोणता प्रमुख गुणविशेष असतो की, ज्यामुळे त्याने प्रेम केले तरी किंवा तो प्रेमापासून पळून गेला तरी त्याचे आपले नुकसानच होते ?

भावनिक अस्वस्थतेच्या मुळाशी मुख्यत: काटेकोर नैतिक दृष्टिकोनातून माणसाच्या वर्तनाकडे पाहून सतत त्याच्यावर दोषारोप करीत बसण्याची सवय असते. समजा, एखाद्या माणसाला अशी सवय असली व जे वर्तन अनैतिक आहे असे तो समजतो तसेच वर्तन त्याच्याचकडून झाले तर तो स्वत:ला पुढील दोन प्रकारची वाक्ये सांगतो. १) मी हे अनिष्ट वर्तन केले आहे आणि ते वर्तन न करणे मला शक्य होते. म्हणून ते अनैतिक वर्तन करण्यास मी जबाबदार आहे. २) याचा अर्थ मी म्हणजे एक नीच, पाजी, हलकट, नतद्रष्ट माणूस आहे !

म्हणजे स्वत:च्या किंवा इतरांच्या वर्तनाकडे सतत नैतिक उच्चासनावरून दोषारोप करीत बसणारा माणूस स्वत:ला किंवा इतरांना उद्देशून स्वत:शी स्पष्टपणे किंवा अस्पष्टपणे पुढील दोन प्रकारची वाक्ये आळवीत बसतो. १) अमुक एक वर्तन केल्यामुळे किंवा न केल्यामुळे तू अनिष्ट गोष्ट केली आहेस. २) आणि तू अशी अनिष्ट गोष्ट केली आहेस, म्हणून तू म्हणजे एक शुद्ध नादान, नालायक व हलकट सैतान आहेस.

एखाद्या व्यक्तीचे केवळ वर्तनच नव्हे, तर ती संपूर्ण व्यक्तीच अनैतिक किंवा दुष्ट आहे असे ठरविणारी वरीलपैकी दुसऱ्या प्रकारची वाक्ये खरे म्हणजे तर्कदुष्ट व अविवेकी आहेत. पहिली गोष्ट अशी की, अनिष्ट वर्तन करणारा माणूस हा दुष्टात्मा असतो असे म्हणणे म्हणजे निव्वळ एक अजब व्याख्या तयार करणे आहे. कारण एखाद्या माणसाने अनिष्ट वर्तन केले तर तो संपूर्ण माणूसच दुष्टात्मा किंवा नतद्रष्ट ठरतो, असे प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा पुरावा देऊन काही सिद्ध

करता येणार नाही. दुसरी गोष्ट अशी की एखाद्या माणसाच्या अनिष्ट वर्तनावरून त्याला पूर्णतः नालायक ठरविणे या विचारसरणीत एक कल्पना अशी की, माणसे जणू काही परिपूर्ण असतात, देवदूतासमान असतात किंवा निदान त्यांनी तसे असावयासच पाहिजे. ही अध्याहृत कल्पना माणूस प्रमादशील आहे व त्याच्या हातून चुका होणे अटळ आहे या वस्तुस्थितीला मुळी थारा देण्यासच तयार नसते. तिसरी गोष्ट अशी की, दोषारोप करण्यामुळे नैतिक वर्तन करण्याच्या कामात अडथळाच निर्माण होतो. कारण जोपर्यंत एखादा माणूस अनिष्ट वर्तन केल्याबद्दल स्वतःची किंवा इतरांची भावविवश होऊन कठोरपण निर्भर्त्सना करतो तोपर्यंत त्याला स्वतःशी अधिक सयुक्तिक वाक्ये बोलणे कठीण होऊन बसते. ती अधिक सयुक्तिक व विवेकी वाक्ये म्हणजे : १) मी किंवा दुसऱ्या माणसाने निश्चितपणे हे अनिष्ट वर्तन केले आहे. २) आता मला स्वतःला किंवा दुसऱ्या माणसाला परत तसे वर्तन करण्यापासून परावृत्त कसे करावे? चौथी गोष्ट अशी की, दोषारोप करीत असल्यामुळे किंवा निर्भर्त्सना केल्याने माणसाच्या हातून कमी चुका होण्याऐवजी तो अधिकच चिंताग्रस्त होतो आणि स्वतःचा किंवा दुसऱ्याचा द्वेष करू लागतो. या अहितकारक भावनांमुळे त्याच्या मनात आपण अपराधी असल्याची किंवा नालायक व कुचकामी असल्याची भावना हळूहळू दृढमूल होऊ लागते. त्यामुळे तो कधीकधी न कळत, तर कधीकधी अगदी जाणूनबुजून अधिकच अनिष्ट वर्तन करण्यास प्रवृत्त होतो.

जवळ जवळ सर्व तऱ्हेची भावनिक प्रक्षुब्धता दोषारोप करीत बसण्याच्या मुख्यतः तीन प्रकारच्या सवयींतून जन्माला येते. यापैकी पहिली म्हणजे, स्वतःला दोष देण्याची सवय. या सवयीमुळे माणसाच्या मनात चिंता, अपराधी भावना, विषण्णता, आत्मविश्वासाचा अभाव व स्वतःला कस्पटासमान लेखण्याची प्रवृत्ती इत्यादी अनिष्ट गोष्टी वाढीस लागतात आणि जो माणूस स्वतःला दोष देऊन स्वतःचा तिरस्कार करीत असेल तो दुसऱ्याने आपल्यावर प्रेम करावे अशी आपली लायकीच नाही असे वाटून शक्यतो दुसऱ्या कोणाशी फार सलगी करण्याच्या भानगडीतच पडणार नाही. जर यदाकदाचित असा माणूस बेभान होऊन कोणाच्या प्रेमात पडलाच तर स्वत.ला कस्पटासमान लेखण्याच्या प्रवृत्तीमुळे त्याची स्थिती रोमिओ किंवा अॅन्टनीसारखी होईल. म्हणजे त्याला मनापासून असे वाटेल की, जर कोणी आपल्यावर निःसीम, आमरण व कल्पनारम्य प्रेम केले तरच आपण कोणी लायक माणूस आहोत असे सिद्ध होईल. त्यामुळे आपल्या प्रेयसीचे आपल्यावरील प्रेम ओसरले किंवा संपले आहे, ही कल्पना किंवा तिचे सांनिध्य शक्य नसणे ही कल्पना त्याला असह्य वाटेल. शिवाय स्वत.ला सतत दोष देणाऱ्या माणसाने काव्यमय रीतीने नाही तरी सहृदयतेने आपल्या प्रेयसीवर जर प्रेम केलेच तरी स्वतःचा द्वेष करण्याच्या त्याच्या प्रवृत्तीमुळे प्रेयसीचे प्रेम गमावून तर बसणार नाही ना अशा भीतीपोटी तो आपल्या प्रेयसीचा अनुनय अतिशय भेकडपणे व निःसत्त्वपणे करू लागेल.

दोष देण्याच्या सवयीचा दुसरा प्रकार म्हणजे, सदोदित इतरांना दोष देत बसणे. या घातक सवयीमुळे क्रोध, तिरस्कार, बालिश बंडखोरी, शेखसल्ली विचारसरणी व सामाजिक संघर्ष वाढीला लागतात. सतत इतरांना दोष देत बसणाऱ्या माणसाला दुसरी कोणी व्यक्ती प्रेम करण्याच्या योग्यतेची वाटणार तरी कशी? आणि असा माणूस कधी कोणा व्यक्तीवर प्रेम करू लागेल तर थोड्याच काळात त्याला दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तनामुळे भ्रमनिरास झाल्यासारखे वाटेल. शिवाय तो इतरांकडून परिपूर्णतेची अपेक्षा करीत असल्यामुळे व त्यांच्या अपूर्णत्वाचा त्याला कमालीचा तिरस्कार वाटत असल्यामुळे तो आपल्या प्रेयसीच्या जितका अधिक जवळ जाईल तितका तिच्यावर अधिकच निर्दयपणे टीका करू लागेल व अखेर त्याने स्वतःच तिला ज्या उच्चासनावर बसविले होते त्यावरून तो तिला खाली खेचेल! म्हणजे प्रेयसीवरील आपल्या काव्यमय प्रेमाला हळूहळू ओसरण्याची संधी देऊन त्या प्रेमाला अधिक वास्तववादी भूमिकेवर येऊन स्थिरावण्यास मदत करण्याऐवजी तो आपल्या मनातील प्रेयसीवरील प्रेमाचा चक्काचूर करील आणि अखेर तो पूर्वी तिच्यावर जेवढ्या बेभानपणे प्रेम करीत होता तेवढ्याच बेभानपणे तिचा द्वेष करू लागेल. जर असा माणूस आपल्या प्रेयसीवर किंवा पत्नीवर व मुलांवर प्रेम करीत राहिलाच तर घडोघडी तो आपल्या त्यांच्या चुकांचा पाढा वाचून त्यांना बेजार करून सोडील आणि त्यांनी त्याच्या किटकिटीकडे लक्ष दिले नाही तर तो आणखीनच दुखावला जाईल.

दोष देण्याच्या सवयीचा तिसरा प्रकार म्हणजे जगाला, आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांना व आपल्या दैवगतीला शिव्याशाप देत बसणे. असा माणूस आत्मकरुणेच्या आधीन जातो व काय वाटेल ते करून आपल्या सभोवतालच्या माणसांवर व घटनांवर नियंत्रण करण्याचा कोणताही जुलमी किंवा लहरी प्रयत्न करण्याकडे त्याचा कल असतो. या जगातील अशाश्वततेला दोष देऊन जगाचा तिरस्कार करणारा हा माणूस आपला बराचसा वेळ व प्रयत्न जगातील घटनांवर नियंत्रण घालण्यात खर्च करीत असतो व म्हणून त्याला प्रेम करण्यात स्वारस्यही वाटत नाही किंवा प्रेम करण्यासाठी त्याला वेळही मिळत नाही. शिवाय जगातील अनिश्चिततेचा त्याला स्वीकार करता येत नसल्यामुळे तो जगातील घटनांवर नियंत्रण घालून आपल्या स्वतःभोवती काही सुसंगती निर्माण करण्याच्या खटाटोपात गुंतला असल्यामुळे जरी त्याने कोणावर प्रेम केलेच तरी तो प्रियकर पती किंवा पिता म्हणून कितपत सुखी व यशस्वी होणार?

सारांश असा की, सतत दोषारोप करण्याची सवय माणसाचा भावनिक समतोल बिघडून टाकते व परिणामी त्याच्या प्रीतिसंबंधांना सुरुंग लावते. साहजिकच आता प्रश्न असा उरतो की, सतत दोषारोप करीत बसण्याच्या या आत्मघातकी प्रवृत्तीपासून माणसाचा बचाव कसा करावा? अर्थात या प्रश्नाचे ढोबळमानाने उत्तर असे की, दोष देत बसण्याच्या सवयीमुळे भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध झालेल्या माणसावर मानसोपचारपद्धतीने उपाय करून त्याला भावनिकदृष्ट्या अधिक निरोगी व परिपक्व होण्यास मदत करावी. परंतु हे काम करीत असताना पुढील गोष्टींचे भान राखणे उपयुक्त ठरेल.

स्वत.ला व इतरांना दोष देऊन स्वत.चा व इतरांचा द्वेष करण्यास माणसाला त्याच्या सभोवतालची सामाजिक परिस्थिती प्रवृत्त करीत असते, हे जरी खरे असले तरी निदान काही अंशी तरी स्वतःला व इतरांना दोष देण्याची माणसाची सवय त्याला लाभलेल्या जैविक प्रवृत्तीवर आधारलेली असते, ही शक्यता नाकारताही येणार नाही. हा

दोष कमी-अधिक प्रमाणात त्याच्या प्रकृतिजन्य स्वभावाचाच एक भाग असावा. अनेक आधुनिक अस्तित्ववादी विचारवंतांनी म्हटल्याप्रमाणे माणूस हा निसर्गतःच काहीसा चिंताग्रस्त व द्वेषग्रस्त असावा. किंवा अगदी सोप्या भाषेत सांगावयाचे म्हणजे, बहुधा त्याच्या प्रकृतिजन्य स्वभावामुळेच माणसाला स्वतःबद्दल व इतरांबद्दल अविवेकीपणे विचार करणे अधिक सोपे जात असावे ! आणि या उलट, विवेकीपणे विचार करणे, नजिकच्या सुखाचा त्याग करून दूरवरच्या हितासाठी कसोशीने प्रयत्न करीत राहणे, भोळसटपणे न वागणे, शेखसल्लीपणे विचार न करणे व एकूण शहाण्यासारखे वागणे हे सर्व कमालीचे अवघड जात असावे ! मनुष्याच्या या जन्मजात स्वभावामुळे त्याला अगदी माफक प्रमाणात मानसिक समतोल राखावयाचा असेल तर त्याने क्रियाशील राहून, सतत तर्कशुद्धपणे विचार करून आपल्या मनुष्यत्वाचा अविभाज्य भाग असलेल्या स्वतःच्या बौद्धिक व भावनिक मर्यादांचा स्वीकार करून त्या मर्यादांच्या चौकटीतच आपले जीवन अधिक प्रगल्भपणे व सुखा-समाधानाने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याप्रमाणे माणसाने बाह्य जगाचे निरीक्षण करण्याचे. चिकित्सक दृष्टीने पृथक्करण करण्याचे आपले सामर्थ्य वापरून वैज्ञानिक व औद्योगिक क्षेत्रात प्रगती केली आहे त्याचप्रमाणे तो स्वत.ला उपलब्ध असलेले आत्मनिरीक्षण करण्याचे, आत्मचिकित्सा करण्याचे सामर्थ्य वापरून आपल्या जैविक व सामाजिक मर्यादांशी मुकाबला करून त्यांच्यावर मात करू शकेल. त्यासाठी मुलांना लहानपणापासूनच स्वत.बद्दल सर्जनशीलपणे विचार करण्याच्या त्यांच्यामधील सुप्त सामर्थ्याचा मागोवा घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. उलट प्रत्यक्षात मात्र लहान मुलाना स्वतंत्रपणे निरीक्षण व विचार करण्यास शिकविण्याऐवजी सर्व बाबतीत बाबा वाक्यं प्रमाणम् हेच तत्त्व अंगवळणी पाडून घेण्यास शिकविले जात असते. त्याचा परिणाम असा होतो की, मुलांच्या केवळ प्रकृतिजन्य स्वभावामुळे ती मोठेपणी जेवढ्या प्रमाणात भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध होऊ शकतील त्याहीपेक्षा जास्त प्रक्षुब्ध होतात.

एखाद्या माणसावर लहानपणापासून असे अनिष्ट संस्कार झालेले असले की त्यातून त्याची मुक्तता करणे हे मोठे कठीण काम होऊन बसते. तथापि अशा माणसाला भावनिक समतोल प्राप्त करून घेण्यास मदत करण्याचा एक मार्ग म्हणजे, विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीच्या साहय्याने त्याला मार्गदर्शन करणे. या पद्धतीचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, स्वतःबद्दल व स्वतःच्या इतरांबरोबरच्या संबंधाबद्दल तर्कदुष्ट व अविवेकीपणे विचार करण्याची माणसाची प्रवृत्ती म्हणजे त्याला मिळालेला एक नैसर्गिक शाप आहे ! आणि यावर ताण म्हणजे समाजात राहून कळत किंवा नकळत त्याने आत्मसात केलेले एक विशिष्ट जीवन-तत्त्वज्ञान.

दोषारोप करीत बसणारा माणूस स्वतःला कोणत्या दोन प्रकारची वाक्ये सतत स्वत.ला सांगत असतो व त्यांपैकी दुसऱ्या प्रकारची वाक्ये कशी तर्कदुष्ट व अविवेकी असतात हे या लेखात अगोदर पाहिलेच आहे आणि विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धतीनुसार भावनिकदृष्ट्या प्रक्षुब्ध असलेल्या माणसाला मार्गदर्शन करावयाचे म्हणजे त्याला असे शिकविणे की, तो जे स्वगत बोलत असतो त्यांपैकी दुसऱ्या प्रकारची वाक्ये पूर्णतः तर्कदुष्ट व अविवेकी असतात. याचा अर्थ असा की, त्याला असे शिकविले पाहिजे की, कोणत्याही माणसाने कितीही अनिष्ट किंवा अनैतिक वर्तन केले तर स्वतःच्या अशा वर्तनाला तो जबाबदार असतो हे खरे असले व त्याला स्वतःचे वर्तन सुधारण्यास प्रवृत्त करणे स्पृहणीय असले तरी त्याच्या हातून घडलेल्या अनिष्ट किंवा अनैतिक वर्तनामुळे तो माणूस पूर्णतः नालायक, नतद्रष्ट किंवा कुचकामी ठरत नाही. म्हणजे विवेकनिष्ट मानसोपचारपद्धती माणसाला स्वत.च्या अनिष्ट किंवा अनैतिक वर्तनाची जबाबदारी मान्य करावयास व आपले वर्तन सुधारण्यास जरूर शिकविते; मात्र आपल्या हातून किंवा दुसऱ्याकडून प्रामादशील वर्तनाबद्दल आपले स्वतःचे किंवा दुसऱ्याचे माणूस म्हणून पूर्णतः अवमूल्यन करून स्वतःचा किंवा दुसऱ्याचा तिरस्कार करणे तर्कदुष्ट, अविवेकी व आत्मघातकी आहे असेच त्याला शिकविणे. माणसाच्या मनातील दोषारोप करीत बसण्याच्या प्रमादशील वर्तनामुळे संपूर्ण व्यक्तीचाच तिरस्कार करण्याच्या मुळाशी असलेले अविवेकी जीवन-तत्त्वज्ञान उखडून टाकण्यासाठी विवेकनिष्ठ मानसोपचारपद्धती अर्थातच अनेक तंत्रांचा अवलंब करते. परंतु तो झाला तपशीलाचा भाग !

आता हे उघडच आहे की रोगट प्रेमावर-किंवा प्रेमिकावर-मुख्य इलाज म्हणजे त्याची स्वतःला व इतरांना दोष देत बसून स्वतःचे व इतरांचे माणूस म्हणून अवमूल्यन करण्याची जीवनदृष्टी बदलणे. हे काम करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे, लहान वयापासूनच मुलाना योग्य शिक्षण देऊन त्याच्या मनात स्वत.ला व इतरांना दोष देण्याचा अविवेकी दृष्टिकोण रुजणार नाही—किंवा निदान फार खोलपणे रूजणार नाही—अशी खबरदारी घेणे. परंतु असे योग्य जीवनाभिमुख शिक्षण जोपर्यंत मुलांना दिले जात नाही तोपर्यंत तशा शिक्षणाच्या अभावामुळे निर्माण झालेली दरी बुजविण्याचा मार्ग म्हणजे मानसोपचार किंवा प्रशिक्षण ! अर्थात ही दरी जितक्या प्रभावीपणे बुजविली जाईल तितक्या यशस्वीपणे तरुण-तरुणी परस्परांवर निरोगीपणे प्रेम करण्यास अधिक उत्सुक व समर्थ बनतील !

मानसोपचाराचा आश्रय घेऊन किंवा स्वतःच विचार करून माणूस स्वत.चा व इतरांचा द्वेष करण्याच्या आपल्या सवयीला मूठमाती देईल तर तो केवळ अधिक निरोगीपणे प्रेम करू शकेल इतकेच नव्हे, तर दुर्दैवाने प्रेमभंगाचा प्रसंग त्याच्यावर ओढवलाच तर त्यामुळे त्याला निश्चितच वाईट वाटले तरी गोविंदाग्रजांच्या काव्यपंक्तीत थोडा बदल करून तो म्हणेल—

होईल होईल वाटत होते तेच अखेरीस झाले !
( परंतु )
नाव घेतल्यावाचून आता जगात अडले कोठे ?

□

पुस्तके

# सूत्र कोणते ?

समीक्षाशास्त्रामध्ये खूपशी चर्चा होऊन-देखील 'आकृतिबंध' ही संज्ञा अव्याख्येयच राहिली आहे. निरनिराळे समीक्षक जरी काही व्याख्या सुचवीत असले तरी निर्णायक व्याख्या मात्र अजून होऊ शकलेली नाही. हा कथेचा आकृतिबंध. तो कादंबरीचा आकृतिबंध असे नेमकेपणाने सांगता यावे अशी परिस्थिती नाही. प्रवाही लेखन कोणत्याच बंदिस्त आकार-प्रकारात मोडणे कठीण होते. त्यामुळे विजय तरवडे यांची 'कोलाज' ही दीर्घकथा आहे, कादंबरी आहे की आणखी काही एक वेगळाच प्रकार आहे हा प्रश्न शिल्लक राहतो.

लेखन हे गद्य असो की पद्य असो, लघु असो की दीर्घ असो, ते कोणत्या तरी सूत्रात गोवलेले असते. ते सूत्र लेखक हा स्पष्टपणे निवेदित करत असेल किंवा प्रतिमादिंच्या व्यापारातून व्यक्त करीत असेल; पण तसे केल्याशिवाय इष्ट परिणाम साधला जात नाही. तरीही सूत्र हे परिणामाचे एकमेव साधन असे म्हणावयाचे नाही. सूत्राला अनुषंगिक इतर जो काही शब्दव्यापार असतो तोही महत्त्वपूर्ण असतो. त्या व्यापारातून भावविश्व साकारणे वा कलात्म अनुभव देणे हे घडत असते. कलाकृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेत असताना हा परिणाम महत्त्वाचाच असतो; पण प्रत्यक्ष आस्वादनाची प्रक्रिया संपल्यावर लेखकास काय म्हणावयाचे आहे, त्याचे सूत्र कोणते, हा प्रश्न शिल्लकच राहतो. फार तर कवी हा माझ्या कवितेतून मला फक्त 'फील' द्यावयाचे होते असे म्हणू शकेल; पण गद्यलेखकाला हे स्वातंत्र्य कितपत घेता येईल? 'कोलाज' हे गद्यलेखन वाचल्यावर हे प्रश्न उभे राहतात.

आपल्या लेखनाला श्री. तरवडे यांनी 'कोलाज' म्हणजे विविध तुकड्यांनी रचलेली एक कृती, असे म्हटल्यामुळे एकसूत्रत्वाची मागणी करणे अप्रस्तुत ठरते असेही नाही. कारण विविध चित्र-विचित्र तुकड्यांची रचना ही लेखकाने काही अपघाताने केलेली असते, असे नाही. तुकड्यांची मांडणी करत असतानाच कळत न कळत त्याची प्रतिभा काही अर्थ शोधीत असते. ती केवळ रचनेसाठी रचना नसते. त्या रचनेपाठी काही अर्थाचे अस्तर असत. सकृद्दर्शनी विजोड वाटणारे तुकडे एकमेकांजवळ आणतानाही काहीएक प्रयोजन असले पाहिजे. 'कोलाज'मध्ये वापरलेले अनेक तुकडे स्वतंत्रपणे विचार केला तर मोठे छान वाटतात; पण एकसंध परिणाम देण्यात मात्र ते उणे वाटतात.

प्रशांत वाडेकर हा या गद्य लेखनातील नायक किंवा केंद्रव्यक्ती आहे, असे वाटते. लौकिकदृष्ट्या कारकून असणारा, पणवस्तुतः स्वतःच्याच भावविश्वात गुरफटून असलेला, लहानपणीच पोरका झालेला, स्मृतिभ्रंश किंवा दुभंगलेल्या व्यक्तिमत्त्वाचा हा मनुष्य आत्महत्या करतो, असे वर्णन पहिल्या दोन भागात येते. त्याच वेळी त्याच्या मृत्यूनंतर त्याचे सहकारी काय व कसे बोलतात, वागतात त्यांच्या वर्णनांचे तुकडे आहेत. सावळ्या, खेलाट्या, देखण्या सुहासिनीला प्रेयसी करून घेण्याइतकाही तो समर्थ नाही, अशी नोंद आहे. त्यानंतर ऑफिसमधल्या व्यक्ती आणि वल्लींची वर्णने, संवाद, भ्रष्टाचारी आणि व्यभिचारी माणसांच्या किस्स्यांचे तुकडे पसरलेले आहेत. असे सात भाग संपतात. तोवर प्रशांत वाडेकरचा पहिल्या दोन भागात येणारा तुकडा जवळजवळ नजरेआड होतो. सातव्या भागानंतर अकराव्या भागापर्यंत तो तुकडा पुन्हा विस्तारत राहतो; पण हा विस्तार फक्त शब्दविस्तार आहे. प्रशांतबद्दल तो विशेषसे काही एक सांगण्यावर भर देत नाही.

या लेखनात काय आहे हे वर सारांशरूपाने सांगण्याचा प्रयत्न केला. हेतू असा की, कथा वा कादंबरीच्या बांधणीच्या कमी-अधिक रूढ प्रकारातही हे लेखन मोडेल, असे वाटत नाही.

पण एक मात्र प्रकर्षाने जाणवले की, लेखकाकडे उत्तम भाषा आहे, उत्तम शैली आहे, वर्णने नेमकेपणाने करण्याची क्षमता फार चांगली आहे, म्हणजे तरवडे हे साधनांच्याबाबत मला उणे वाटत नाहीत. मोठी अपेक्षा ते निर्माण करतात.

पण कोणत्याही लेखनामागे उत्तम चिंतनशीलता जोपासावी लागते. लेखक हा केवळ सुंदर दिसणाऱ्या शब्द-वस्तू निर्माण करतो असे मला वाटत नाही. तो अशी सुंदरता निर्मितो की जिला चिंतनातून फुलणारा अर्थाचा गाभा असतो, श्री. विजय तरवडे त्या प्रवासात आहेत, असे मात्र आवर्जून म्हणावेसे वाटते.

—प्रा. विजय कारेकर

कोलाज
विजय तरवडे
आराधना पब्लिकेशन्स, पुणे
पाने ६४, किंमत : ७ रुपये

# सुवर्णमहोत्सवी सकाळ अंक

चंद्रशेखर मराठे

पूर्वी मी पुस्तकांची परीक्षणे बरीच लिहिली आहेत. दिवाळी अंकांचेही रसग्रहण केले आहे. आज मी एका दैनिकाच्या विशेषांकाचे कौतुक करणार आहे. वास्तविक आजकालच्या दैनिकांमध्ये कौतुकाने वाचण्यासारखा मजकूर फारच क्वचित प्रसिद्ध होतो. अशा या रखरखीत काळामध्ये पुण्याच्या दैनिक सकाळने देखणा सुवर्णमहोत्सव अंक एक जानेवारीला प्रकाशित केला. कागद, छपाई, मजकूर, मांडणी व सम्यक परिणाम या सर्व दृष्टींनी हा अंक केवळ अप्रतिम आहे. दैनिक सकाळचे प्रधान संपादक, सरव्यवस्थापक व सर्वच सेवकवर्ग या अंकाच्या चांगल्या स्वरूपाबद्दल मनःपूर्वक अभिनंदनास पात्र आहेत! ज्यांनी हा अंक घाईगर्दीमध्ये नीट वाचला नसेल, त्यानी तो जपून ठेवून, जमेल तसा वाचावा व एका अपूर्व आनंदाचा आस्वाद घ्यावा, अशी माझी शिफारस आहे.

एकोणीसशेबत्तीस ते ब्याऐंशी या पन्नास वर्षांच्या अर्धशतकामध्ये, महाराष्ट्राच्या जीवनामध्ये सर्वच क्षेत्रांत लक्षणीय बदल

झाले. या प्रक्रियेचे अभ्यासू, निर्मळ, सळमळीच्या व खेळकर दृष्टिकोनांतून सकाळच्या या सुवर्णमहोत्सवअंकामध्ये दर्शन घडविण्यात सकाळकार खूप यशस्वी झाले आहेत! या अंकाची आणखी ओळख करून देण्याआधी त्याची काही वैशिष्टये नोंदवावीशी वाटतात. बावन्न पानांच्या या मोठ्या अंकात सकाळचे संस्थापक व संवर्धक कै. डॉ. नानासाहेब परुळेकर याचे एकही छायाचित्र नाही! व्यक्तीपासून स्फूर्ती घेत राहूनही, व्यक्तिनिरक्षेप राहणारी 'दैनिक सकाळ' ही एकमेव संस्था .असावी. दुसरे म्हणजे या अंकातील पुष्कळशा जाहिराती देखील देखण्या व सुबक आहेत. विशेषत. युनायटेड वेस्टर्न बँक लि. या बँकेची जाहिरात अतिशय काव्यमय आणि कोवळ्या 'आपुलकीने' परिपूर्ण अशी वाटते.

कै. डॉ. नानासाहेब परुळेकर यांचे छायाचित्र नसले, तरी या सुवर्णमहोत्सव अंकांत त्यांची दोन शब्दचित्रे आहेत. एक शब्दचित्र सकाळचे मुख्य प्रूफरीडर श्री. द. शं. खामकर यांनी फार अचूक असे लिहिले आहे. त्यामध्ये नानासाहेबांची व्यवहारी, वक्तशीर वृत्ती, कळकळ व स्पष्टपणा या गोष्टी छान दिसून येतात. दुसरे शब्दचित्र 'वसंत' कार श्री. दत्तप्रसन्न काटदरे यांनी बहारदार रेखाटले आहे. त्यामध्ये त्यांनी नानासाहेबाची सर्वांना मदत करण्याची वृत्ती व खास स्वतःची पद्धत, मैत्री जोपासण्यातील सजगता व विरोध करणाराशीही स्नेह ठेवण्याची धडपड, या गुणांचे स्पष्टपणे दिग्दर्शन केले आहे. याखेरीज काही विक्रेते, काही बातमीदार यांच्या आठवणीमधूनही नानासाहेबाच्या चौफेर उपक्रमशीलतेची ग्वाही मिळून जाते.

आपल्याकडे आलेल्या माणसाला स्पष्ट व स्वतःचे दृष्टीने सुयोग्य सल्ला द्यावयाचा या नानासाहेबाच्या सवयीचा मला व्यक्तिशः अनुभव आलेला आहे.

बासष्ट साली बेकार अवस्थेत मी नानासाहेबांना जाऊन भेटलो. त्या वेळी त्यांनी मला इंग्रजीचे मराठी व मराठीचे इंग्रजी भाषांतर करण्यासाठी दोन उतारे दिले. नंतर माझी भाषातरे स्वतः तपासून त्यामधील चुका समजावून दिल्या. माझी अर्थशास्त्रीय एम. ए. पदवी पाहून, त्यांनी मला सकाळच्या जाहिरातखात्यात नेमून टाकले. मी जरा खट्टू झालो. मला संपादकीय खात्यामध्ये काम करण्याची इच्छा होती. नंतर काही दिवसांनी, मी नानासाहेबांना, पुन्हा मला संपादकीय खात्याकडे बदलण्याची विनंती केली; पण त्याचे माझ्याविषयी जाहिरातखात्यातच, मोठे प्लॅन्स होते. त्यांनी मला ते शांतपणे स्पष्ट करून सांगितले.

माझ्याजवळ तेवढी चिकाटी नव्हती. (आणि अजूनही नाही) चार महिने 'सकाळ'मध्ये काम करून मी 'सकाळ' सोडला !

मी 'सकाळ' सोडला; पण 'सकाळ'चे वाचन सोडले नाही. महाराष्ट्राबाहेर वास्तव्य असले तरी मी टपालाने 'रविवार सकाळ' तरी मागवून वाचत असतोच. या माझ्या सवयीचे सकाळच्या 'सुवर्णमहोत्सव' अंकाने सार्थक झाले.

सकाळच्या अधिकारी व सेवकवर्गाच्या खेळकर वृत्तीसंबधी माझी एक छान आठवण आहे. मी 'सकाळ'मध्ये असताना, केव्हा तरी, मेरिलीन मन्रोने आत्महत्या केली. त्या आत्महत्येची बातमी देताना सकाळमध्ये मन्रोचे वय ३७ वर्षे याऐवजी ७३ वर्षे असे चुकीने पडले. दुसऱ्या दिवशी या मोठ्या चुकीची गंभीर मुद्रानी चर्चा चालू असताना, जाहिरात विभागाचे प्रमुख श्री. हरीभाऊ ताडफळे आले. पाच मिनिटे चर्चा ऐकून ते मिस्किलपणे म्हणाले, 'मन्रोचं वय जर ७३ वर्षांचं झालं असेल तर तिची आत्महत्या स्वाभाविक म्हणावी लागेल—लोकांनाही हे वाचून फारसं दुःख झालं नसेल !'

या खेळकर व व्यवस्थित लोकानी कसोशीने काढलेल्या सुवर्णमहोत्सवी अंकामध्ये वाचकाला विविध विषयांवरील कसदार लेख वाचायला मिळतात. सर्वश्री ना. ग. गोरे, कमल पाध्ये, य. दि. फडके, बगाराम तुळपुळे, बाबा आढाव, कुसुम नारगोळकर, भालचंद्र नेमाडे यांच्या वैचारिक लेखांमध्ये, महाराष्ट्राचा विकास, स्त्री-मुक्ती, राजकारण, कामगार-प्रश्न, समानता, आदिवासी-प्रश्न व मराठी साहित्य याचा अभ्यासपूर्ण आलेख मांडलेला आहे, तर सर्वश्री वामनराव देशपांडे, भा. वि. धारप, जे. डी. गोंधळेकर, अशोकजी परांजपे यांनी मराठी जीवनातील संगीत, चित्रपट, चित्रकला, लोकनाट्य यांचा रसपूर्ण आढावा घेतला आहे.

महाराष्ट्राच्या जीवनात मोलाची भर घालणाऱ्या विविध क्षेत्रांतील व्यक्ती व संस्था यांचा संपादकांनी गौरवपूर्ण परिचय करून दिलेला आहे. पन्नास वर्षांपूर्वी पुण्याचे जीवन कसे होते, याचा खेळकर व परखड शैलीत मागोवा घेणारा श्रीमती शकुंतला परांजपे यांचा रोचक लेख तर केवळ 'न चुकविण्यासारखा' आहे. याशिवाय गेल्या अर्धशतकातील निवडक, वेधक बातम्या व वाचकाच्या पत्रांनी एक वेगळीच गंमत आणली आहे.

अशा या परिपूर्ण अंकात काही उणीवाही भासल्या. महाराष्ट्राचे शैक्षणिक जीवन व विद्यार्थी चळवळ यावर एखादा लेख हवा होता. तसेच मराठी कविता कशी बदलत गेली, याविषयी काही सोदाहरण चर्चा हवी होती. 'मुंबई सकाळ' व 'कोल्हापूर सकाळ' याच्या कामगिरीची काही दखल घेणे राहून गेले.

असो. प्रत्येक मराठी वाचकाने हा सुवर्णमहोत्सव अंक संग्रही ठेवावा, सवडीने वाचावा ही सदिच्छा.

केवळ लोकाश्रयावर, लोकांकरता चालविलेला, 'सामान्याचा सकाळ' यापुढेही असाच आपले कार्य निरंतर, निर्भयपणे व लोकनिष्ठेने करीत राहो, ही परमेश्वरापाशी प्रार्थना ! तुकाराममहाराज म्हणतात—

जे का रंजले गाजले,  
त्यासी म्हणे जो आपुले ।  
तोचि साधु ओळखावा,  
देव तेथेचि जाणावा ॥

रंजल्या-गांजल्यांच्या बाजूने आपला आवाज उठवीत राहाण्याचे सामर्थ्य 'सकाळ'मध्ये टिकून राहो, ते वाढत राहो अशी इच्छा प्रकट करून 'सकाळ'चे, एक्कावन्नाव्या वर्षात अभीष्टचिंतन, 'निरोप घेता' करतो.

# देख हमें आवाज न देना ओ बेदर्द जमाने

सदानंद बोरसे

एकोणीसशेबासष्ट साल सरलेले. त्या सरत्या सालातील सलता पराभव सगळ्याच भारतीयांवर सावट धरून असलेला. अशा वेळीच त्रेसष्ट सालाच्या सुरुवातीलाच लताच्या दैवी आवाजातील ते गीत देशाच्या कोपऱ्या-कोपऱ्यात निनादू लागले.

'ऐ मेरे वतन के लोगों...'

त्या वेळी मी पाच-सहा वर्षांचा असेन; पण अजूनही ते गीत ऐकताना पोटात गलबललेली कालवाकालव अजून आठवते. त्या गीताच्या शेवटचे लताचे आणि समूहाचे 'जय हिंद, जय हिंद की सेना' हे शब्द ऐकताना अंगावर सरसरून फुललेले रोमांचांचे रान आठवते. हिंदी भाषेचे गंधाच्या शितोड्याएवढे ज्ञान नसतानाही लताच्या स्वर आणि गीताचे संगीतसूर यांनी केलेली ती किमया होती. अशी आम्हा सामान्यांची अवस्था होती, तर साऱ्या राष्ट्राच्या अस्मितेचे, भावनांचे प्रतीक असलेल्या पंडितजीसारख्या नेत्याच्या डोळ्यांतून त्या गीताने आसवे काढली, यात नवल काय ?

कृतकृत्यतेच्या, राष्ट्रीय सन्मानाच्या अत्युच्च शिखरावर त्या वेळी उभ्या असणाऱ्या त्या गीताला सुरांचा साज देणारा संगीतकार मात्र त्या गीताआधी एक वर्षापासून वनवासी व्हावा, ही नियतीने गायलेली विचित्र बेसुरी चीजच ! एकोणीसशेसाठपर्यंत संगीतसाम्राज्याचे सम्राटपद भोगल्यानंतर काही सन्मान्य अपवाद वगळता या रामचंद्राच्या नशिबी अखेरपर्यंत वनवास आला !

पण एकोणीसशेसाठपूर्वी ?

त्यापूर्वी सुमारे एक तप भारतीय चित्रसंगीताचे अवकाश सी. रामचंद्र, नौशाद आणि सचिनदेव बर्मन या त्रिमूर्तींनीच व्यापून टाकले होते, त्या काळात अतिशय गाजलेल्या 'मुगले आझम' आणि 'अनारकली' या चित्रपटांच्या स्पर्धेच्या कथा माझ्या वडिलांच्या पिढीतील लोक अजूनही सांगतात. दोन्ही चित्रपटाचा विषय एक; पण बाकी बहुतेक बाबतीत 'मुगले आझम' चे पारडे चांगलेच जड! 'मुगले आझम'मध्ये अनारकली होती सौंदर्यसम्राज्ञी मधुबाला; तर सलीम अभिनयसम्राट दिलीपकुमार ! आता या जोडीशी 'अनारकली'ची बीना रॉय आणि प्रदीपकुमार काय कपाळ टक्कर घेणार? अशीच परिस्थिती बाकी सगळ्या बाबतीत. अपवाद फक्त संगीताचा. 'मुगले आझम'चे संगीतकार नौशाद तर 'अनारकली'चे सी. रामचंद्र आणि अक्षरशः 'ये जिंदगी उसीकी है' (लता), 'मुहब्बत ऐसी धडकन है' (लता), 'आ जा अब तो आ जा' (लता), 'दुवा कर गमे दिल' (लता), 'जिंदगी प्यार की दो-चार घडी होती है' (हेमंतकुमार), 'जाग दर्दे इश्क जाग' (हेमंतकुमार-लता) अशा एकाचढ एक गीताच्या जोरावर 'अनारकली' यशस्वी ठरला. इतकेच नव्हे तर 'मुगले आझम'च्या तोडीस तोड गाजला ! तमाम प्रेक्षकानी फक्त कानांनी पाहून 'अनारकली' गाजवला. ही किमया होती सी. रामचंद्र नावाच्या क्रांतिकारक संगीतकाराची, चितळकर नावाच्या अफलातून डोक्याची !

'सुखी जीवन' चित्रपटातील 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा' या गीतापासून आपल्या अश्वमेधाचा घोडा या माणसाने सोडला. 'चित्रपट ही बोलून-चालून जनकला. सुबोधता आणि सौंदर्य या दोन्ही तत्त्वांचा मेळ घातल्यावाचून तिचा रथ चालू शकायचा नाही.' हे मनात पक्के गृहीत धरून अण्णांनी चित्रसंगीतात असंख्य यशस्वी प्रयोग केले आणि अक्षरशः क्रांती घडवली. हिंदी संगीतात पाश्चात्य वाद्यांचे स्वर बेमालूमपणे मिसळून देण्याचे काम अण्णांच्याही आधी अनिल विश्वासनी केले होते. अण्णांनी हिंदी चित्रपटसंगीतात पाश्चात्य संगीताची सुप्रतिष्ठा केली; कारण संगीतक्षेत्रामध्ये देशी-विदेशीचा भेदभाव किंवा दोन्हीसाठी श्रेष्ठ-कनिष्ठतेचे शिक्के त्यांनी मानलेच नाहीत. स्पेनमधील कॅस्टनट्सवर स्पॅनिश संगीत ऐकताना हा कलावंत त्यात लावणीचे वा ओवीचे सूर ओळखी. फ्रान्स, इजिप्त, इटली अशा कैक परदेशाच्या संगीताशी सूर मिळवून मनमोकळी देवाण-घेवाण करी आणि तरीही अण्णांचे स्वतःचे संगीत म्हणजे आंधळे अनुकरण नव्हते, तर खास सी. रामचंद्री स्पर्शाने संस्कारित होऊनच त्या कलाकृती अवतरत ! लहानपणी पाखराच्या ताना आणि डोक्यावर जंगली लाकडांचे भारे घेऊन साजवेळी डोंगरकपारीतून निघालेल्या गोंडिणीच्या गाण्यांमधून संगीत शोधणारे अण्णा आयुष्यभर धनगरांच्या ओव्यांमधून, पंजाबातील लोकगीतांमधून, पहाडी लकेरींमधून, शेतकऱ्याच्या भलरीमधून आणि पोवाड्याच्या सवाईमधून कणसूर शोधीत राहिले, आपल्या संगीतातून भरभरून उधळीत राहिले.

अ-अलबेलाचा, आ-आझादचा, इ-इन्सानियतचा अशा जवळजवळ प्रत्येक अक्षरावर अण्णानी आपल्या संगीताचा ठसा उमटवला आणि तो प्रतिभेचा ठसाही साधनेच्या मुशीत तापून निघाल्याने असा रसरशीत बनलेला की, त्याची छाप एक पिढी उलटल्यानंतरही अजून तशीच ताजी, टवटवीत राहावी. आजही 'अलबेला' कोणत्याही चित्रपटगृहात लागला, तर 'दिवाना परवाना' किंवा 'शोला जो भडके'ला पडद्यावर नाण्याची उधळण होते, अजूनही वरातीच्या बँडवर 'भोली सूरत दिलके खोटे' वाजायला लागले की, रोंबा-सोंबा करणारे बेहोष होतातच; पण कडक इस्त्रीची घडीसुद्धा पायाने अभावितपणे धरलेल्या ठेक्याने विस्कटते ! 'अलबेला'चा विचार करायला लागलो तर मला सर्वांत पटणारी गोष्ट म्हणजे हा एक क्रांतिकारक चित्रपटच आहे. हिंदीतील रूढ चिकण्या-चोपड्या, उंच,

देखण्या नायकाऐवजी या चित्रपटातील नायकाच्या जागी भेटतो बुटका, स्थूल, बटबटीत डोळ्याचा, भावदर्शी पण विनोदी चेहऱ्याचा ओबड-धोबड मा. भगवान ! चित्रपटातील वेशभूषेपासून नृत्यापर्यंत सर्व दृष्टींनी स्वतःची वेगळी वहिवाट निर्माण करणारा हा चित्रपट. अशा चित्रपटासाठी क्रांतिकारक संगीतकारच हवा. मग 'सी. रामचंद्र' या नावाशिवाय वेगळे नाव कसे येणार ? आधी उल्लेखलेली तालप्रधान गीते 'अलबेला'त गाजलीच; पण 'बलमा बडा नादान'सारखे मधुर गीतही साऱ्याच्या ओठी झाले, 'धीरे से आजा री अखियन में' या अंगाई गीताने तर कित्येकांच्या झोपा उडवल्या असतील !

'इना मिना डिका' सारखा सुरीला आरडाओरडा किशोरकुमारला करायला लावणाऱ्या संगीतकाराच्या प्रतिभेतूनच 'मैं जागूँ सारी रैन, सजन, तुम सो जाओ' सारखे काळजाला हात घालून कालवणारे मूर्तिमंत कारुण्य जन्मले यावर विश्वास ठेवणे म्हणजे टेम्स आणि गंगेचा उगम एकच आहे असे मानण्यासारखे; पण अण्णांनी ही किमया करून दाखवली. 'आना मेरी जान संडे के संडे' किंवा 'ओ गोरे गोरे' (शमशाद) अशी नाचरी, उडती संगीतरचना करणारे अण्णा 'मुझे पे इल्जामे बेवफाई है'सारखे करुणगंभीर सूरही आळवत. लताच्या दैवी आवाजावर तर या कलावंताने किती बहुमोल अलंकार चढवले त्याला गणतीच नाही ! 'आझाद'मधील 'राधा ना बोले' किंवा 'जा री जा री, ओ कारी बदरिया' किंवा 'देखो जी बहार आयी' घ्या किंवा 'नास्तिक' मधील 'तेरे फूलों से भी प्यार', 'बहुरानी'मधील 'बलमा अनाडी मन भाये' घ्या किंवा 'सरगम' मधील 'छेड गयी सरगम !' प्रत्येक आभूषण आपल्या वेगळेपणाने कान खिळवून ठेवते. हीच गोष्ट इतर गायक-गायिकांच्या बाबतीत. 'तुम मेरे मैं तेरी' हे 'नवरंग'मधील आशाचे गीत म्हणजे तृप्त संसारी गृहिणीचा पतीच्या संयमित प्रेमाला दिलेला मंद हुंकाराचा प्रतिसाद; तर तीच आशा 'मलमली तारुण्य माझे'मध्ये कामुक प्रणयिनी बनते. दिल लगा कर हम ये समझे'मध्ये प्रेमाच्या खेळात ठेच खाऊन विव्हळ झालेली आशा 'अरे जा रे हट नटखट'मध्ये प्रसन्नपणे होळीचे रंग उधळताना दिसते. लता, आशा, रफी किंवा तलत या गुणी गायकांची गोष्ट सोडा, अण्णाच्या प्रतिभेच्या परीसस्पर्शाने महेंद्रकपूरचा लोखंडी आवाजही 'आधा है चंद्रमा, रात आधी' सारखे सोनेरी गीत गाऊन जातो !

संगीतक्षेत्रात असे मनमुराद राज्य उपभोगल्यानंतर प्रतिभा आटली म्हणून नव्हे, तर केवळ कलेच्या क्षेत्रात घुसखोरी केलेल्या राजकारणामुळे नशिबी आलेला वनवास हे या रामचंद्राच्या वाट्याला आलेले उरफाटे नशीबच होते !

काही माणसे जन्मतःच शिबीराजाचे नशीब घेऊन येतात. एक पाय आगीत जळत असतो; तर एक पाय सुंदर स्त्रियांकडून चुरला जात असतो. सी. रामचंद्र हे अशा माणसांपैकीच. त्यांच्या जन्माआधीची गोष्ट त्यांच्या आईला मुलगी हवी होती; पण झाला मुलगा ! त्यामुळे जगात पहिला पदक्षेप आणि 'मुलगाच का मेला शेवटी ?' असा जन्मतः पहिला उद्गार या दोन्ही गोष्टी त्यांना जन्मदेकडूनच लाभल्या. नंतरच्या आयुष्यातही सुखदुःखाचे दोन्ही काठ त्याना एकाच वेळी सोबत करीत राहिले. त्यांच्या पहिल्या रौप्यमहोत्सवी चित्रपटाचा—'भक्तराज'चा रौप्यमहोत्सव आणि त्यांच्या पहिल्या मुलाचा मृत्यू एकाच दिवशी घडला! त्यांचा दुसरा अतिशय गाजलेला चित्रपट—'शहनाई'—त्याचेही रौप्यमहोत्सवी यश महात्माजींच्या खुनाने पूर्णतः झाकोळून गेले ! संगीतदिग्दर्शक म्हणून सतत यशाची चढती कमान पण त्याच वेळी वैयक्तिक जीवनात मात्र सतत तणावपूर्ण वातावरण; पण या परस्परविरोधी घटनामुळे त्यांच्यातील 'माणूस' कधीच संपला नाही, हे त्यांच्या 'माझ्या जीवनाची सरगम' या आत्मचरित्रात दिसते. या आत्मचरित्रातून एक वेगळेच अण्णा आपल्यापुढे उभे राहतात. आपल्या आयुष्यातील महत्त्वाची वळणे—बरी वाईट दोन्ही—सांगत असताना हा माणूस सच्चेपणामुळे आपले आत्मचरित्रही सुरेल बनवून टाकतो. पुस्तकातील कित्येक ओळी वाचताना 'संगीत' या माणसाच्या हाडामासात किती रुजले होते, रक्तात कसे भिनले होते त्याचा प्रत्यय येतो प्रस्तावनेचे 'दोन शब्द' लिहितानाही अण्णा लिहितात, 'मला वाटते, मानवी आयुष्ये ही ईश्वराच्या मुखातून पाझरणारी गीते आहेत. प्रत्येक गीताची सुरावट वेगळी. राग, ताल वेगळा. सारखेपणा आढळला तर तो अपवाद. प्रत्येक गीताचा स्वरविस्तार स्वतंत्र, भावदर्शनही वेगळे...अनंताचे गीत सुबोध असेल कसे ? स्वरास्वराच्या विसंवादानेही अनेकदा ते साकारते...गेली कित्येक वर्षे हे गीत मी ऐकतो आहे. सर्वेंद्रियांनी ते भोगतो आहे... जीवनाचा रसास्वाद मनमुराद घेतो आहे. वाहत्या गीताला कल्पनेनेच एक बांध घालून मी मागचा प्रवाह पाहतो. होऊन गेलेल्या गीताची सरगम स्मरणाने टिपतो आहे.'

अनेक कवींच्या सहवासात आलेला हा संगीतकार मूळचा चांगदेवाच्या पुणतांबे गावचा असला तरी चांगदेवासारखा कोरा राहिला नाही, हे त्यांच्या आत्मचरित्रातील वाक्या—वाक्याला लक्षात येते. 'मी आस्तिक असलो तरी विरक्त नाही. पुण्याचे मला आकर्षण आहे; पण पाप टाळण्याइतके सामर्थ्य माझ्याजवळ नाही.' ही प्राजळ कबुली देणारे आणि स्वतःच्या वागण्याबाबत थोडीशी समर्थनाची, थोडीशी अगतिकतेची आणि थोडीशी आत्मपरीक्षणाची बाजू घेणारे अण्णा इतरांचे भरभरून कौतुक करतात. नौशादबद्दल ते लिहितात, 'त्या माणसाची बुद्धी भलतीच तल्लख ! तो दिवसाला अकरा अकरा गाणी ध्वनिमुद्रित करून टाकायचा. सराईत सुगरणीने भराभर पुऱ्या तळून टाकाव्या तशा तो ग्रामोफोनच्या तबकड्या तयार करून फेकायचा.' किंवा लताच्या आवाजाचे वर्णन 'कानांची दृष्ट लागावी आणि ओठाची फसगत व्हावी' असा स्वर, असे करतात. अगदी स्वतःच्या काहीजणांबद्दलच्या कडवट, विखारी आणि जळत्या भावना व्यक्त करतानाही त्या 'काही जणां'ना अनामनिर्देशाचे संरक्षक कवच स्वतःच देतात. अण्णांच्या अविस्मरणीय संगीतरचनांमध्ये या 'सरगम'चा समावेश करायला हरकत नाही.

'देख हमें आवाज़ न देना,
ओ बेदर्द ज़माने, छोड के तेरा साथ चले हम
दुनिया नवी बसाने।'

असे म्हणत स्वर्लोकीच्या गंधर्वांच्या स्वरांवर सूरालंकार चढविण्यास चाललेल्या या संगीतकाराला त्यांच्याच सुरांमध्ये निरोप द्यावासा वाटतो,

'तुम क्या जानो
तुम्हारी याद में
हम कितना रोये।'

## निंदिया आजा री आजा

मंगळवारी पहाटे सी. रामचन्द्र या संगीत चमत्काराची अखेर झाली ! काय आठवत असेल तो या अखेरच्या क्षणी ? धीरेसे आजारी, अखियनमें' ही मधाळ लोरी की, ती नेहरूंच्या डोळ्यात तरळलेली आसवं ? 'कटते है दुखमें ये दिन' ही एका स्त्रीमनाची कैफियत की, 'तुम क्या जानो तुम्हारी यादमें, हो बोलकी व्यथा ? या सर्व 'व्यथा' पूर्ण करण्यास ह्या अखेरच्या क्षणी कुणीही यायचं नाही, अशी कल्पना असूनही त्याला या आठवणी आल्या असतील काय ?

लहानपणापासूनच संगीताचं जबरदस्त

वेड असलेल्या या कलावंताला अभिनयाचीही देणगी होती. पण चित्रपटक्षेत्रात पडल्यावर मात्र अभिनयाला संगीतप्रेमानं बाजूला सारलं आणि तयार झाला एक मनस्वी संगीतदिग्दर्शक ! या संगीतदिग्दर्शकाचं, अनिल विश्वास या दुसऱ्या एका संगीतकारावर अतिशय प्रेम होतं. अनिल विश्वासच्या संगीताने तो भारावून गेला होता.

पाश्चात्य संगीत, भारतीयीकरण करूनच वापरायचं, हा त्याचा अट्टाहास होता. रागदारीच्या चाली बांधताना त्यानं शास्त्रीय संगीतावरचं आपलं कौशल्य पणाला लावलं आणि या दोन्ही संगीतशास्त्रावरचा आपला दांडगा व्यासंग सिद्ध केला. काही थोडे अपवाद वगळता, ('आझाद' फक्त सातच दिवस ! सी. रामचन्द्रनं आपल्या सर्व चालीवर भरपूर मेहनत घेतलीय, हे निर्विवाद सत्य सतत जाणवत राहातं.

सी. रामचंद्रनं हिंदी, मराठी, तामिळ, तेलगू अशा अनेक भाषातील चित्रपटांना आपल्या संगीतानं संगीतबद्ध केलंय. या चित्रपटातील सर्व गाणी अगदी 'शोला जो भडके' (अलबेला) पासून 'हम कितना रोये (शिनशिनाकी बुबलाबू) पर्यंत त्यानं सारख्याच ताकदीनं उभी केलीयत. 'मुझपे इल्जाम ए-बेवफाई है' (यास्मिन) यासारखं लतानं चालीचं सोनं केलेलं गाणं, धुंद गझला बांधणाऱ्या मदनमोहनची आठवण करून दिल्याशिवाय राहात नाही. 'यास्मिन' या आपल्या चित्रपटाची गाणी आपण इतके कष्ट घेतल्या नंतरही म्हणावं तितकं यश देऊन गेली नाहीत, ही खंत त्यानं एकदा बोलून दाखविली आहे.

अलबेला, अनारकली, पतंगा, परछायी, आझाद, सरगम अशा वेगवेगळ्या ढंगांच्या चित्रपटांना सी. रामचंद्रानी संगीतबद्ध केलंय. या सर्व चित्रपटातील गाणी मूळ कथानकाशी समरस होऊन गेल्यासारखी वाटतात. सी. रामचंद्रनं लता, तलत या गायकांचा आपल्या संगीतात पुरेपूर लाभ उठवून घेतलाय. लताच्या 'धीरेसे आजा री' (अलबेला) ऐ चाँद प्यार मेरा' (खजाना) 'महफिल में जल उठी शमा' (निराला) 'राधा ना बोले' (आझाद) 'मैं जागूं सारी रैन' (बहुरानी) 'मेरे मनका बावरा पंछी (अमरदीप) या सर्व गाण्यांतून सी. रामचंद्रनं लताचे सर्व गायनविशेष अचूक काढून घेतलेयत. तलतसारख्या हळुवार आवाजाच्या गायकाकडून 'अपनी नाकामी से मुझको काम है' (सुबह का तारा, या नाजूक चालीबरोबरच 'बेचैन नजर बेताब जिगर' (यास्मिन) अशी हलकीफुलकी चाल म्हणवून घेताना आपलं कसब दाखवलंय. तलत–लता यांची द्वंद्वगीतं तर क्वचितच इतकी चांगली जमलीयत-' मोहब्बत मे ऐसे जमाने भी आऐं' (सगाई), 'तुम अपनी याद भी दिलसे' (यास्मिन), 'अपनी कहो, कुछ मेरी सुनो' (परछाई), 'तेरे रास्तेपे हमने' (कवि).

पाश्चिमात्य संगीताचा आपल्या संगीतात वापर सढळ हाताने करणारा सी. रामचंद्र हा पहिलाच संगीतकार; पण त्यानं ह्या पाश्चिमात्य संगीताचं भारतीयीकरण करताना त्यातला परकीय टोन आणि शब्दोच्चार कटाक्षानं टाळलेत. परकीय संगीत वापरताना त्याला हिंदी साज चढवला की बाज तोच उरतो. 'भूल जाए सारे गम' (नौशेरवान–ए–दिल) यासारखं वॉल्ट्झ (Waltz) बाज असलेलं गाणं हिंदी पडद्यासाठी वापरताना सी. रामचंद्रनं त्यातला 'मेलोडियस कंटेंट' नेमका ओळखून तो तसाच ठेवलाय !

सी. रामचंद्र हा गायक-संगीतकार होता. बहुतेक सर्व संगीतकारात आढळणारा, आपली गाणी आपणच गाण्याचा अट्टाहास त्याच्या संगीतात कुठे आढळत नाही. हेमंतकुमारइतकं, त्याच्या आवाजाला वजन नसेलही कदाचित; पण त्याचं गाणं कधी एकसुरी वाटलं नाही, हे नाकबूल करता येण्यासारखं नाही. अगदी वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी गायलेल्या 'संडे के संडे' (शहनाई) पासून 'धीरेसे आजा री' (अलबेला) आणि 'कितना हँसी है मौसम' (आझाद) पर्यंत चितळकर आपल्या गाण्यातली एक वेगळी छटा लोकांना ऐकवत राहिले. 'अलबेला'च्या गीतध्वनिमुद्रणप्रसंगी एका नामवन्त गायकानं येण्यास नकार दिल्याकारणानं सी. रामचंद्रनी लताच्या बरोबरीनं त्यातली गाणी गायलीयत ! सी. रामचंद्रनं गायलेली काही मराठी भावगीतं अजूनही आपण ऐकतो; पण मराठी चित्रपटसंगीताला सी. रामचंद्र म्हणावा तितका भावला नाही. घरकुल, सन्त निवृत्ती ज्ञानदेव, मधुचन्द्र अशी काही हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी नावं सोडल्यास मराठी पडद्यावर सी. रामचन्द्र हे नाव फारसं झळकलेलं नाही.

काव्याला चाल लावण्याच्या बाबतीत सी. रामचंद्रनी कायम आधी काव्य लिहून नंतर त्याला चाल लावलीय. आधी चाल तयार करून नंतर त्यात शब्द घालणं हा प्रकार 'उलटी गंगा वाहायला लावण्यासारखा' अनैसर्गिक असल्याचं त्याचं मत होतं. (गाये चला जा, पृष्ठ १३८) गीतकाराचे शब्द जास्तीत जास्त प्रभावीपणे श्रोत्यांपर्यंत पोचविणे, हेच संगीतकाराचं काम आहे, असं मानणाऱ्यांपैकी तो होता. एकदा संगीत-दिग्दर्शन आपल्याकडे सोपविल्यानंतर दुसऱ्या कोणत्याही माणसानं त्यात ढवळाढवळ करू नये, असं त्याला मनापासून वाटायचं.

सी. रामचंद्रच्या गाण्यातून लताला वगळता येईल- काय ? हा प्रश्न अनावश्यक आहे. ओ. पी. नय्यरच्या संगीतातून आशाला वगळल्यास काय राहतं ? यासारखाच हा प्रश्न आहे. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, लताच्या आवाजानं सी. रामचंद्रच्या चालीचं सोनं केलं ! तेवढ्या मगदुराची जर दुसरी कुणीही गायिका त्याला मिळाली असती तर कदाचित लताचं आणि त्याच बिनसल्यावर ती त्याच्याकडे गात राहिली असती. लता आणि सी. रामचंद्र हे दोघेही एकमेकांच्या कलागुणाना पोषक ठरून प्रसिद्धीच्या झोतात आले; पण आज आपल्याला लताच्या, (तिनंच निवडलेल्या) तिच्या दहा सर्वोत्कृष्ट गाण्यांत या सी. रामचंद्रचं एकही गाणं पहायला सापडत नाही !

आज चित्रपट-उद्योगाला आणि पर्यायानं चित्रपट-संगीताला आलेल्या धंदेवाईकपणात सी. रामचंद्रसारखा शास्त्रीय संगीत आणि मेहनत यांवर भर असलेला कलावंत टिकला नसता आणि झालंही तसंच ! या दबडघाईतल्या चित्रपटसंगीतातून सी. रामचंद्र बाजूला फेकला गेला. संगीताच्या ' सीटिंग्ज '-सारख्या सामुदायिकरीत्या केल्या जाणाऱ्या कवायतीत तो बसू शकला नाही. प्रोड्यूसर, डायरेक्टर, हिरो इत्यादी जाणकारांच्या (?) सूचना पाळन त्याला कधीच चाल बांधायला जमली नसती. हिंदी चित्रपटसंगीतावर होऊ लागलेल्या परकीय ढंगाविषयी त्याला मनस्वी राग होता. हिंदी चित्रपटात भारतीय ख्यातीचा अभाव आढळतो, ही त्याला हळहळ वाटत होती. चित्रपटातली गाणी ' सिंगेबल ' करण्यामागे त्याचा ओढा होता.

असा हा मनस्वी कलावंत आपल्या आयुष्यात काहीच खत-भेद बाळगून नव्हता का ? निदान तो तसं बोलून तरी दाखवत नसे. त्याची ' साई-सावली ' त्याला हा तटस्थपणा, हा निवातपणा देत होती काय ? त्याला ज्या आठवणींची चीड येत होती, त्या आठवणींनी त्याला कधी व्याकुळ केलं असेल का ? निदान ' के. ई. एम्. ' मध्ये तरी ? हॉस्पिटलमधल्या काही दिवसांच्या वास्तव्यात या सर्व आठवणींना उजाळा देऊन नंतर तटस्थपणानं तो एकटाच गुणगुणला असेल–

'नीदिया आजा री आजा, धीरेसे आजा...!'

— राहुल घोरपडे